**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०३७
निर्णय दिनांक १६-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संजय प्रल्हाद राठोड ,<br>ता. जाफ्राबाद, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, जालना<br>जि. जालना . | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,<br>जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

स्भ्नn]ड्ढ अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती कायम ठेऊन आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांच्या मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही व कोणताही पत्रव्यवहार न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे नांदखेडा पाझर तलाव क्र. ६,७,८, पापळ पाझर तलाव, वहीणा पाझर तलाव, बुटखेडा पाझर तलाव, अकोला पाझर तलाव या कामाच्या अंदाजपत्रकाच्या, हजेरी पत्रकाच्या प्रती व या कामावर झालेल्या खर्चाची माहिती मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जासोबत सादर केलेले दारिद्रयरेषेचे प्रमाणपत्र हे तहसिलदार जाफ्राबाद यांचेकडून साक्षांकीत करुन घेऊन त्यानंतर त्यांच्या कार्यालयात सादर करण्याच्या सूचना अपिलार्थीस दिल्या तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी आवश्यक ते अनुदान त्यांचे वरिष्ठांकडून प्राप्त झाल्यानंतर ती अपिलार्थीस देण्यात येईल, असे अपिलार्थीस अवगत केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही व कोणतेही पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीने सुनावणीच्या दरम्यान आयोगास अवगत केले. अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.३.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही व यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार अपिलार्थीशी केला नाही. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तीवाद केला की, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठयर्थ त्यांच्या कुटुंबाचे ग्राम विकास विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र त्यांनी आयोगास दाखवले. अपिलार्थीने आयोगास पुढे असे अवगत केले की, त्यांनी ज्या कामाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितली आहे ती कामे त्यांच्या गावाशेजारी झाली असून त्या कामावर गावातल्या एकाही मजूराला काम मिळाले

नव्हते. जन माहिती अधिकारी यांनी ही कामे यंत्राच्या सहाय्याने करुन घेतली आहेत. तसेच या कामामध्ये भ्रष्टाचार झाला असल्याचा त्यांचा संशय असल्याने त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केलेले दारिद्रयरेषेचे प्रमाणपत्र हे अर्जदाराच्या वडिलांच्या नावाने असून त्यावरुन अर्जदार हे स्वतः दारिद्रयरेषेखालील आहेत किंवा नाहीत याचा बोध होत नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, त्यांनी कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर जालना यांना दि. २१.५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक ते शुल्क रु. ३०००/- इतके अनुदानाच्या रुपात त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र दिले आहे. त्यांना कार्यालयीन खर्च या शिर्षाखाली सन २००७-२००८, २००८-२००९ या कालावधीत कोणतेही अनुदान प्राप्त झाले नाही. त्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. तथापि अशाप्रकारची माहिती देण्यासंदर्भात त्यांच्याकडे आवश्यक ते अनुदान, सन २००७-२००८, २००८-२००९ या वर्षात आतापर्यंत उपलब्ध झालेले नाही. या संदर्भात सचिव (जलसंपदा) यांना असे सूचित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात केलेल्या अनुदानाच्या मागणीची त्यांनी योग्य प्रकारे दखल घेऊन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्यासाठी "कार्यालयीन खर्च" या शिर्षाखाली त्यांच्या विभागातील सर्व अधिका-यांना तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी, जेणेकरुन माहिती देण्यासाठी

निधी उपलब्ध नाही अशा प्रकारची कारणे जन माहिती अधिकारी अर्जदारांना देऊ शकणार नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पाहणीकरिता उपलब्ध करुन दयावी. या माहितीवरुन अपिलार्थीस जी माहिती आवश्यक आहे त्या माहितीच्या नोंदी ते त्यांच्याकडे करुन घेऊ शकतील. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आवश्यक ते अनुदान प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी प्राधान्याने ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देणे त्यांना अनिवार्य आहे.

जालना जिल्हयातील लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) विभागातर्फे केल्या जाणा-या अनेक कामांच्या संदर्भात आयोगाकडे वेळोवेळी मोठया प्रमाणात अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी एकाही प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळून आलेले नाही. रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात चौकशी प्राधिकरण म्हणून विभागीय महसूल आयुक्त यांची नेमणुक केली गेली आहे. तेव्हा माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १८ (२) व १८ (३) च्या तरतुदीप्रमाणे आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधीन राहून महसूल आयुक्त, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी जालना जिल्हयातील लघुपाटबंधारे स्थानिक स्तर जालना या विभागातील अपीलार्थीच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या रोजगार हमी योजनेच्या कामांची त्यांचे स्तरावर चौकशी करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत होताच १२० दिवसाच्या आत सादर करावा. यासाठी, त्यांना आावश्यक वाटल्यास जिल्हयातील इतर सक्षम यंत्रणेचे ते सहाय्य घेऊ शकतात.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जात निर्देशित केलेल्या पाझर तलावांवर झालेल्या एकूण खर्चाची मागणी केली होती व किमान ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना सहज शक्य होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करुन अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही प्रकारे सकारात्मक

प्रतिसाद देण्याची तयारी दर्शवली नाही. आपल्या अशा प्रकारच्या कृतीद्वारे उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग जालना यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यामुळे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस ते निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब सचिव (जलसंपदा) यांना उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग जालना यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २४.३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन अथवा या संदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न करुन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचे देखील सचिव (जलसंपदा) यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे व्यक्तीशः व विनामूल्य उपलब्ध करुन दयावी.

३) सचिव (जलसंपदा) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, उपविभाग जालना यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४) महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी जालना जिल्हयातील कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर जालना यांच्या कार्यक्षेत्रातील, या अपिलाशी संबंधित मूळ माहिती अर्जामध्ये नमूद केलेल्या सर्व पाझर तलावाच्या कामाची चौकशी करुन आयोगास आपला अहवाल हे आदेश निर्गमित होताच १२० दिवसाच्या आत सादर करावा.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय प्रल्हाद राठोड, मु.पो.अकोला देव (तांडा) ता. जाफ्राबाद जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग जालना जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव ( जलसंपदा ), मंत्रालय मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंद संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०३८
निर्णय दिनांक १६-०७-२००९

१ श्री. बाबुराव गोविंदराव सुर्यवंशी , : अपिलार्थी
रा. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा प्रकल्प अधिकारी,
नगर पालिका प्रशासन,
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, जालना

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः निवासी उपजिल्हाधिकारी, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व असमाधानकारक माहिती दिल्याने आयोगाकडे अपील केल्याचे म्हटले आहे व या अर्जासोबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दि. ७.१.२००८ रोजी लोकशाही दिनी दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत जोडली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वार्ड क्र. ४५ इतवारा गल्ली, पंचमुखी महादेव मंदिराजवळील रस्त्यालगत सहान जागेवर केलेल्या बांधकामासंदर्भात काही माहिती मागवली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

"दि. ७.१.२००८ च्या लोकशाही दिनी केलेल्या तक्रारी संबंधाने टोकन क्र. ८ नुसार निवेदनावर कार्यवाही करुन आपणास लवकरच कळविण्यात येईल असा उल्लेख आहे. लवकरच याचा अर्थ किती दिवस/किती महिने/अथवा किती वर्ष या बाबत स्पष्ट शब्दात तपशील कळवावा. म्हणजे कार्यालयाच्या भूलथापाला मर्यादा निश्चित असावी असे मला वाटते. करिता विहीत कालावधी कळवावा."

अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयास उद्देशून केला आहे. तथापि या प्रकरणी मुख्याधिकारी, नगर परिषद जालना हे माहिती अधिकारी असल्याने जिल्हाधिकारी जालना यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या मूळ अर्जाची छायांकीत प्रत मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांचेकडे दि. १५.४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठवली. यावर मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांनी जिल्हाधिकारी, जालना यांना त्यांचेकडील दि. ३.५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे या अर्जासंदर्भात अहवाल पाठवला व याची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.१६.६.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि.१६.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती मुख्यधिकारी,नगर परिषद, जालना यांनी त्यांच्या दि. ३.५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीच्या मनात, 'लवकरच' या शब्दाचा अर्थ जन माहिती अधिकारी यांचेकडून जाणून घ्यावयाचा असल्याचे त्यांच्या या माहितीसाठीच्या अर्जावरुन दिसून येते. अशा प्रकारची माहिती अर्जदाराने मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ती देणे हीच मूळात माहिती अधिकार अधिनियमाच्या व्याप्ती बाहेरील बाब आहे. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज अवैध ठरत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील करुन त्यांना अपूर्ण व असमाधानकारक माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. तथापि त्यांना प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण व असमाधानकारक का वाटते याचे स्पष्टीकरण देण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचा अपील अर्ज फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडील नस्तीचे अवलोकन करता या नस्तीमध्ये मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दि. २.२.२००८ रोजी लिहिलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीच्या तक्रारीतील संदर्भिय प्रकरणाविषयी विस्ताराने लिहिले आहे. या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरवल्यास अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांची सद्यस्थिती अपिलार्थीस ज्ञात होऊ शकेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांनी जिल्हाधिकारी, जालना यांना अपिलार्थीच्या लोकशाही दिनीच्या तक्रार अर्जाशी संबंधित प्रकरणात लिहिलेल्या दि. २.२.२००८ रोजीच्या पत्राची प्रत हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांच्या दि. २.२.२००८ रोजीच्या पत्राची प्रत विनामूल्य उपलब्ध करुन दयावी.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबुराव गोविंदराव सुर्यवंशी, रा.इतवारा गल्ली, पंचमुखी महादेव मंदिराजवळ, जुनाजालना, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगर पालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०४०
निर्णय दिनांक  १६-०७-२००९

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे,
रा. जालना.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
नेहरु विद्यालय, गोलापांगरी, ता.जि.जालना

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील विद्यार्थी - श्री. सचिन बद्रीनारायण कावळे, बाळासाहेब भागवत जाधवर,गजानन आसाराम मगर,हरी दत्ता लोंढे या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे वेळी त्यांच्याकडून घेतलेल्या टी.सी.व प्रवेश अर्जाची झेरॉक्स प्रत व त्यांनी शाळा सोडताना दिलेल्या टी.सी.ची स्थळप्रत व ज्या प्रवेश-निर्गम रजिस्टरवरुन टी.सी.बनविण्यात आली, त्या रजिस्टरच्या पृष्ठाची झेरॉक्स प्रत - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.०२.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या पत्राद्वारे त्यांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रवेश देतेवेळी त्यांनी सादर केलेले मूळ अर्ज व त्यांचे टी.सी.हरविले असल्याचे अवगत केले व अपिलार्थीने मागणी केलेल्या उर्वरित कागदपत्रांचे शुल्क रु. १८/- इतके त्यांच्या शाळेमध्ये भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१०.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०९.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात त्यांचे आदेश दि.२१.०९.२००८ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित माहिती सशुल्क देण्याचे आदेशित केल. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना पूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील त्रयस्थ पक्षाने त्यांच्या शाळेत प्रवेश घेतेवेळी दिलेल्या टी.सी.च्या व प्रवेश अर्जाच्या झेरॉक्स प्रती त्यांच्या शाळेतील श्री. राऊत या लिपीकाने गहाळ केल्या असून यासंदर्भात त्यांनी पोलीस स्टेशन, जालना यांच्याकडे दि.१९.०९.२००५ रोजी रीतसर तक्रार केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की,अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जरी त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागितली असली तरी ती, सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१) व (९) मधील कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन

या प्रकरणी  संभवत नाही. त्यामुळे ही माहिती उघड करण्यासाठी त्यांना त्रयस्थ पक्षाची संमती घेण्याची गरज नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या शाळेतील एकूण चार विद्यार्थ्यांच्या संदर्भात त्यांनी प्रवेश घेताना सादर केलेल्या टी.सी. व प्रवेश अर्जाच्या प्रती मागितल्या होत्या. ही माहिती शाळेतील तत्कालीन लिपीक श्री. जी.के.राऊत यांच्याकडून गहाळ झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे व यासंदर्भात त्यांनी पो.उ.नि.पोलीस स्टेशन,जालना यांना दि. १९.०९.२००५ रोजी लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. या पत्रावर अथवा पत्रासोबत जोडलेल्या एकूण बारा विद्यार्थ्यांच्या यादीवर, संबंधित पोलीस स्टेशनचा शिक्का अथवा पोचसही नाही, त्यामुळे सदर शाळेने दि.१९.०९.२००५ रोजी संबंधित पोलीस स्टेशनला खरोखरीच पत्र दिले किंवा कसे, याबाबत आयोग साशंक आहे म्हणून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती त्यांच्या शाळेतील ज्या कर्मचाऱ्याकडून गहाळ झाली आहे, त्या कर्मचाऱ्यावर त्यांनी तात्काळ फौजदारी गुन्हयाची नोंद करुन एफ.आय.आर.ची प्रत, अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी  दि.१९.०९.२००५ च्या पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन, जालना यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राच्या प्रतीसह हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, त्यांच्याकडे या चार विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळेने दिलेल्या टी.सी.ची व प्रवेश निर्गम रजिस्टरची माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१)  अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयात स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती गहाळ करणाऱ्या त्यांच्या शाळेतील कर्मचाऱ्यावर फौजदारी गुन्हयाची नोंद करुन या एफ.आय.आर.ची प्रत अपिलार्थीस (त्यांच्या दि.१९.०५.२००५ रोजीच्या पत्रासह) हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**जालना**
**दिनांक : १६-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, व्दारा- श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्प्लेक्स,कचेरी रोड, जुना जालना

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,नेहरु विद्यालय, गोलापांगरी, ता.जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०४१
निर्णय दिनांक १६-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शिवदास दामोधर शहाणे,<br>अंबड,जि.जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>अंबड,जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी,<br>परतुर, जि.जालना | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. काळे, मंडळ कृषि अधिकारी यांनी दि. ११.०६.२००७ पर्यंत केलेल्या रो.ह.यो.च्या कामांच्या मस्टर्सच्या प्रती व तालुका कृषि अधिकारी यांनी २००६-२००७ या वर्षी केलेल्या नालाबंडींगच्या कामाच्या मस्टर्सच्या प्रती व दि. २१.०५.२००७ रोजी प्राप्त झालेल्या ७

लाख रु. इतक्या रकमेचे वाटप कोठे कोठे केले - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१२.०७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०७.२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १३.०८.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण तालुक्याशी संबंधित माहिती अपेक्षित असताना त्यांनी अपिलार्थीस फक्त श्री. काळे, मंडळ कृषि अधिकारी यांच्या संदर्भातीलच माहिती उपलब्ध करुन दिली आहे. उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने फक्त श्री. काळे यांच्या बाबत माहिती मागविली होती व ती माहिती अपिलार्थीस त्यांनी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की,अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये श्री. काळे यांच्याकडील कामाच्या संदर्भातील माहिती हा केवळ एक मुद्दा होता व दुसऱ्या मुद्याद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संपूर्ण अंबड तालुक्याशी संबंधित होती, त्यामुळे अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली, या त्यांच्या

युक्तिवादामध्ये आयोगास तथ्य आढळून येत आहे. उर्वरित माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देता येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती अपेक्षिली आहे. हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी सुटीचे दिवस वगळून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती हस्तगत करावी लागेल व यासाठी त्यांच्या कोणत्याही प्रतिनिधीस प्राधिकृत करण्याची त्यांना अनुमती असणार नाही. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ११.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवदास दामोधर शहाणे, मु.पो.नुतन वसाहत,ठाकूरनगर,अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०४२
निर्णय दिनांक १६-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राम रुस्तुमराव लांडे,<br>अंबड,जि.जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता,<br>लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>उपविभाग, अंबड,जि.जालना<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,<br>जालना | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांच्या मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेण्याचे टाळले असल्याकारणाने, त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००७ ते २००८ या कालावधीत भांबेरी, ता.

अंबड येथे सुरु असलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कामाची ठळक वैशिष्टये, अंदाजित कामाचा नकाशा व कामावर झालेला बाबनिहाय खर्च, काम करणाऱ्या एजन्सीचे नाव - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८४०/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे या पत्राद्वारे सूचित केले. तदनंतर अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि.०७.०७.२००८ रोजी उपस्थित राहिले असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे शुल्क स्वीकारले नाही. यासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दि.०७.०७.२००८ रोजी एक पत्र लिहिले असून या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून शुल्क स्वीकारण्यास नकार दिला, असे नमूद केल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना असेही कळविले आहे की, जर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही तर त्यांना वरिष्ठ प्राधिकरणाकडे अपील करावे लागेल. तथापि अपिलार्थीच्या अशाप्रकारच्या पत्रानेदेखील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यशैलीत कोणताही फरक पडला नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले. आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने तदनंतर अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१६.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. या प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की,त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असून त्यांनी ज्या कामाच्या संदर्भात माहिती मागविली आहे ती कामेच मूळात झाली नसल्याने व या कामासंदर्भात प्रस्तावही सादर केले गेले नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती, दि.१०.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाली आहे. त्यांनी आयोगासमोर असेही प्रतिपादन केले की, त्यांनी मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे नव्हती तर, त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस तसे कळविणे भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नाही व एवढेच नव्हेतर जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने रु.८४०/- इतक्या रकमेचा भरणा त्यांच्याकडे करण्याची तयारी दर्शविल्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही अथवा हे शुल्क कोणत्या शीर्षाखाली व कोठे भरावयाचे याचेही मार्गदर्शन केले नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्यांची सद्यस्थिती जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः चुकीची कळविल्याने व नंतर विलंबाने कळविल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याचे आदेशित करावे, अशी त्यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादाच्या अखेरीस विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, मूळात अपिलार्थीने ज्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या कामाची माहिती मागितली आहे, ती कामेच त्यांच्याकडे अस्तित्त्वात नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही व अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात संदर्भित केलेली कामे अस्तित्त्वात नसल्याचे त्यांनी त्यांच्याकडील दि.१०.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की,अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या म्हणण्याप्रमाणे अपिलार्थीने अंबड तालुक्यातील भांबेरी गावामध्ये

चालू असलेल्या के.टी.वेअर्सच्या संदर्भात काही माहिती मागितली आहे. तथापि भांबेरी येथे त्यांच्या कार्यालयातर्फे अशाप्रकारे कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम प्रगतीपथावर व तसेच भविष्यकाळात प्रस्तावित नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस दि.१०.०७.२००९ रोजी कळविले. वास्तविक पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कामासंदर्भात आहे, ते कामच अस्तित्त्वात नसल्याने अपिलार्थीस माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांना अत्यंत सोपे काम होते, तथापि या माहितीकरिता त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.८४०/- इतके भरण्याचे त्यांच्या दि.२३.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले. संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर),उपविभाग, अंबड जि.जालना यांची अपिलार्थीस निरंक माहिती देय असताना देखील प्रथमतः अवाजवी शुल्क आकारणे, ते कोठे,कसे भरावयाचे याचे कोणतेही मार्गदर्शन न करण्याच्या कृतीव्दारे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ तत्त्वानांच छेद देण्याचा प्रयत्न केल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जाणूनबुजून खोटी माहिती देणे, त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ करणे, या सर्व बाबी, या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रमाकडे पाहता, निःसंशयपणे सिध्द होत आहेत. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता श्री. राजपूत हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब सचिव (जलसंपदा) यांना अशी शिफारस करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी संबंधित उपविभागीय अभियंता श्री. राजपूत यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे वस्तुस्थितीदर्शक माहिती दिली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) सचिव (जलसंपदा), यांना या प्रकरणाशी संबंधित उपविभागीय अभियंता श्री. राजपूत यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना**
**दिनांक : १६-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राम रुस्तुमराव लांडे,होळकरनगर,अंबड,जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),उपविभाग, अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०४३
निर्णय दिनांक १६-०७-२००९

१ श्री. विकास कुमार बागडी, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
विभाग जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,
औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः श्री. त्यागी, शाखा अभियंता

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शाखा अभियंता श्री. त्यागी यांनी सन २००६ ते २००८ या कालावधीतील एकूण केलेल्या कामांची संख्या, कामाचे स्वरुप, कामाचे स्थळ व या कामावर एकूण किती रक्क्कम खर्च करण्यात आली, या बाबतची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना,उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे स्थानिक स्तर उपविभाग,जालना यांच्याकडून घेण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत उपविभागीय अभियंता, ल.पा. (स्था.स्त.) उपविभाग, जालना यांना अग्रेषित करुन त्यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०८.२००८ रोजी सुनावणी घेऊन, जिल्हा/तालुका जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांचे आत साक्षांकित स्वरुपात माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास अवगत करताना असे सांगितले की, जलसंधारण विभागाच्या या लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागामुळे जालना जिल्हयाचे अपरिमित नुकसान झाले असून, शासनाने जालना जिल्हयाच्या विकास कामांकरिता लाखो रुपयांची रक्कम पाठविली असून, यापैकी एकही काम जालना जिल्हयातील उपविभागाने केलेले नाही. मूळात त्यांनी कामच केले नसल्याने ही माहिती त्यांच्याकडे आहे किंवा नाही, याची त्यांना शंका आहे. तथापि ही कामे रोजगार हमी योजनेअंतर्गत केली असल्याचे दाखविल्याने, जन माहिती अधिकारी यांनी कथित कामे

कशाप्रकारे पूर्ण केली, याची माहिती जाणून घेण्याकरिता त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित उपअभियंत्याकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते व तसेच जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर परत दि. ०५.०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी त्यांना स्मरण दिले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांच्या आत देणे त्यांना अनिवार्य होते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),जालना यांना उद्देशून केला आहे व त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडील दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित उपअभियंता यांना पाठविला आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर, त्यांनी अर्जदाराच्या अर्जाची प्रत, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत, अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधित आहे त्यांच्याकडे पाठविणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे, त्यामुळे या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत म्हणजेच दि. २७.०५.२००८ रोजी अगर तत्पूर्वी संबंधित उपअभियंता यांच्याकडे पाठवावयास हवा होता. तथापि त्यांनी या टप्प्यावर आठ दिवसांच्या विलंबाने अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित उपअभियंता यांना पाठविली.

आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप सरळ व सोपे होते, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणतीच हरकत नव्हती.

वरील वस्तुस्थिती पाहता जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना, अपिलार्थीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील श्री. त्यागी या कनिष्ठ अभियंत्याने सन २००६-२००८ या वर्षात कोणती कामे केली, या कामाचे स्थळ व कामावरील खर्च एवढीच मर्यादित स्वरुपाची माहिती मागितली असूनही त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी हे एवढी साधी माहितीही पुरवू शकले नाहीत, हे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप इतके साधे आहे की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित कनिष्ठ अभियंत्यांनी कोणतीही कामे केली नसल्याने, अपिलार्थीस काय माहिती द्यावयाची याचा पेच जन माहिती अधिकारी यांना पडला असावा की काय, याची आयोगास शंका येत आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) विभाग,जालना (श्री. आर.जी. यादव) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे उपविभागीय स्तरावरील, उपविभागीय अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) उपविभाग, जालना (श्री.भास्कर काशिनाथराव जाधव) यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने, त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी स्वतः उपस्थित नाहीत. तेव्हा त्यांचे म्हणणे मांडण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) विभाग,जालना (श्री. आर.जी. यादव) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे उपविभागीय स्तरावरील, उपविभागीय अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) उपविभाग, जालना (श्री.भास्कर काशिनाथराव जाधव) यांना असे

आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी त्यांना वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकत्रित एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश कायम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) विभाग, जालना यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी कोणतेही काम केले नसेल तर अथवा कोणताही खर्च केला नसेल तर, तसे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच, पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य कळवावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी कोणतेही काम केले नसेल तर

अथवा कोणताही खर्च केला नसेल तर, तसे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य कळवावे.

३) उपरोक्त प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) विभाग,जालना (श्री. आर.जी. यादव) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे उपविभागीय स्तरावरील, उपविभागीय अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) उपविभाग, जालना (श्री.भास्कर काशिनाथराव जाधव) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकत्रित एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.विकास कुमार बागडी, नाथगल्ली, सदर बाजार,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. श्री. बी. के.जाधव, तत्कालीन उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (मार्फत कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग जालना)

४. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०४४
निर्णय दिनांक १६-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विकास कुमार बागडी,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>विभाग जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,<br>औरंगाबाद | | |

त्रयस्थ पक्षः श्री. कोरडे,शाखा अभियंता

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे शाखा अभियंता श्री. कोरडे यांनी केलेल्या कामांची संख्या, विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांच्या जा.क्र.२००७/रोहयो/तांत्रिक २/७४०,दि.२१.१२.२००७ च्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही व या पत्राची प्रत आणि दि. २०.१२.२००७ रोजी रोहयो विधी मंडळ समितीचे प्रमुख श्री. संजय

देवतळे यांना राज्य संघटक अखिल भारतीय भ्रष्टाचार विरोधी संघटना यांच्या जा.क्र.१४२ नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०६.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना, उपविभागीय अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) उपविभाग, जालना व भोकरदन यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत संबंधित उपअभियंत्यांना अग्रेषित केली. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०८.२००८ रोजी सुनावणी घेऊन जिल्हा/तालुका जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसांचे आत साक्षांकित स्वरुपात माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास अवगत करताना असे सांगितले की, जलसंधारण विभागाच्या या लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभागामुळे जालना जिल्हयाचे अपरिमित नुकसान झाले असून, शासनाने जालना जिल्हयाच्या विकास कामांकरिता लाखो रुपयांची रक्कम पाठविली असून, यापैकी एकही काम जालना जिल्हयातील उपविभागाने केलेले नाही. मूळात त्यांनी कामच केले नसल्याने ही माहिती त्यांच्याकडे आहे किंवा नाही, याची त्यांना शंका आहे. तथापि ही कामे रोजगार हमी योजनेअंतर्गत केली असल्याचे दाखविल्याने, जन माहिती अधिकारी यांनी कथित कामे

कशाप्रकारे पूर्ण केली, याची माहिती जाणून घेण्याकरिता त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित उपअभियंत्यांकडून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते व तसेच जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर परत दि. ०५.०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, माहिती देण्यासंबंधी त्यांना स्मरण दिले होते व अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ मध्ये अपिलार्थीने संदर्भित केलेली पत्रे त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली नाहीत, त्यामुळे या संदर्भात त्यांच्याकडे कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांच्या आत देणे त्यांना अनिवार्य होते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा प्रथम अर्ज कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),जालना यांना उद्देशून केला आहे व त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडील दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित उपअभियंता, जालना/भोकरदन यांना पाठविला आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे, अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर, त्यांनी अर्जदाराच्या अर्जाची प्रत, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत, अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधित आहे त्यांच्याकडे पाठविणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे, त्यामुळे या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत म्हणजेच दि. २७.०५.२००८ रोजी अगर तत्पूर्वी संबंधित उपअभियंता यांच्याकडे पाठवावयास हवा होता. तथापि त्यांनी या

टप्प्यावर आठ दिवसांच्या विलंबाने अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित उपअभियंता यांना पाठविली.

आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०४.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप सरळ व सोपे होते, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देण्यास जन माहिती अधिकारी यांना काहीच हरकत नव्हती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र. २ व ३ द्वारे मागणी केलेल्या माहितीसंबंधी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस ही माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अनौपचारिकरित्या प्राप्त झालेली आहे व ही दोनही पत्रे, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आपल्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणाच्याही कार्यालयास प्राप्त झालेली नाहीत, हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी जालना व विधीमंडळ सचिवालय,मुंबई यांच्याकडून, वेगळयाने माहिती घ्यावी.

वरील वस्तुस्थिती पाहता जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील श्री. जयंत कोरडे या कनिष्ठ अभियंत्याने सन २००६-२००८ या वर्षात एकूण किती कामे केली, एवढीच मर्यादित स्वरुपाची माहिती मागितली असूनही त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी हे एवढी साधी माहितीही पुरवू शकले नाहीत, हे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुप इतके साधे आहे की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, संबंधित कनिष्ठ अभियंत्यांनी कोणतेही काम केले नसल्याने अपिलार्थीस काय माहिती द्यावयाची याचा पेच जन माहिती अधिकारी यांना पडला असावा की काय, याची आयोगास शंका येत आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) विभाग,जालना (श्री. आर.जी. यादव) व या

प्रकरणाशी संबंधित त्यांचे उपविभागीय स्तरावरील, उपविभागीय अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) उपविभाग, जालना (श्री.भास्कर काशिनाथराव जाधव) व उपविभागीय अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) उपविभाग,भोकरदन( श्री. जयसिंग शिवसिंग महेर,सध्या नांदूर मधमेश्वर कालवा विभाग,वैजापूर अंतर्गत,उपविभाग गंगापूर येथे कार्यरत) यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असल्याने, त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी स्वतः उपस्थित नाहीत. तेव्हा त्यांचे म्हणणे मांडण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) विभाग,जालना (श्री. आर.जी. यादव) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे उपविभागीय स्तरावरील, उपविभागीय अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) उपविभाग, जालना (श्री.भास्कर काशिनाथराव जाधव) व उपविभागीय अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) उपविभाग,भोकरदन( श्री. जयसिंग शिवसिंग महेर,सध्या नांदूर मधमेश्वर कालवा विभाग,वैजापूर अंतर्गत, उपविभाग गंगापूर येथे कार्यरत) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकत्रित एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती लावण्याचे आदेश कायम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) जालना यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती

त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. व जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी कोणतेही काम केले नसेल तर तसे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच, पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य कळवावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी कोणतेही काम केले नसेल तर, तसे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच, पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य कळवावे.

३) उपरोक्त प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) विभाग,जालना (श्री. आर.जी. यादव) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक, उपविभागीय अभियंता,ल.पा.(स्था.स्त.) उपविभाग, जालना व भोकरदन (श्री.भास्कर काशिनाथराव जाधव व श्री. जयसिंग शिवसिंग महेर,सध्या नांदूर मधमेश्वर कालवा विभाग,वैजापूर अंतर्गत उपविभाग गंगापूर येथे कार्यरत) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.विकास कुमार बागडी, नाथगल्ली, सदर बाजार,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. श्री.भास्कर काशिनाथराव जाधव,तत्कालीन उपविभागीय अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर) उपविभाग जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (मार्फत कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग जालना)

४. श्री. जयसिंग शिवसिंग महेर,(सध्या नांदूर मधमेश्वर कालवा विभाग,वैजापूर अंतर्गत उपविभाग गंगापूर येथे कार्यरत) (मार्फत कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),विभाग जालना)

५. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०४५/०८, १०४६/०८ , १०४७/०८ , १०४८/०८ व १०४९/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०४५, १०४६, १०४७, १०४८ व १०४९
निर्णय दिनांक १६-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विकास कुमार बागडी,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)मंडळ,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,<br>औरंगाबाद | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.११.२००८ रोजी नोंदविलेली क्र.१०४५/०८ ते १०४९/०८ अशी एकूण पाच स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांचे पाच स्वतंत्र मूळ अर्ज व त्यावरील पाच स्वतंत्र प्रथम अपिले हे एकाच दिवशी केली असल्याने, या सर्व अपील अर्जांची सुनावणी आज रोजी एकत्रितपणे घेण्यात येत असून, ही पाचही अपिले अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने आयोगाकडे सादर केली असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०८.२००८ रोजीच्या पाच स्वतंत्र मूळ अर्जांन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, परभणी,जालना,घनसावंगी,जालना व अंबड उपविभागासंबंधी अधीक्षक अभियंता, ल.पा.(स्था.स्त.)मंडळ,औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे काही माहिती मागितली होती. यापैकी अपील क्र.१०४६/०८ वगळता इतर चारही मूळ अर्जांद्वारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या उपविभागातील २००७ ते जुलै २००८ या कालावधीमध्ये (अपील क्र.१०४९/०८ मध्ये २००६ ते २००८ या कालावधीमध्ये) एकूण किती कामे,कोणत्या अभियंत्याच्या अधिकाराखाली करण्यात आली, त्यांचे नाव व झालेल्या कामाचे  गाव तलाव व पाझर तलाव यांची नावे - या मुद्यांचा समावेश होता. अपील क्र. १०४६/०८ च्या संदर्भातील प्रथम अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये - जालना ल.पा.(स्थानिक स्तर) विभागात असलेल्या उपविभागांची संख्या, सन २००७ ते माहे जुलै २००८ या कालावधीमध्ये मुख्यालयी गैरहजर राहणाऱ्या अभियंत्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली व त्या उपविभागात कामे करणारे उपअभियंता,शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता यांची नावे, घरांचे पत्ते व कामाची नावे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या सर्व माहितीच्या अर्जामध्ये टपालाद्वारे माहिती अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही क्षेत्रीय पातळीवरची असून ही माहिती कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्त.) जालना यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या उपविभागाशी संबंधित असल्याने संबंधित कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडून रीतसर अर्ज सादर करुन माहिती हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.१०.२००८ रोजी पाच स्वतंत्र प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन

अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.१०.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे पाच स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

उपरोक्त पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १६.०७.२००९ रोजी जालना येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जांद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिलेली माहिती त्यांना व्यक्तिशः प्राप्त व्हावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उपविभागीय स्तरावरील असल्याने त्यांनी अपिलार्थीस दि. २६.०८.२००८ रोजीच्या पत्राप्रमाणे या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थितीची माहिती दिली. तथापि राज्य माहिती आयोगाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात कशाप्रकारे उपलब्ध होऊ शकेल हे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने सांगितल्यानंतर, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत देण्याचे कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन देणे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अनिवार्य आहे, असे दिसून येते. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उपविभागीय स्तरावरील होती, तर त्यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत उपविभागाकडे पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती न

करता अपिलार्थीस हीच माहिती वेगळया अर्जाद्वारे संबंधित उपविभागाकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले, ही जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २६.०८.२००८ रोजीच्या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन किंवा लेखी मराठी भाषेत करुन देणे इत्यादीचा समावेश 'माहिती'च्या व्याख्येत नाही. जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे जरी खरे असले तरी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे प्रमुख काम हे अधीक्षणाचे (Superintendence) चे आहे, त्यामुळे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व विभाग व उपविभागाचे प्रशासन हे त्यांच्या कार्यालयामार्फतच कार्यरत असते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी सन २००७-२००८ या कालावधीमध्ये रोहयो अंतर्गत, किती कामे करण्यात आली, व करण्यात आलेल्या कामांची नावे, किमान एवढी तरी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे भाग आहे. कारण अशाप्रकारच्या रोहयो कामांचा अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावरुन देखील वेळोवेळी आढावा घेतला जातो. विधीमंडळाच्या रोहयो समितीमार्फत वर्षातून एकदा विभागस्तर व जिल्हास्तरावर आढावा बैठका होत असतात. या बैठकीच्या वेळी ही सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संकलीत केली जाते व कामाच्या नियमित व्यवस्थापनामध्ये अशाप्रकारची माहिती, ही एक महत्त्वाचा भाग म्हणून, बांधकामाशी संबंधित असलेल्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये या ना त्या स्वरुपात जतन करुन ठेवलेली असते. त्यामुळे अपिलार्थीस नव्याने माहिती तयार करुन देण्याचे कोणतेही कारण जन माहिती अधिकारी यांना घडले नसते, जर त्यांची अपिलार्थीस ही माहिती देण्याची मनोमन ईच्छा असती तर. या प्रकरणी केवळ जन माहिती अधिकारी यांच्या मनातील ईच्छाशक्तीच्या अभावामुळेच अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीच्या अपील क्र. १०४६/०८ च्या संदर्भातील मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ शी संबंधित माहिती ही जालना लघु पाटबंधारे (स्था.स्त.) विभागाकडे उपलब्ध असणे भाग आहे. त्यामुळे अपील क्र.१०४६ च्या संबंधातील मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भातील माहिती ही जालना विभागाकडून अपिलार्थीने प्राप्त करुन घ्यावी, हा जन माहिती अधिकारी यांचा दावा योग्य आहे. तथापि आता

अपिलार्थीने दि. १३.०८.२००८ रोजी माहितीची मागणी करुन अकरा महिने इतका कालावधी व्यपगत होऊनही अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त झाली नाही, ही बाब निश्चितच माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ तत्त्वांना छेद देणारी आहे, असे आयोगास वाटते. मूळात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची 'माहिती' या प्रकारातील आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील बरीचशी माहिती कलम ४ (ख)(नऊ) मधील आहे. अधिनियमातील कलम ४(ख)(नऊ) मध्ये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांची निर्देशिका प्रसिध्द करणे सार्वजनिक प्राधिकरणास अनिवार्य आहे. सदर अधिसूचना प्रसिध्द होऊन अंदाजे पावणे चार वर्षांहून जास्त कालावधी व्यपगत झाला असूनही राज्य शासनाच्या या प्राधिकरणाने अशाप्रकारची 'माहिती' स्वयंप्रेरणेने घोषित केली नाही, हे खरोखरीच खेदजनक आहे, असे आयोग मानतो. सबब अपिलार्थीस एकगठ्ठा माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने या पाचही अपिलांशी संबंधित मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः, दोन साक्षीदारांच्या समक्ष हस्तांतरित करावी. अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती देण्याचे कारण असे आहे की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयावर आपला विश्वास नसून केवळ माहिती दिल्याचे दाखविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या जावक रजिस्टरमध्ये नोंद घेऊन व पोस्टाद्वारे कोरे कागद पाठविले जाण्याची शक्यता नाकाराता येणार नाही,अशी गंभीर शंका व्यक्त केली आहे. केवळ अशाप्रकारच्या शंकेस वाव न राहण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ साक्षीदाराच्या उपस्थितीत व्यक्तिशः माहिती देण्याचे आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थी यांना यासंबंधी असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत (सार्वजनिक सूटीचे दिवस वगळून) पूर्वनियोजित वेळी त्यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती स्वतः हस्तगत करुन घ्यावी. अपिलार्थीस असे अवगत करण्यात येत आहे की, या प्रकरणाशी

संबंधित ही माहिती अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

उपरोक्त प्रकरणी असे आढळून आले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसेल तर, त्यांनी अर्जदाराच्या अर्जाची प्रत, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाशी संबंधित आहे, त्यांच्याकडे पाठविणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. त्यामुळे या प्रकरणी सहायक अधीक्षक अभियंता यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत म्हणजेच दि. १८.०८.२००८ रोजी अगर तत्पूर्वी संबंधित उपअभियंता यांच्याकडे पाठवावयास हवा होता. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती न करुन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे.सबब सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. जी.के.सोनवणे तत्कालीन सहायक अधीक्षक अभियंता, सध्या पं.स.मालेगाव जि.नाशिक येथे उपअभियंता या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीची वरील पाचही अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. १०४५/०८, १०४६/०८ , १०४७/०८ , १०४८/०८ व १०४९/०८ ही पाच अपिले मान्य करण्यात येत आहेत.

२) जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त निकालपत्रात स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीने अपील क्र.१०४५/०८ ते १०४९/०८ शी संबंधित मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना पंधरा दिवसांच्या आत, दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

३) सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी (तत्कालीन सहायक अधीक्षक अभियंता,श्री. जी.के.सोनवणे, सध्या पं.स.मालेगाव,जि.नाशिक येथे उपअभियंता या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**जालना** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.विकास कुमार बागडी, नाथगल्ली, सदर बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (जलसंपदा),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५

निर्णय दिनांक १७-०७-२००९

१ श्री. शेख रशीद बालम, : अपिलार्थी
मु. पो. वडगांव गुप्ता (माळवाडी),
तालुका जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तलाठी, तलाठी कार्यालय, नागापूर,
तालुका जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदनगर,
तालुका जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्व गैरहजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळुन येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर येथील गट नंबर १४४ ला पूर्वीच्या उतारा शेतजमीन असा होता.

या शेतजमिनीचे कोणत्या आधारे प्लॉट पाडण्यात आले याची नक्कल, नांव गांव असलेली नावाची प्रत साक्षांकीत स्वरुपात मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) किंवा ७ (८) च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रतिसाद देणे भाग होते. तथापि असा प्रतिसाद त्यांनी दिल्याचे आढळून येत नाही. मात्र त्यांना ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देणे अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करावी. त्यांच्या प्रतिनिधीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख रशिद बालम, मु. पो. वडगांव गुप्ता (माळवाडी), तालुका जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, नागापूर, तालुका जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदनगर, तालुका जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६

निर्णय दिनांक १७-०७-२००९

१ श्री. जंगले पोपट साहेबराव, : अपिलार्थी
मु. पो. पानेगाव, तालुका नेवासा,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा,
तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : १ श्री. पंढरीनाथ हनमंता जंगले
२ श्री. रामा हनमंता जंगले
३ श्री. भिमा हनमंता जंगले

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती न दिल्यामुळे त्यांनी दिनांक १२-०३-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांच्याकडे प्रथम अपील केले असता या अपिलाचा निर्णय मोघम व उडवाउडवीच्या स्वरुपात देऊन त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक माहितीपासून वंचित ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयेगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळुन येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०९-३८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे " दिनांक १५-०९-३८ ला जे वाटपपत्र झाले आहे त्यामध्ये श्री. पंढरीनाथ हनमंता जंगले, श्री. रामा हनमंता जंगले व श्री. भिमा हनमंता जंगले यांनी आपसात वाटण्या केल्या. त्यांच्या लेखी जबाबाच्या मूळ कागदपत्रांच्या नकला मिळण्याबाबत " अशी माहिती मागितली होती. ही माहिती ५८५ क्रमांकाच्या फेराशी संबंधित असल्याचे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००९ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आढळ होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, तहसीलदार, नेवासा यांनी सदर पत्र सुनावणीच्या नंतर त्यांना दिले असून त्यांना त्यांचे म्हणणे

मांडण्याची संधी तहसीलदार, नेवासा यांनी दिली नाही. अपिलार्थीचा युक्तिवाद लक्षात घेता व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात घेता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश पारित करणे गरजेचे आहे.

सबब, तहसीलदार, नेवासा यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. या सुनावणीची नोटीस अपिलार्थीस किमान दहा दिवस अगोदर प्राप्त होईल असे त्यांनी पहावे. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

अहमदनगर

दिनांक १७-०७-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जंगले पोपट साहेबराव, मु. पो. पानेगाव, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७

निर्णय दिनांक १७-०७-२००९

१ श्री. मनोज मारुती कर्डीले, : अपिलार्थी
५६२८, शेरकर गल्ली, सर्जेपुरा, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा चेअरमन, सेतू समिती, जिल्हाधिकारी कार्यालय,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सेतू व ७/१२
संगणकीकरण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय,
अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (टंचाई), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहितीच्या अधिकारातील त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती त्यांना मिळाली नसल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई होऊन त्यांना माहिती प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सेतू समितीच्या संदर्भात दिनांक ०१-०१-२००८ ते २७-०१-२००९ या कालावधीतील काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११६ इतके त्यांना चलनाव्दारे त्यांच्या कार्यालयामध्ये भरण्यासाठी सर्व तपशीलासह सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दिनांक १७-०२-२००९ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०२-२००९ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०३-२००९ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले. सदर अपील फेटाळतांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ व्दारे मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात असल्याचे कारण दर्शवून फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिनांक १८-०२-२००९ रोजी सशुल्क पुरविली आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती

अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या निविदा प्रपत्रातील पृष्ठ क्रमांक २२ व २३ समाविष्ट केली आहे व ही माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०२-२००९ रोजी पुरविली असल्याने त्यांनी ती माहिती अपिलार्थीस वेगळ्याने दिली नाही व मुद्दा क्रमांक ३ च्या माहितीशी त्यांचा कोणताही संबंध नाही. सेतूकडून सी. एस. टी. बिलाची माहिती दिली जात नाही. सेतू कार्यालयाचे ऑडिट खाजगी सनदी लेखापालाकडून केले जाते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने विचाराधीन अपिलात त्यांना, त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही असे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या माहितीबाबत बहुतांश माहितीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडील सेतू कार्यालयाशी संबंध पोहोचत नाही. तसेच अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे फक्त "ऑडिट रिपोर्ट स्वरुपाची" माहिती मागितली आहे. ऑडिट रिपोर्ट स्वरुपाची माहिती म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती आणि कोणते ऑडिट याचा अपिलार्थीने या अर्जामध्ये उल्लेख केलेला नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करतेवेळी त्यांच्याकडील सेतू विभागाचे सन २००६-२००७ चे ऑडिट झाले होते व ही माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद जरी बरोबर असला तरी त्यांनी दिनांक १८-०२-२००९ रोजी पुरविलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्रमांक ३ व ४ च्या संदर्भात आपले विशिष्ट अभिप्राय अपिलार्थीस कळविले नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात त्यांच्याकडील सेतू कार्यालयाचे, अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतचे,

उपलब्ध असलेले, सनदी लेखापाल यांच्याकडून प्राप्त झालेले ऑडिट रिपोर्ट व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती निविदापत्रामध्ये कोणत्या कलमाव्दारे कोणत्या पृष्ठावर उपलब्ध आहे त्या कलमांचा, पृष्ठांचा उल्लेख करुन हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांना दंड करण्याची आयोगास विनंती केली आहे. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस माहिती देतांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबंधित माहिती ही असद्‍हेतूने अथवा हेतूपुरस्सर दडवून ठेवल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीची ही मागणी आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ व ४ शी संबधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०७-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोज मारुती कर्डीले, ५६२८, शेरकर गल्ली, सर्जेपुरा, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (टंचाई), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सेतू व ७/१२ संगणकीकरण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८

निर्णय दिनांक १७-०७-२००९

१ श्री. बलबीर सिंग उजागर सिंग शीख, : अपिलार्थी

८९४, गीता निवास, बागडपट्टी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सिटी सर्व्हे नंबर ६८७ च्या संदर्भात एकूण दोन मुद्याव्दारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) श्री. उजागर सिंग शीख मुळमालक मिळकत सि.स.नं. ६८७ यांनी ५ सहधारकांच्या अवैध नोंदीबाबत मा.नगर भूमापन कार्यालय यांच्यावर दाखल केलेल्या दिवाणी दाव्याबाबत सविस्तर लेखी माहिती मिळावी. २) सि.स.नं. ६८७ या मिळकतीवरील ५ सहधारकांच्या नोंदीबाबत मा. दिवाणी न्यायालय अहमदनगर यांचा सहधारकांच्या नोंदी कायदेशीर आहेत आणि

या नोंदी कायम ठेवण्यात यावी. असा मा. नगरभूमापन अधिकारी/कार्यालय अहमदनगर आणि मा. अधिक्षक, भूमिअभिलेख अहमदनगर यांच्या नावे असलेल्या 'आदेशाची' छायांकित प्रत आणि सविस्तर लेखी माहिती मिळावी."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन उपलब्ध करुन घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०५-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मिळकतीशी संबंधित माहितीची धारिका अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे व अवलोकनाअंती ते ज्या माहितीची मागणी करतील ती माहिती नियमानुसार पुरविण्याचे आदेशित केले. यानंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्याच दिवशी उपस्थित राहिले. तथापि संबंधीत धारिकेचे अवलोकन केल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती नको असल्याचे सांगितले. परंतु त्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्याचे कारण दर्शवून त्यांनी अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी आवश्यक ती माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन

दिली होती. तथापि अपिलार्थीने त्या माहितीचे अवलोकन करुन यापैकी कोणतीही माहिती त्यांना नको असे तोंडी सांगून आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नगर भूमापन अधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी मा. लोक आयुक्ताकडे पाठविलेल्या अहवालाच्या संदर्भात सदरचे अपील केलेले आहे. हा अहवाल म्हणजे नगर भूमापन अधिकारी अहमदनगर यांनी मा. लोक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ३०-०४-२००९ रोजी पाठविलेले पत्र असून या पत्राचा संबंध अहमदनगर येथील सिटी सर्व्हे नंबर ६८७ च्या मिळकतीवर दाखल केलेल्या पाच सहधारकांच्या नोंदीच्या संदर्भात आहे. या अहवालाचे अवलोकन करता असे आढळून येते की, या अहवालामध्ये नगर भूमापन अधिकारी यांनी कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे या नोंदी कायम ठेवल्या आहेत. या निर्णयाचा क्रमांक एस. पी. २८३/९६ असा आहे व त्यावरील निर्णय दिनांक २९-०७-९७ असा आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता मा. न्यायालयाच्या दिनांक २९-०७-१९९७ रोजीच्या निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होऊ शकेल असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस दिवाणी दावा क्रमांक २८३/९६ च्या संदर्भात मा. न्यायालयाने दिनांक २९-०७-१९९७ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याने या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बलबीर सिंग उजागर सिंग शीख, ८९४, गीता निवास, बागडपट्टी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९

निर्णय दिनांक १७-०७-२००९

१ श्री. विजय रामभाऊ धनवडे, : अपिलार्थी
रा. शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय,
शेवगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी
वर्ग-१, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी त्यांना माहिती देत नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - श्रीराम देवस्थान ट्रस्ट शेवगांव च्या गट नंबर १३१५ या जागेच्या संदर्भात धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडील हुकूम नंबर जे/४/१२३-८७/८३७ या

परवानगी पत्राची नक्कल व दिनांक ०१-०४-२००६ ते १७-०१-२००९ या कालावधीमध्ये गट नंबर १३१३, १३१४ व १३१५ या जागेसंदर्भात केलेल्या भाडेपट्टा कराराच्या नकल प्रती - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना व्यक्तिशः माहिती अपेक्षित असल्याचे व ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र त्यांनी या अर्जासोबत जोडल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तयार असल्याचे व ही माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थी हे स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये माहिती घेऊन जाण्यासाठी उपस्थित राहिले असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०४-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दुय्यम निबंधक कार्यालय शेवगांव येथून त्यांनी मागणी केलेली माहिती घेऊन जाण्याचे त्यांना सूचित केले. तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १८-०२-२००९, दिनांक २०-०२-२००९ व दिनांक २६-०२-२००९ रोजी माहिती देऊ केली असता ती माहिती अपिलार्थीने नाकारली आहे. त्यांच्या कार्यालयाकडे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता निधी उपलब्ध नसतांना देखील त्यांनी रुपये ४४४

व रुपये १७३४ इतके खर्ची टाकून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थीने वेळोवेळी ही माहिती घेण्याचे नाकारले. त्यामुळे माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार आहेत व तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ मधील अर्जदाराने मागितलेल्या दिनांक ०४-१२-१९८७ च्या धर्मादाय आयुक्त यांच्या पत्राची प्रत त्यांच्या कार्यालयामध्ये त्यांना आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. तथापि मुद्दा क्रमांक एकशी संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये त्यांना आढळून येत नाही. मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे व यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे पुरावा सादर केलेला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात माहिती उपलब्ध आहे. परंतु मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात माहिती उपलब्ध नाही असे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात माहिती देण्याबाबत त्यांनी काही प्रयत्न देखील केले आहेत काय अशी आयोगाने विचारणा केली असता त्यांना समाधानकारक उत्तर देता आले नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांनी धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयाशी स्वतः संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी व ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्याचबरोबर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत

व्यक्तिशः त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून हस्तगत करुन घ्यावी. हा कालावधी व्यपगत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस विनामूल्य माहिती देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजय रामभाऊ धनवडे, संपादक, सा. झटका, वरुर रोड, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक कार्यालय, शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३०

निर्णय दिनांक १७-०७-२००९

१ श्री. अशोक रामचंद्र घायतडक, : अपिलार्थी
रा. सिध्दार्थनगर, जामखेड, तालुका जामखेड,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती,
जामखेड, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००७ व २००८ वर्षातील जामखेड

शहरातील सिध्दार्थनगर व अण्णाभाऊ साठेनगर या दलित वस्तीमध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत कॉंक्रेट व गटारे बांधकामासंदर्भात एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दलित वस्ती सुधार योजनेसाठी मंजूर झालेली रक्कम, ठेकेदाराचे पूर्ण नाव व कागदपत्रासह माहिती, झालेल्या कामाची तपशीलवार माहिती, दलित वस्तीमध्ये चालू असलेल्या कामाची रक्कम कोणत्या योजने अंतर्गत उपलब्ध झाली त्याची माहिती (रक्कम व दिनांक), याच कालावधीमध्ये देण्यात आलेल्या घरकूल लाभधारकांची नावे, दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत राबविल्या जाणा-या कामाची माहिती व सिध्दार्थनगरमध्ये अपूर्ण राहिलेल्या कामाची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर वेळोवेळी सुनावणीच्या तारखा ठेऊन अंतीमतः जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता दिनांक १६-०३-२००९ रोजी आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २३-०३-२००९ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ अंशतः, ३ व ७ व्दारे मागितलेली माहिती ही

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. कारण अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागतांना मोघम स्वरुपात मागितल्याचे दिसून येते. उदा. मुद्दा क्रमांक ३ व ७ च्या संदर्भात झालेल्या कामाची व दलित वस्तीमध्ये अपूर्ण राहिलेल्या कामाची तपशीलवार माहिती मागितली होती. परंतु 'तपशीलवार माहिती' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील व कोणती निश्चित माहिती याचा उल्लेख अपिलार्थीने या अर्जामध्ये केला नसल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ७ शी संबंधीत माहिती देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ चे अवलोकन करता अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे ठेकेदाराचे पूर्ण नांव व कागदपत्रासह माहिती अशी माहिती मागितली आहे. याबाबत ठेकेदाराचे पूर्ण नांव ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. परंतु 'कागदपत्रे' म्हणजे नेमके काय याचा अर्थबोध होणे कोणासही शक्य नाही. तेव्हा अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात ठेकेदाराचे पूर्ण नांव हीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित मुद्दे क्र. १, ४, ५ व ६ शी संबंधित माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस आता, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, वर स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक २ अंशतः, ४, ५ व ६ शी संबंधित माहिती, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता ती माहिती अत्यंत मर्यादित स्वरुपाची असल्याचे आयोगास दिसून येत आहे. तथापि एवढी साधी माहिती देखील संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीस न देता त्यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करण्यास भाग पाडले आहे. ही बाब संबंधित ग्रामसेवक व तसेच अहमदनगर जिल्हा परिषदेस निश्चितच भूषणावह नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे बांधकामासंदर्भात त्यांचे सर्व अभिलेखे व्यवस्थितपणे ठेवले गेले असते तर अपिलार्थीने मागणी

केलेली माहिती देण्यासाठी त्यांना एक दिवसापेक्षा जास्त कालावधी लागला नसता. परंतु ज्या पध्दतीने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले आहे हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हेच कारण अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न होण्यासाठी कारणीभूत आहे, असे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ करण्याच्या त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला या प्रकरणी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना, त्यांची बाजू मांडण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस त्यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रतिसाद न दिल्याचे त्यांना मान्य आहे असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण देय माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील या निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगा-कडे सादर करावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक रामचंद्र घायतडक, रा. सिध्दार्थनगर, मु. पो. तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती, जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३१

निर्णय दिनांक १७-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | कमळाकर प्रभाकर भावसार,<br>रा. कोर्ट रोड, कोपरगांव, तालुका कोपरगांव,<br>जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नगर परिषद अभियंता, कोपरगांव नगरपरिषद,<br>कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव,<br>तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर | : प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २२-१२-२००८ रोजी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होत नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाव्दारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - सन १९६९ व १९७६ साली गोदावरी नदीस आलेल्या महापुरामुळे तत्कालीन पुरग्रस्त कुटूंबांना कायम पुनर्वसनासाठी कोपरगांव नगरपरिषदेमार्फत गट क्रमांक ११४/१, ११४/२ ब व ११३/१ व ११३/२ इत्यादी शासकीय भूखंड बहाल करण्यात आले होते. सदर शासकीय भूखंड हे ज्या अधिकृत पूरग्रस्त कुटूंबास बहाल करण्यात आलेले होते, त्या कुटूंबाची अधिकृत शासकीय यादी दिनांकासह व सदर भूखंड प्लॉट प्रमाणे वाटप केले होते किंवा कसे व महाराष्ट्र शासनाचे पूरग्रस्त कुटूंबांना भूखंड बहाल करण्यात आलेले लक्ष्मीनगर भागाचा भूखंडाचा अधिकृत नकाशा- ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे नमूद केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०४-२००९ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले परंतु अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात कोणतेही आदेश पारित केले नाहीत. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना मूळ माहितीची आजही आवश्यकता असल्याचे आयोगास सांगितले.

संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या कोणत्याही प्रश्नांना उत्तरे देता आली नाहीत त्यांच्या सुनावणीवरुन एवढेच अवगत झाले की, अपिलार्थीने ज्या विषयावरील माहितीची आयोगाकडे मागणी केली आहे तो विषय जिल्हाधिकारी, अहमदनगर व महसूल विभाग मंत्रालय यांच्याशी संबधित होता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडील विभागाशी संबंधित नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून देऊन त्याची प्रत अपिलार्थीस देणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून अपिलार्थीस आतापर्यंत अपेक्षित असलेली माहिती प्राप्त न होण्यासाठी ते जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने त्यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ज्या ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्या त्या प्राधिकरणाशी त्यांनी स्वतः संपर्क साधून अपिलार्थीस ही माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ कमळाकर प्रभाकर भावसार, रा. कोर्ट रोड, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद अभियंता, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२

निर्णय दिनांक १७-०७-२००९

१ श्री. साबळे अरुण दौलत, : अपिलार्थी
रा. ढोरजळगांव, तालुका शेवगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दिनांक

१६-१२-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती यांनी वेळेत दिली नसल्याने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे " सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता पाचवी ते दहावी (एस. एस. सी.) मागासवर्गीय मुलींचे शिष्यवृत्तीबाबत सविस्तर माहिती " मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन संस्थानिहाय त्यांनी वाटप केलेल्या शिष्यवृत्तीचा तपशील त्यांनी अपिलार्थीस पुरविला. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०२-२००९ रोजी सुनावणी घेतली व या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित विद्यालयाकडून माहिती घेऊन पुरविली, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि आज रोजी त्यांना कोणताही पुरावा आयोगास दाखविता आला नाही. त्यांनी या पृष्ठ्यर्थ दाखविलेल्या प्रत्येक पत्रावर वेगवेगळी तारीख नमूद केली असून पत्रावरील टंकलिखित केलेला दिनांक व प्रत्यक्षात पत्र पाठविल्याचा दिनांक यामध्ये एक महिन्याचा फरक असल्याचे आयोगास आढळून येत आहे. यावरुन आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या विधानावर आयोग विश्वास ठेवत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण मुद्देनिहाय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे आयोग त्यांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर हे सुनावणीसाठी उपस्थित न राहिल्याने व आज रोजी कार्यालयीन अधीक्षकास कोणताही समाधानकारक खुलासा करता न आल्याबद्दल तीव्र शब्दात असमाधान व्यक्त करत आहे, याची त्यांनी नोंद घ्यावी व येथून पुढे अपिलार्थीने मागितलेली अशा प्रकरणाशी संबंधित माहिती ज्या कर्मचा-याला ज्ञात आहे अशाच कर्मचा-याला आयोगाकडील सुनावणीसाठी पाठवावे मग तो कर्मचारी चतुर्थश्रेणीतील असला तरी चालेल, म्हणजे आयोगास काम पार पाडणे सोईचे होईल.

उपरोक्त प्रकरणी जिल्हा परिषदेच्या अधिका-यांनी आयोगासमोर उपस्थित राहण्यासंदर्भात जे औदासिन्य दाखविले आहे त्याची आयोगाने दखल घेतली आहे याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर

दिनांक १७-०७-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साबळे अरुण दौलत, रा. ढोरजळगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३३/०९, ३४/०९ व ३५/०९**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३, ३४ व ३५

निर्णय दिनांक १७-०७-२००९

१ श्री. राज रजत चौधरी, अपिलार्थी
लोणी खुर्द, तालुका राहाता,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
रो. ह. यो. (कार्य) विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
रो. ह. यो. (कार्य) विभाग, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०४-२००९ रोजी एकाच माहितीसाठी दाखल केलेली तीन वेगवेगळी व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील तीनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस या तीनही प्रकरणांशी संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या तीनही अपील अर्जासंदर्भातील माहिती एकच असून अपिलार्थीने ती एकाच दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केली असल्याने या अपील अर्जांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, उपरोक्त तीनही प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०७-११-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण चौदा मुद्दयाव्दारे विस्तृत व मोठ्या प्रमाणात माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये - विभागास प्राप्त झालेला निधी, तो कोणत्या कामावर, किती खर्च झाला, शाखा अभियंत्यांना नेमून दिलेली कामे, कोणती पूर्ण झाली, कोणकोणती अपूर्ण राहिलीत, कोणकोणती चालू आहेत, विभागाने अदा केलेल्या बिलाबाबत माहिती, लहान मोठ्या कामांची संख्या, शाखा अभियंता यांची नांवे, शाखा अभियंता यांच्या विरोधात आलेल्या सर्वच तक्रारीचीछायांकीत प्रती, सीआर अंतर्गत झालेली कामे, वरिष्ठ अधिका-यांच्या निरीक्षण प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-११-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात असल्याने त्या माहितीची त्यांच्या कार्यालयात येऊन तपासणी करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती ही संबंधित उपविभागाकडे उपलब्ध असल्याने त्यांनी दिनांक १०-११-२००८ रोजी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित उपविभागाकडे पाठवून दिली. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०१-२००९ प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन

अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे ही व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही माहिती प्राप्त झाली नाही. तसेच संबंधित उपविभागांनी देखील त्यांना तीस दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे केली आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे व अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी कराव्या लागणा-या खर्चाकरिता त्यांच्याकडे अनुदान उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून समक्ष पाहण्यासाठी सुचविले होते. अपिलार्थीने देखील हे प्रथम अपील सुनावणीमध्ये कबूल केले आहे. आज रोजी देखील अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडे कोणतेही अनुदान शिल्लक नाही.

वरील घटनाक्रम, दोनही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अत्यंत विस्तृत प्रमाणात व मोठ्या व्याप्तीची अशी आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता त्यावरुन असे दिसून येते की, यातील काही माहिती अपिलार्थीस देय होणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, कारण शाखा अभियंता यांच्या विरुध्द त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या चौकशीची कारवाई त्यांच्याकडे चालू आहे व ही माहिती उघड केल्याने त्या चौकशीच्या कामात अडथळे निर्माण होतील असा त्यांनी युक्तिवाद केला आहे. सबब सद्यस्थितीत त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय असणार नाही, तसेच ही माहिती उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल असे आयोगासही वाटत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १०, ११

व १३ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणा-या स्वरुपाची माहिती मागितली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या पूर्णतः विसंगत आहे, मात्र उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. परंतु आता ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती यांच्याकडे पुरेसे अनुदान नाही, त्याचबरोबर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात झालेल्या सुनावणीच्या वेळी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहण्याचे कबूल केले आहे व या म्हणण्यास अपिलार्थीने आज रोजी दुजोरा दिला आहे हे पाहता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश निर्गमित होताच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात तीस दिवसाच्या आत स्वतः उपस्थित राहून उर्वरित मुद्दयावरील देय माहितीची पाहणी करावी व त्यांना आवश्यक वाटल्यास ही माहिती स्वहस्ते व विनामूल्य लिहून घ्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात अपिलार्थीने असे आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांना ही माहिती उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, अहमदनगर, पाथर्डी व शेवगाव यांच्याकडून अद्याप प्राप्त झाली नाही. यासंदर्भात संबधित उप अभियंता यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित असलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली तीनही व्दितीय अपिले (अपील क्रमांक ३३/२००९, ३४/२००९ व ३५/२००९) अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ३३/२००९, ३४/२००९ व ३५/२००९ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३.	उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, अहमदनगर, पाथर्डी व शेवगाव यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर	( वि. बा. बोरगे )

दिनांक	१७-०७-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. राज रजत चौधरी, लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२	जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (कार्य) विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६	जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रो. ह. यो. (कार्य) विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०५०

निर्णय दिनांक १७-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अख्तर सिकंदर शेख,<br>रा. भैरवनाथ चौक, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा प्रशासन अधिकारी, जिल्हा रुग्णालय, अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०४-२००९ रोजी फेर नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०१-२००८ रोजी अर्ज केला असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अंतिमतः आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१ जानेवारी २००७ ते १०-०१-२००८ या कालावधीत त्यांच्या कार्यालयातर्फे आजारीपणाच्या रजेचे मेडिकल सर्टिफिकेट ज्या ज्या व्यक्तिंना दिले आहे त्यांची नावे, पत्त्यासह यादी व कोणत्या कारणास्तव मेडिकल सर्टिफिकेट दिले याबाबत माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जाची देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल न घेता अपिलार्थीचा अपील अर्ज विना कार्यवाही त्यांच्याकडे ठेऊन घेतला. अशा प्रकारे अपेक्षित माहितीपासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन प्रथमतः असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे विहित कालावधीत देणे त्यांना अनिवार्य आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर जन माहिती अधिकारी यांना देणे शक्य नव्हते तर त्यांनी अधिनियमातील कलम ७ (८) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस तसे कळवावयास हवे होते. परंतु या प्रकरणी संबंधित जन माहिती

अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची अक्षम्य उपेक्षा करुन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी हे या प्रकरणी अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न घेऊन जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक (श्री. एम. एन. मुंडे) यांनी आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाई व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद सचिव (आरोग्य सेवा) त्यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अख्तर सिकंदर शेख, रा. भैरवनाथ चौक, श्रीगोंदा, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (आरोग्य सेवा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८८

निर्णय दिनांक १८-०७-२००९

१ श्री. बापू गंगाधर भालेकर, : अपिलार्थी
मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने केलेले असून या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय न दिल्याने व माहिती अधिका-याने त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यक्षेत्रातील नगर ते कोपरगांव रस्ता चौपदरीकरणाच्या बांधकामासंदर्भात काही माहिती मागितली होती. या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन यासंदर्भात आवश्यक तो पुरावा त्यांच्या प्रथम अर्जासोबत जोडला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जावर दहा रुपयाचा स्टॅम्प न लावल्याने व त्यामुळे त्यांचा अर्ज अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीचा मूळ अर्ज अपिलार्थीस परत पाठविला. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प न लावल्याने अपिलार्थीस त्यांना माहिती देता आली नाही असे सांगितले तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपिकाने अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे सादर न केल्याने त्यांना अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय घेता आला नाही असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थी हे दारिद्र्य-रेषेखालील व्यक्ती असल्याने त्यांना अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीनुसार ही माहिती विनामूल्य देय होते. तेव्हा दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीच्या माहितीसाठीच्या

अर्जावर दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प लावणे त्यांना आवश्यक नाही एवढी साधी बाब देखील या ठिकाणी संबंधित जन माहिती अधिकारी यांना माहित नसल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी तर याच्यावरही कडी करुन त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपिकाने त्यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर न केल्याने त्यांना अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेता आला नाही असे अत्यंत बेजबाबदारपणाचे उत्तर आयोगास दिले. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०९-२००८ रोजीचे पत्र पाठविल्याबाबतचा पुरावा त्यांच्याकडे मागितला असता तो देखील त्यांना आयोगास दाखविता आला नाही. यावरुन सार्वजनिक बांधकाम विभागातील क्षेत्रिय अधिका-यांचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अंमलबजावणीबाबत किती उदासीन दृष्टीकोन आहे हे स्पष्ट होते. आज रोजी आयोगासमोर उपस्थित असलेल्या दोनही अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियमाचे कोणतेही ज्ञान नसल्याचे आयोगास प्रतीत झाले आहे. आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या अधिका-यांची नावे श्री. बी. डी. बलखंडे, कार्यकारी अभियंता व श्री. आर. व्ही. अंधारे उपकार्यकारी अभियंता अशी आहेत. या दोनही अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची व अकार्यक्षमतेची नोंद सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन करता असे आढळून येते की, या अपिल अर्जावर अपिलार्थीने आवश्यक ते वीस रुपये किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकविले नाही अथवा इतर कोणत्याही माध्यमाव्दारे या शुल्काचा भरणा केलेला नाही. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना फक्त विनामूल्य माहिती देय आहे मात्र प्रथम व व्दितीय अपील करतांना त्यांना राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात दिनांक ११ ऑक्टोबर २००५ प्रमाणे वीस रुपये इतके कोर्ट स्टॅम्प त्यांच्या अपील अर्जावर डकविणे अनिवार्य आहे आणि या मूळ अटीची उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने पुर्तता न

केल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बापू गंगाधर भालेकर, मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८९

निर्णय दिनांक १८-०७-२००९

१ श्री. अलि नूरमोहंमद बागवान, : अपिलार्थी

घर नं. ४३८६, डॉ. पुंडे हॉस्पिटल मागे, कोर्टगल्ली,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नगररचनाकार, अहमदनगर महानगरपालिका,

अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपायुक्त (सामान्य),

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. रहिम इनामदार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-११-२००८ रोजी फेर नोंदणी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहिती-करिता वाजवीपेक्षा जास्त शुल्क आकारणी केली, त्यांनी केलेली मागणी ही ठराविक कागदपत्रासंबंधी असतांनाही अतिरिक्त कागदपत्रे देऊन त्यांच्याकडून जास्त पैसे घेतले व त्यांच्या घराची खिडकी बंद करुन घरासमोरील नालीवर ओटा बांधून जाळी बंद करुन त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण केला असल्याचे नमूद केले आहे. याच अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे

अभिप्राय दिले आहेत की, राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाने कायद्यात तरतूद नसतांना विलंब लावून त्यांचा व्दितीय अपील अर्ज त्यांच्याकडे परत पाठविला. वास्तविक राज्य माहिती आयोग महानगरपालिकेकडून त्यांच्या व्दितीय अपील अर्जासंदर्भातील कागदपत्रे मागवून घेऊ शकले असते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या व्दितीय अपिलामध्ये असलेल्या त्रुटीमुळे त्यांचा व्दितीय अपील अर्ज प्रथमतः नाकारला हे न्यायाच्या दृष्टीने योग्य नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे "त्यांनी लोकशाहीदिनात श्री. रहीम इनामदार यांनी महानगरपालिका जागेत अतिक्रमण केल्याबाबत दिलेल्या बारा अर्जाच्या झेरॉक्स प्रती व या अर्जावर महानगरपालिकेने काय कारवाई केली व काय शेरे मारले याचा तपशील" अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १८८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानंतर या शुल्काचा अपिलार्थीने दिनांक ११-१०-२००७ रोजी महानगरपालिकेकडे भरणा केल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती त्याच दिवशी देण्यात आली. तथापि प्राप्त झालेल्या माहितीपोटीच्या शुल्काबाबत शंका असल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-११-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. यावर व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या बारा अर्जासंदर्भात केलेल्या कारवाईकरिता त्यांच्याकडे माहिती मागितली आहे, त्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयात तयार झालेल्या नस्तीमधील सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस पाठविल्या आहेत. या सर्व प्रतींची संख्या ९४ इतकी झाली असून ९४ पानांच्या माहितीकरिता प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे रुपये १८८ इतके शुल्क आकारण्यात आले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे फक्त बारा अर्जांच्या प्रतीची मागणी केली होती व त्यांच्या अर्जावर अहमदनगर महानगरपालिकेने काय कारवाई केली आणि काय शेरे मारले अशीही माहिती मागितली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर झालेल्या कारवाईवर माहिती मागितल्यानंतर अर्जदाराला संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी तक्रार अर्ज केल्यानंतर यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ज्या ज्या प्राधिकरणाशी पत्रव्यवहार केला असेल अथवा त्यांच्या तक्रार अर्जासंदर्भात त्यांच्याकडील अभिलेख्यात ज्या नोंदी केल्या असतील त्या पत्रव्यवहाराच्या व नोंदीच्या प्रती त्यांनी अर्जदारास देणे भाग आहे. या प्रकरणी नेमके असे घडले असून अपिलार्थीने केलेल्या तक्रार अर्जांवर मनपा अधिका-यांनी वेगवेगळया अधिका-यांना दिलेल्या सूचना व केलेली कारवाई व त्याच्याशी संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस दिल्या आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या बारा अर्जाच्या प्रतींच्या संदर्भात जर या अर्जामध्ये बारा प्रती असतील तर अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे बारा प्रतीचे २४ रुपये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरावे लागतील तथापि या अर्जावर झालेल्या कारवाई संबंधाने देखील अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या विनंतीवरुन त्यांना संपूर्ण माहिती दिली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी

अर्जदारास ९४ पानांची माहिती देण्यासाठी १८८ रुपये इतके शुल्क आकारण्याची त्यांची कृती बरोबर आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये डुप्लिकेट कागदपत्रे त्यांना देऊन जास्त पैसे जन माहिती अधिकारी यांनी घेतले असे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली नेमकी डुप्लिकेट कागदपत्रे कोणती हे आयोगास स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. याच अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या घरासमोरील नालीवर ओटा बांधून जाळी बंद करुन जाणूनबुजून आरोग्यास धोका निर्माण केला आहे, असे मोघम विधान या अर्जामध्ये केले आहे. यासंदर्भात त्यांची जी काही तक्रार आहे ती त्यांनी योग्य त्या प्राधिकरणाकडे तक्रार अर्ज करुन तडीस न्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडून अशी अपेक्षा केली आहे की, त्यांच्या व्दितीय अपील अर्जाच्या त्रुटींची पुर्तता राज्य माहिती आयोगाने परस्पर संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून करुन घ्यावयास हवी होती. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज सादर करतांना या अपील अर्जासोबत जी कागदपत्रे जोडणे अर्जदारास अनिवार्य आहे ती अर्जदाराने प्रथमतः जोडली नाहीत. आयोग अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जाची त्यांच्या पातळीवर छाननी करुन त्यात त्रूटी आढळल्यास, परस्पर संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून, त्यांचे निराकरण करत नाही. आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करतांना व्दितीय अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडणे हे अपिलार्थीचे कर्तव्य आहे व ते त्यांनी या प्रकरणी योग्य पध्दतीने पार पाडलेले नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अलि नूरमोहंमद बागवान, घर नं. ४३८६, डॉ. पुंडे हॉस्पिटल मागे, कोर्टगल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य), अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९९०

निर्णय दिनांक १८-०७-२००९

१ श्री. विलास मारुती माळी, : अपिलार्थी
मु. वळदगांव, पोस्ट उंबरगांव, तालुका श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०९-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, या सुनावणीमध्ये त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी हे व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सुभद्रामाता आशिर्वाद माध्यमिक विद्यालय, साके या शाळेची, त्यांनी मागणी केलेल्या दाव्यासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील पत्र क्रमांक माशा/११ (१२२०५) ची प्रत, जिल्हा परिषद कोल्हापूर शिक्षण माध्यमिक विभागाकडील पत्र दिनांक १५-०७-२००५ पत्राची प्रत, संबधित कर्मचारी यांना दिनांक १८-०७-२००५ रोजी स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन दिलेले हमीपत्र, उच्च न्यायालय, मुंबई, सह दिवाणी न्यायालय, कागल, शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर व सह धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांच्याकडील दावे मागे घेतलेल्या पत्राची प्रत व शिक्षण विभागाकडील दिनांक १७-०२-२००६ ची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करावी असे त्यांना सूचित केले व या पत्राची प्रत संबंधित मुख्याध्यापकांना पाठवून त्यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत देखील पाठविली. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०९-२००८ रोजी ठेवली होती, तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीचे पत्र अपिलार्थीस उशिरा प्राप्त झाल्याने अपिलार्थी सुनावणीस हजर राहू शकले नाहीत. यानंतर अपिलार्थीने परत त्यांच्या दिनांक ०४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना या सुनावणीत झालेला निर्णय कळविण्याची विनंती केली. तथापि या नंतरही अपिलार्थीस जन माहिती अथवा अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या वतीने आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून ते ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. आयोगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून त्यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस विनामूल्य देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीचा समावेश असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस एक दिवसाच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने मान्य केले आहे हे पाहता, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच एक दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात शिक्षण विभागाच्या बहुतांश क्षेत्रीय कार्यालयासंदर्भात आयोगास असे आढळून आले आहे की, अर्जदाराने मागितल्यानंतर शिक्षणाधिका-याच्या कार्यालयातील माहिती देखील शिक्षणाधिकारी नेहमी अर्जदारांना संबधित शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापकाकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे सूचित करतात. या प्रकरणी देखील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी असेच केले आहे. वास्तविक पाहता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या ताब्यात होती तरी देखील त्यांनी अपिलार्थीस स्वतः होऊन ही माहिती न देता अपिलार्थीस संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. त्यांची अशा प्रकारची कृती ही सर्वथा गैर व चुकीची आहे. इतःपर त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी स्वंयप्रेरणेने अर्जदारास जास्तीत जास्ती माहिती कशी देता येईल अशी आपली मनोभूमिका जोपासावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून

सबळ कारणाशिवाय जास्त काळ वंचित ठेवल्याबद्दल संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना आयोगातर्फे सक्त ताकीद येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच एका दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विलास मारुती माळी, मु. वळदगांव, पोस्ट उंबरगांव, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९९१

निर्णय दिनांक  १८-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. भारत बाबुराव आरगडे,<br>रा. सौंदाळा, पो. भेंडा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,<br>नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा,<br>तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०५-२००८ रोजी प्रथम अपील सादर केले होते व ते जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ०५-०६-२००८ रोजी पोहोचले. तथापि या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही व त्यांना माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गॅस सिलेंडर वितरण प्रक्रियेसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०६-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी झाली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी हजर नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे इष्ट राहिल, असे आयोगास वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झ ाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भारत बाबुराव आरगडे, रा. सौंदाळा, पो. भेंडा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९९२

निर्णय दिनांक १८-०७-२००९

१ श्री. राम नागूशेठ धोत्रे, : अपिलार्थी
चितळे रोड, ४२३३, पापय्या गल्ली, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे केडगाव भूषणनगर पासून पुढील कल्याण, पुणे रस्त्याच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही बरीचशी प्रश्नार्थक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणा-या अशा स्वरुपाची असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांच्याकडे केला होता. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी हा अर्ज दिनांक ०१-०७-२००८ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांच्याकडे व नंतर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांनी या प्रकरणाशी संबधित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर यांच्याकडे दिनांक १५-०७-२००८ रोजी पाठविला. यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०९-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस तात्काळ माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेनुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४-१०-२००८ रोजी अपिलार्थीस ही माहिती पोस्टाने पाठविली. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रा-अभावी कळण्यास मार्ग नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४-१०-२००८ रोजी पोस्टाने माहिती पाठविल्याचे आयोगास अवगत केले व यासंदर्भातील योग्य तो पुरावा आयोगास सादर केला. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या कथित

माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद दिला असल्याने त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जावर त्यांनी येथून पुढे सतर्कतेने कार्यवाही करावी. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली असूनही अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. त्यांना निश्चितपणे कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही हे आयोगास अवगत करुन देण्यासाठी अपिलार्थी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर अधीक्षक अभियंता यांच्या स्तरावर अक्षम्य विलंब झाला आहे. वास्तविक पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अधीक्षक अभियंता यांचे मुख्यालय एकाच ठिकाणी असल्यामुळे अपिलार्थीचा दिनांक ०३-०६-२००८ रोजीचा मूळ अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे पाठविणे आवश्यक होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अशी कृती केली नाही त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे हाताळतांना त्यांनी भविष्यात ती काळजीपूर्वक हाताळावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राम नागूशेठ धोत्रे, चितळे रोड, ४२३३, पापय्या गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९९३

निर्णय दिनांक १८-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रामभाऊ जयवंत शिंदे,<br>श्री. गुरुदत्त ५००/२, शाहूनगर बसस्टॉपजवळ, शाहूनगर,<br>केडगांवदेवी, तालुका जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर जिल्हा कृषि विभाग कर्मचारी पतसंस्था मर्यादित अहमदनगर संचालकांनी संस्थेकडे ५८ (ए) नुसार दिलेल्या बंधपत्रकाच्या सत्यप्रतीची मागणी केली होती.

अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने अपेक्षिलेली माहिती संबंधित पतसंस्थेशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज अहमदनगर जिल्हा कृषि सेवकांच्या सहकारी पतसंस्थेकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार पाठविला. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०-११-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस संबंधित पतसंस्थेने बंधपत्रे दिनांक ०८-१०-२००८ रोजी दिली असल्याने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज फेटाळला. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना अद्यापही संबंधित पतसंस्थेकडून श्री. घाडगे व श्री. सोन्याबापू गायकवाड यांच्या बंधपत्राच्या प्रती प्राप्त झाल्या नाहीत. यासंदर्भात संबंधित पतसंस्थेच्या सचिवांनी आयोगास असा खुलासा केला की, पतसंस्थेने श्री. घाडगे व श्री. सोन्याबापू गायकवाड यांच्याकडून बंधपत्रे घेतली नाहीत त्यामुळे ती त्यांना पुरविता आली नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः अपूर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येते. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या बंधपत्रामध्ये श्री. घाडगे व श्री. सोन्याबापू गायकवाड यांच्या बंधपत्राचा समावेश नव्हता. मूळात संबंधित संस्थने श्री. घाडगे व श्री. सोन्याबापू गायकवाड यांच्याकडून ही बंधपत्रे घेतली नसल्याने

त्यांनी यासंबंधी वस्तुस्थिती ही अपिलार्थीस कळवावयास हवी होती. तथापि त्यांनी ही वस्तुस्थिती अपिलार्थीस कळविली नाही व परिणामी अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्यास भाग पडले. ही वस्तुस्थिती पाहता, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणातील संस्थेच्या सचिवांनी आयोगासमोर विदित केलेली वस्तुस्थिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी.

अहमदनगर                                        ( वि. बा. बोरगे )

दिनांक    १८-०७-२००९                              राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामभाऊ जयवंत शिंदे, श्री. गुरुदत्त ५००/२, शाहूनगर बसस्टॉपजवळ, शाहूनगर, केडगांवदेवी, तालुका जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, अहमदनगर जिल्हा कृषि विभाग कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित,

अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९९४

निर्णय दिनांक १८-०७-२००९

१ श्रीमती आढाव अलकादेवी लक्ष्मणराव, : अपिलार्थी
सौ. औटी अंजली गोरक्षनाथ,
पार्वती निवास, लोहार गल्ली, राहुरी, तालुका राहुरी,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका, बाल विद्या मंदिर, राहुरी, तालुका
राहुरी, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, राहुरी,
तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही माहिती अधिका-याने त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०३-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. त्यापैकी मुद्दा क्रमांक १ व्दारे कर्मचा-यांच्या पगारातून बेकायदेशीर कपात करुन रक्कम बँकेत ठेवण्याचे अधिकार मुख्याध्यापकास आहेत काय ? तसेच बेकायदा कपातीच्या रकमा कोणत्या बँकेत किती व कशा पध्दतीने व कोणत्या खाते नंबरमध्ये ठेवल्या याबाबतची माहिती, मुद्दा क्रमांक २ व्दारे शाळेत कार्यरत असतांना तसेच अपिलार्थीने आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली असतांना इतर शिक्षक / शिक्षिका सोडून फक्त अपिलार्थीच्याच भविष्य निर्वाह निधीची रक्कम / खाते नगर कार्यालयाकडे का वर्ग करण्यात आले नाही ? मुद्दा क्रमांक ३ व्दारे राहुरी नगरपालिका शिक्षण मंडळाने त्यांच्या दिनांक २३-१२-२००५ च्या पत्राच्या अनुषंगाने पाठविलेल्या जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक ३१-१२-२००५ रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारला नाही त्यामुळे त्यांनी दिनांक २४-०२-२००६ रोजी पाठविलेला अर्ज व मनीऑर्डर अपिलार्थीकडे परत आल्याचे त्यांनी सांगितले. तथापि हा अर्ज आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावर उपलब्ध नाही. या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेऊन दिनांक ०८-०६-२००६ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी मुख्याध्यापिका, बाल विद्या मंदिर राहुरी यांना अपिलार्थीच्या अपील अर्जावर कार्यवाही करण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोनही पक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतला असता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ पैकी काही भाग व मुद्दा क्र. ३ वगळता उर्वरित कोणतीही माहिती त्यांना जन माहिती

अधिकारी यांच्याकडून  देय होत नाही.  कारण या अर्जातील सर्व मुद्दयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण व खुलासा मागितला आहे.  अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात त्यातील  जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या कपात केलेल्या रकमा कोणत्या बँकेत व कोणत्या खाते नंबरमध्ये ठेवल्या याची माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे द्यावी लागेल.  अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या बाबत देखील हाच युक्तिवाद लागू होतो.  अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दल खुलासे व कारणे विचारली आहेत.  अशा प्रकारची माहिती अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.  अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

वरीलप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांना देय असलेली माहिती यांचे पृथ:करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली मुद्दा क्रमांक ३ मधील  दिनांक ३१-१२-२००५ ची प्रत व या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे सादर केलेले त्यांचे म्हणणे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१.	अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, बाल विद्या मंदिर, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती आढाव अलकादेवी लक्ष्मणराव, सौ. औटी अंजली गोरक्षनाथ, पार्वती निवास लोहार गल्ली, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, बाल विद्या मंदिर, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९९५

निर्णय दिनांक १८-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती आढाव अलकादेवी लक्ष्मणराव,<br>पार्वती निवास, लोहार गल्ली, राहुरी, तालुका राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापिका, बाल विद्या मंदिर, राहुरी, तालुका<br>राहुरी, जिल्हा अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव, राहुरी एज्युकेशन सोसायटी, राहुरी,<br>तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी अपील स्वीकारुनही त्याची कोणतीही दखल घेतली नाही. मुख्याध्यापिका, बाल विद्या मंदिर, राहुरी यांनी त्यांना माहिती दिली नाही त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शिक्षण उप संचालक पुणे यांनी आदेश देऊनही बेकायदेशीर कपातीची रक्कम त्यांनी अद्याप परत का केली नाही याबाबतची माहिती तसेच बेकायदेशीर कपातीची रक्कम व्याजासह परत करण्याबाबत आपण काय कार्यवाही केली आहे किंवा करत आहात याबाबतची माहिती व शिक्षण उप संचालक पुणे यांच्या दिनांक १३-०२-२००८ चे आदेशास अनुसरुन माहिती अधिका-याने पाठविलेल्या कारवाई अहवालाची नक्कल, या माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३९ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने ही रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरव्दारे पाठविली असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी ती रक्कम स्वीकारली नाही व अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात देखिल काहीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, राहुरी एज्युकेशन सोसायटी, राहुरी यांच्याकडे दिनांक १३-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने आणि आता शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या आदेशान्वये प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी यांची संबंधित जिल्हयातील शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली असल्याने, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या दिनांक १३-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची एक प्रत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे प्रथमतः त्वरित हस्तांतरीत करावी जेणेकरुन जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या अपील अर्जावर त्वरित सुनावणी घेणे सुलभ होईल.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहेत.

२.	शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सदर अर्ज प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

अहमदनगर	( वि. बा. बोरगे )

दिनांक	१८-०७-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्रीमती आढाव अलकादेवी लक्ष्मणराव, पार्वती निवास लोहार गल्ली, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, बाल विद्या मंदिर, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	सचिव, राहुरी एज्युकेशन सोसायटी, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ९९६/२००८, ९९७/२००८, ९९८/२००८ व ९९९/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९९६, ९९७, ९९८ व ९९९

निर्णय दिनांक १८-०७-२००९

१ श्री. शेख सईद मोहम्मद इब्राहीम, : अपिलार्थी
घर नं. ५१८२ - अ, महानगरपालिका रोड, पांचपीर चावडी,
अहमदनगर

**विरुध्द**

अपील क्रमांक ९९६/२००८ व ९९९/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव / अध्यक्ष, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल,
३२१/२, सावेडी, अहमदनगर

अपील क्रमांक ९९७/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा प्राचार्य, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल, ३२१/२,
सावेडी, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,अहमदनगर

अपील क्रमांक ९९८/२००८

१ जन माहिती अधिकारी तथा

प्राचार्य, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल, ३२१/२, सावेडी,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सचिव / अध्यक्ष, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल,
३२१/२, सावेडी, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष अपील क्रमांक : प्राचार्य, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल, ३२१/२,
९९६/०८ व ९९९/०८ सावेडी, अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०१-२००८, दिनांक ०३-०१-२००८, दिनांक २९-०२-२००८ व दिनांक २२-०१-२००८ रोजी दाखल केलेली अनुक्रमे अपील क्रमांक ९९६/२००८, ९९७/२००८, ९९८/२००८ व ९९९/२००८ ही चार स्वतंत्र व्दितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

ही सर्व अपिले अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळाल्याने आयोगाकडे केली आहेत. यामध्ये आयोगास असे आढळून आले आहे की, या चारही अपील अर्जापैकी अपील क्रमांक ९९७/२००८ वगळता अपिलार्थीने सचिव / अध्यक्ष, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल, सावेडी, अहमदनगर यांच्याकडे यासंदर्भात अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०१-०९-२००७ आणि २९-१०-२००७ रोजी प्रथम अपिले केली आहेत व अपील क्र. ९९६/२००८ व ९९९/२००८ च्या संदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे माहिती मागवून यासंदर्भात सचिव / अध्यक्ष, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल, सावेडी, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १८-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

अपिलार्थीने या चारही अपिलाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता अपिलार्थीच्या या प्रकरणी त्यांनी सचिव / अध्यक्ष, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल, सावेडी, अहमदनगर यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे या टप्प्यावर आयोगास आवश्यक वाटते. आता शिक्षण संचालनालयाने शिक्षण संस्थांच्याबाबत त्यांचेकडील आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिका-याची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली असल्याने अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त चारही अपील प्रकरणी त्यांनी केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या प्रती शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत सादर कराव्यात व अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जांवर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी सदर अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर तीस दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशांनी समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली चारही व्दितीय अपिले (अपील क्रमांक ९९६/२००८, ९९७/२००८, ९९८/२००८ व ९९९/२००८) निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ९९६/२००८, ९९७/२००८, ९९८/२००८ व ९९९/२००८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या वरील निर्णयामध्ये निर्देशित केलेल्या सर्व प्रथम अपील अर्जांवर, सदर अपील अर्जांच्या प्रती अपिलार्थीकडून प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख सईद मोहम्मद इब्राहीम, घर नं. ५१८२ - अ महानगरपालिका रोड, पांचपीर चावडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल, ३२१/२, सावेडी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव / अध्यक्ष, ऑक्झिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल, ३२१/२, सावेडी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सीआर /१
निर्णय दिनांकः २०-०७-२००९

१. श्री. दराडे महादेव जगन्नाथ, : अपिलार्थी
ता.नेवासा, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,नेवासा,जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, नेवासा, जि.अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : अंबिका महिला सोसायटी मार्फत चालविण्यात येणारे स्वस्त धान्य दुकानदार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्याने विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - नेवासा तालुक्यातील अंबिका महिला सोसायटी, वंजारवाडी यांच्यामार्फत चालविण्यात येत असलेल्या स्वस्तधान्य दुकान व रॉकेल दुकानाला सुरुवातीपासून ते अपिलार्थी

यांनी अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत दिलेला रॉकेलचा दरमहा कोटा व त्यापैकी किती विक्री झाली व रॉकेल कोणाकोणास विकले - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे विनाकार्यवाही तसाच ठेवून दिला. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार अनिवार्य होत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने अपिलार्थीस आता अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार ही माहिती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज दि. २९.०८.२००८ व त्यासंदर्भातील दि.०१.१०.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही तसेच अपिलार्थीने त्यांच्याकडील दि.११.१०.२००८, ०१.११.२००८ व २६.११.२००८ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीसाठी पाठपुरावा केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती व अपिलीय अधिकारी या दोघांपैकी कोणाच्याही पातळीवर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सकारात्मक कार्यवाही केली गेली असल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, आयोगाच्या दृष्टीत्पत्तीस येत नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस न देण्याचे कोणतेही कारण समर्थनीय असू शकत नाही. त्यामुळे या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय, दीर्घ कालावधीकरिता त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब महसूल आयुक्त,नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे व संबंधित तहसीलदाराच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्य नोंद घेण्याचे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

1. अपील मान्य करण्यात येत आहे.

2. जन माहिती अधिकारी, यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

3. महसूल आयुक्त,नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी (नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील नेवासा ) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दराडे महादेव जगन्नाथ,रा.वंजारवाडी,पो.सोनई,ता.नेवासा, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, नेवासा, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा, जि.अहमदनगर यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२
निर्णय दिनांक २०-०७-२००९

१ श्री. विजय अशोक पवार, : अपिलार्थी
राहुरी,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०३.२००९ रोजी नोंदणी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांना माहिती न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी भरतीसंदर्भात जानेवारी, २००६ ते दि.०६.०१.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.११.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु.३५५७/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.०२.२००९ रोजी विनामूल्य माहितीसाठी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०३.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देण्यासाठी अधिनियमातील कलम १९(६) प्रमाणे जो कालावधी दिला आहे तो कालावधी व्यपगत होण्यापूर्वीच, राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपिलार्थीच्या दि. १३.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०३.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती व या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी दि.२०.०३.२००९ रोजी विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याची विनंती केली. त्याप्रमाणे त्यांनी दि.२०.०३.२००९ रोजी आवश्यक ती संपूर्ण माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीची दि.२०.०३.२००९ रोजी संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याची पोचपावती आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी असे

आढळून येत आहे की, अधिनियमातील कलम १९(६) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीचे प्रथम अपील ठरविण्यासाठी ३०-४५ दिवस इतका कालावधी अनुज्ञेय आहे. तथापि हा कालावधी व्यपगत होण्याची वाट न पाहता, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर एकविसाव्या दिवशी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेले हे द्वितीय अपील अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपरिपक्व अशा स्वरुपाचे होत असून अपिलार्थीस आता आवश्यक असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरविली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. २/०९, दि.०६.०३.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय अशोकराव पवार,दिलीप मेडीकल सेंटर,राहुरी,ता.राहुरी,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद, अहमदनगर या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सीआर/३
निर्णय दिनांक : २०-०७-२००९

१ श्री. प्रदिप माधवराव मते, : अपिलार्थी
कोपरगाव,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नगरपरिषद, कोपरगाव,
जि. अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कोपरगाव,जि.अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नगर अभियंता,
नगरपरिषद, कोपरगाव,
जि. अहमदनगर.

जन अपिलीय अधिकारी : प्रशासकीय अधिकारी,
नगरपरिषद, कोपरगाव,
जि. अहमदनगर.

त्रयस्थ पक्ष : श्रीमती सुधा बाळासाहेब जंगम

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०१.२००९ रोजी नोंदणी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.२२.१०.२००८ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले असून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी विनंती केल्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी पूर्ण निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, कोपरगाव येथील सीटीएस क्र.२०८ व २०९ मधील अतिक्रमित बांधकाम काढून टाकण्याबाबत एकूण ४ मुद्यांद्वारे सन २००७ -०८ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मा.उच्च न्यायालय,मुंबईच्या औरंगाबाद खंडपीठाने रिट पि.नं.५६०३/०७ च्या संदर्भात दिलेल्या निर्णयातील काही मुद्यावर कोणती कारवाई करण्यात आली, नगर परिषदेचे पत्र दि. ०९.०१.२००७ रोजीच्या व मा. न्यायालयाने रिट पिटीशन क्र. ५६०३/०७ मध्ये दि. १५.०१.२००८ च्या आदेशातील मुद्यावर व तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१८.०१.२००८ ते १७.०७.२००८ या कालावधीतील एकूण ५ वेगवेगळया अर्जावर केलेली कार्यवाही - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्र. ३ व ४ वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १३.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी माहिती उशिरा पाठविल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाईची विनंती केली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.१०.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस नकला प्रमाणित करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती प्रमाणित करुन दिली. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ च्या संदर्भात माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी पूर्ण माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित सर्व दस्तऐवजांचे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून अवलोकन केले असून याबाबत अपिलार्थीस आवश्यक त्या कागदपत्रांच्या नकला पुरविण्यात आल्या आहेत. मुद्दा क्र.३ व ४ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्याकडे खुलाशाची मागणी केली असल्याने या मुद्यावर अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. खुलासासदृश्य माहिती मागविणे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये समाविष्ट नसल्याने व तसेच हा खुलासा कोणत्याही कागदपत्रांच्या स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे बेकायदेशीर व अनधिकृत झ ालेल्या बांधकामाबाबत कार्यवाही न झाल्याबाबतचा खुलासा मागितला आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याबाबत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार कार्यवाही करणे, अशाप्रकारची प्रक्रिया, अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने त्यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दलचे कारण व खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागविणे अर्जदारास अनुज्ञेय नाही. त्यामुळे मूळात अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील

मुद्दा क्र.३ च्या संदर्भातील माहिती देय नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१८.०१.२००८, २३.०१.२००८, ०९.०६.२००८, ०१.०७.२००८ व १७.०७.२००८ रोजी केलेल्या ५ अर्जांची माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्याद्वारे निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा अर्थबोध अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ४ मधील मजकूरावरुन होत नाही परंतु अपिलार्थीने या मुद्याद्वारे संदर्भित केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी नेमकी कोणती कार्यवाही केली, याबाबतची माहिती त्यांना अपेक्षित असावी, असे अनुमान काढण्यास हरकत नसावी. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात मुद्दा क्र.४ मध्ये संदर्भित केलेल्या अर्जांवर त्यांनी वेगवेगळया प्राधिकरणाशी/व्यक्तींशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व तसेच या अर्जासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यातील टिपणीच्या प्रती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांना दंडित करण्याची व तसेच माहिती उशिरा पाठविल्याबद्दल कार्यवाही करण्याचे अपेक्षिले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची अथवा शिस्तभंगाच्या शिफारसीची कोणतीही कार्यवाही केली नाही. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे, कारण त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्यावर दंड लावण्याचे अथवा त्यांच्यावर कारवाईची शिफारस करण्याचे अधिकार नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून हेतूतः लपवून ठेवली अथवा माहिती देण्यासाठी दुष्ट हेतुने टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही व तसेच जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता,

अपिलार्थीने आयोगासमोर त्यांच्या व्दितीय अपील अर्जाद्वारे उपस्थित केलेले मुद्दे आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

1. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
2. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ च्यासंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रदिप माधवराव मते, शिवाजी रोड,आढाव गल्ली, कोपरगांव, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,नगरपरिषद, कोपरगाव,जि. अहमदनगर यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,नगरपरिषद, कोपरगाव,जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सीआर/४
निर्णय दिनांक : २०-०७-२००९

१ श्री. श्रीनिवास सुरेश बोज्जा, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा करमणूक कर अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, नगर भाग,नगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०१.२००९ रोजी नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दि.०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, त्यांनी या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा याबाबत कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी हे अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर शहरातील सर्व केबल धारकांनी आजपावेतो भरलेल्या

टॅक्सच्यासंदर्भात एकूण दोन मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - टॅक्स भरणाऱ्या केबल धारकांची संख्या, प्रत्येक केबल धारकाचे नाव,पत्ता, भरलेली रक्कम, चलन क्रमांक व तारीख - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीचा हा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहायक करमणूक कर अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,अहमदनगर यांच्याकडे दि.३०.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविला व या पत्राची प्रत अपिलार्थीस देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती उपविभागीय अधिकारी, नगर भाग,नगर यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०२.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे व अपिलार्थीच्या दि.२५.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या दि.०१.१२.२००८ रोजीच्या जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना उद्देशून लिहिलेल्या एका अर्जाची प्रत आयोगास त्यांच्या व्दितीय अपिल अर्जाबरोबर सादर केली आहे. सदर अर्ज जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या कार्यालयास दि.०१.१२.२००८ रोजी प्राप्त झ ाल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयातील आवक-टपाल विभागाच्या लिपीकाची स्वाक्षरी या अर्जावर

आहे. त्यामुळे अपिलार्थीचा हा अर्ज जिल्हाधिकारी यांना प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०३.११.२००८ रोजी दिशाभूल करणारी माहिती व न मागितलेली माहिती पुरविण्यात आली आहे व तसेच ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांनी एकूण रु.४१०/- इतके शुल्क वसूल केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जातील सत्यासत्यता आयोगास कागदपत्रांअभावी पडताळणे शक्य नाही. सबब जिल्हाधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे किंवा कसे व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी अपिलार्थीकडून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी रु.४१०/- इतके शुल्क खरोखरीच घेतले आहे किंवा कसे याची त्यांच्या पातळीवर पडताळणी करावी. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि.२४.०७.२००८ नंतर दिली असेल तर या माहितीपोटीचे अपिलार्थीकडून स्वीकारलेले शुल्क रु.४१०/- इतके त्यांना आवश्यक त्या कागदपत्राची पडताळणी करुन, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करण्याची कार्यवाही करावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२५.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नगर भाग,नगर यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन व अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वत:ला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब महसूल आयुक्त,नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नगर भाग, नगर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अपिलार्थीकडून रु.४१०/- इतके शुल्क खरोखरीच घेतले आहे किंवा कसे याची पडताळणी जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी करावी व जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दि.२४.०७.२००८ नंतर दिली असेल तर या माहितीपोटीचे अपिलार्थीकडून स्वीकारलेले शुल्क रु.४१०/- इतके त्यांना आवश्यक त्या कागदपत्राची पडताळणी करुन, हे आदेश निर्गमित झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत परत केले जाईल, असे पहावे.

३. महसूल आयुक्त, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नगर भाग, नगर यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीनिवास सुरेश बोज्जा,१५, प्रशांत नगर, पाईपलाईन रोड,सावेडी,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नगर भाग, नगर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सीआर/५
निर्णय दिनांक : २०-०७-२००९

१ श्री. कमळाकर प्रभाकर भावसार, : अपिलार्थी
कोपरगाव, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रशासकीय अधिकारी,
नगर परिषद, कोपरगाव,
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कोपरगाव,जि.अहमदनगर

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : नगर परिषद अभियंता,
नगर परिषद, कोपरगाव,
जि.अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : प्रशासकीय अधिकारी,
नगर परिषद, कोपरगाव,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीमध्ये - नगरपालिका हद्दीतील शासकीय झाडे तोडण्यासंबंधी दि. ०५.०८.२००८ रोजी माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती, लक्ष्मीनगर भागातील खाजगी जागेवर वाढलेल्या बाभळीची झाडे तोडण्याबाबत केलेल्या अर्जाची दखल न घेण्याची कारणे व कोपरगाव नगर परिषद हद्दीतील अनधिकृत बांधकामाची यादी तयार आहे काय? असल्यास ती यादी व नसल्यास ती कधी उपलब्ध होईल याची तारखेसह माहिती - या मुद्यांचा समावेश होतो. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.०१.२००९ रोजी काही माहिती दिली. यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १५.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे देखील जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती पुरविली होती. अशाप्रकारे या प्रकरणी अपिलार्थीस दि. १५.१०.२००८ व २८.०१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीचे या प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असून या अपील अर्जाद्वारे, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे आयोगास स्पष्ट केले. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अनधिकृत बांधकामाची यादी करण्याबाबत

शासनाकडून त्यांना आता आदेश प्राप्त झाले असून यासंदर्भात मागील पंधरा दिवसात नगर परिषदेने ठराव घेतला असून ही यादी तयार करण्याचे काम ते आता हाती घेणार आहेत व ही यादी पूर्ण तयार करण्यासाठी त्यांना अंदाजे पाच ते सहा महिने इतका कालावधी लागेल. अपिलार्थीने ज्या दिवशी या मुद्यावर त्यांच्याकडे माहिती मागितली होती, त्या दिवशी ही माहिती त्यांच्याकडे तयार नव्हती व आजही ती माहिती तयार नाही. ही यादी तयार करण्याचे काम निश्चितपणे कोणत्या तारखेस पूर्ण होईल, ते त्यांना आज सांगता येणार नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि.१५.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिली असून त्यामध्ये त्यांना दि. ०५.०८.२००८ रोजी माहितीच्या अधिकारात कोणताही अर्ज प्राप्त झाला नसल्याचे नमूद करुन अपिलार्थीस माहिती दिली आहे. मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांना झाडे तोडण्याबाबत केलेल्या अर्जाची दखल न घेण्याची कारणे, ही माहिती, अपेक्षिली आहे. अशाप्रकारची माहिती ही अधिनियमातील कलम २'च' मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होणारी नाही त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी ती सुसंगतही नाही. सबब या मुद्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने माहिती ज्या वेळी मागितली, त्यावेळी त्यांच्याकडे ती उपलब्ध नसल्याने सदरची यादी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याची माहिती त्यांनी अपिलार्थीस वरील पत्राद्वारे दिली होती. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही यादी निश्चित कोणत्या तारखेस तयार होईल, ती तारीख विचारलेली आहे, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आजही उपलब्ध नाही, हे त्यांच्या वरील युक्तिवादावरुन स्पष्ट होत आहे. त्यामुळे या मुद्यावरील कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस आजदेखिल देय होत नाही.

अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील तीन मुद्यांपैकी मुद्दा क्र. २ व ३ शी संबंधित मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१५.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली असल्याने आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. हे पाहता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सर्वसाधारण परिस्थितीत दि. २७.०९.२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे त्यांना अनिवार्य होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतेही कारण अस्तित्त्वात असणे संभवत नाही. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) मधील विहित मुदतीत प्रतिसाद न देण्याच्या कृतीद्वारे, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला आहे. असाच येथे निष्कर्ष निघत आहे. सबब मुख्याधिकारी, नगर परिषद, कोपरगाव यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

२) मुख्याधिकारी, नगर परिषद, कोपरगाव यांना जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कमळाकर प्रभाकर भावसार, कोर्ट रोड,कोपरगाव, ता.कोपरगाव जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद अभियंता, नगर परिषद, कोपरगाव, जि.अहमदनगर या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद, कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्याधिकारी, नगर परिषद, कोपरगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सीआर/६
निर्णय दिनांक : २०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती द्रौपदाबाई भाऊ पठारे,<br>मु.पो.जवळा,ता.पारनेर, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,<br>पारनेर,जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,<br>भूमी अभिलेख, अहमदनगर | | |

त्रयस्थ पक्ष : श्री. बापू भाऊ पठारे
श्री. सिताराम धोंडीबा पठारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, मौ. जवळा, ता.पारनेर येथे ग.नं. ७८५, ७८६,७८७, ८०१, ७८८ व ८०२ या गटाची प्रत्यक्ष नोंद न करता दि. २१.०७.२००६ रोजी मोजणी केल्याचे दाखवून बोगस नकाशा दिल्याबाबत आणि त्यांनी वेळोवेळी

प्राप्त झालेल्या माहितीमधील संदिग्धतेसंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १७ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे पाहणीकरिता उपलब्ध करुन देऊन त्यातून अपिलार्थीस ज्या कागदपत्रांच्या नकला हव्या आहेत त्यांची सरकारी फी भरुन अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासित केले व तदनंतर दि. १६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) मधील तरतुदीनुसार देणे अभिप्रेत नाही, असे कारण दर्शवून अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १४.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील अभिलेखे अपिलार्थीस अधिनियमानुसार अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे पाहण्यासाठी देऊ केली असता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदांचे त्यांना, 'लोणचे घालायचे नाही', असे तोंडी अभिप्राय व्यक्त करुन या कागदपत्रांची तपासणी करण्यास नकार दिला. मात्र त्यांनी यासंदर्भात वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १७ मुद्यांद्वारे माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे. या १७ मुद्यांपैकी मुद्दा क्र. ७ व १२ वगळता उर्वरित सर्व मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेगवेगळया मुद्यांद्वारे त्यांचे स्पष्टीकरण मागविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्यावरील कथित माहिती, ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही किंबहुना या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या या १५ मुद्यांमधील माहिती ही कोणत्याही प्रकारे समाविष्ट होऊ शकत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल कारणे, स्पष्टीकरणे अथवा त्यांचे खुलासे किंवा त्यांची मते मागणे अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास ती अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात देण्यासंदर्भात त्यांनी कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे, हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ व १२ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ७ व १२ शी संबंधित माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीचे वेळी आयोगासमोर कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील

मुद्दा क्र. ७ व १२ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ७ व १२ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती द्रौपदाबाई भाऊ पठारे,मु.पो.जवळा,ता.पारनेर, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,पारनेर, जि.अहमदनगर या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सीआर/७
निर्णय दिनांक : २०-०७-२००९

१ श्री. सुभाष विठ्ठल केदार, : अपिलार्थी
मु.सैदापुर (हत्राळ),ता.पाथर्डी, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षण संचालक,
म.रा.,पुणे.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षण सहसंचालक (प्रा.)
पुणे-१
प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, शिक्षण संचालनालय (प्राथमिक), म.रा.पुणे-१

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती न देता, टाळाटाळ करुन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्यातील अप्रशिक्षित शिक्षक सेवकांच्या भरती बाबत व तसेच

प्रशिक्षणासाठीच्या नियमांसंदर्भात एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने त्यांच्या या अर्जातील दहाव्या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका विहित प्रपत्रामध्ये २५ रकान्यातील तक्त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीने अपेक्षिलेल्या माहितीचा कालावधी हा सन २००० ते २००७ या सात वर्षांशी संबंधित होता. अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याच प्राधिकरणाचा एक भाग असलेल्या दुसऱ्या प्राधिकारणाकडे दि. २५.०९.२००८ रोजी व १७.११.२००८ रोजी पाठविला. तथापि त्यांच्याकडूनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दरम्यानच्या कालावधीत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि.२२.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.११.२००८ रोजी आपला निर्णय पारित केला. सदरचा कथित निर्णय हा निर्णय नसून त्यांनी अपिलार्थीबरोबर घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीबरोबर दि.१७.११.२००८ रोजी घेतलेल्या बैठकीच्या इतिवृत्तांत अपिलार्थीच्या मुद्दा क्र. १० बाबतची माहिती देण्याबाबत सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद यांना पत्राद्वारे कळविल्याचे आढळून येत आहे. तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे व यासंदर्भात कालापव्यय केल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले व त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आजही आवश्यक आहे, असे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती पुरविली असून जी माहिती त्यांच्याकडे नाही, ती देण्यासंदर्भात जिल्हा परिषेदेच्या सर्व शिक्षणाधिकारी यांना दि. १७.११.२००८ व २४.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात आहे. अपिलार्थीने - सर्व संबंधित जिल्हयाशी संबंधित माहिती शिक्षण संचालकांकडे एकत्रितपणे मागितली आहे. आजच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, शिक्षण विभागाचे जिल्हा स्तरावरील प्राधिकरण म्हणजे प्रत्येक जिल्हयातील जिल्हा परिषद असते. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी जो महत्त्वाचा भाग अपिलार्थीस शिक्षण संचालकांकडून अपेक्षित आहे त्या भागाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारे उपलब्ध नसते. ही माहिती प्रत्येक जिल्हा परिषदेशी संपर्क साधून अपिलार्थीस देणे त्यांना भाग आहे. त्याप्रमाणे त्यांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना संपर्क साधल्याचे व आतापर्यंत एकूण दहा जिल्हा परिषदेने अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १० शी संबंधित माहिती दिली असून उर्वरित शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे काम चालू आहे, असे आयोगास अवगत केले आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १,२,६,७ व ८ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय असणार नाही. कारण या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबाबत कारणे व अभिप्राय अपेक्षिलेले आहेत. अशाप्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ३,४ व ९ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. यापैकी मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यापूर्वीच दिलेली आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ९ शी

संबंधित माहिती त्यांना द्यावी लागेल. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ९ शी संबंधित माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० च्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१० च्या संदर्भात अपेक्षित असलेली माहिती महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषद प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे व हे प्राधिकरण जिल्हास्तरावरील स्वतंत्र सक्षम प्राधिकरण असल्यामुळे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करुन प्राप्त करुन घ्यावी लागेल. आता अपिलार्थीस एकूण दहा जिल्हा परिषदेकडून माहिती दिली गेली असल्यामुळे उर्वरित सर्व जिल्हा परिषदांकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० शी संबंधित माहिती देण्याचा पाठपुरावा करावा.या संदर्भात असेही आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.१० शी संबंधित माहिती अपिलार्थीस ज्या प्रपत्रामध्ये अपेक्षित आहे, त्यातील स्तंभ क्र.२४ व २५ चे अवलोकन करता या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबतची कारणे अपेक्षित केली असल्याचे दिसून येते, ही माहिती देखील अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. कारण ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे विसंगत आहे. त्यामुळे शिक्षण संचालक यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उर्वरित जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठीच्या सूचना देताना अपिलार्थीस मुद्दा क्र. २४ व २५ च्या संदर्भात शिक्षणाधिकारी यांनी या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देऊ नाही, असे त्यांच्या, शिक्षणाधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांना देय असलेली माहिती या मुद्यावर केलेले वरील पृथ:करण पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ९ च्या संदर्भातील माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व मुद्दा क्र.

१० शी संबंधित माहिती, त्यातील रकाना क्र.२४ व २५ वगळता उर्वरित तक्त्यामधील संपूर्ण माहिती त्यांना, संबंधित शिक्षणाधिकारी हे तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ व ९ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व मुद्दा क्र. १० शी संबंधित माहितीच्या तक्त्यामधील रकाना क्र.२४ व २५ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, संबंधित शिक्षणाधिकारी हे तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देतील, असे पहावे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष विठ्ठल केदार,मु.सैदापूर (हत्राळ),ता.पाथर्डी,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, शिक्षण संचालनालय (प्राथमिक), म. रा. १७, डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे-१ या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सहसंचालक (प्रा.), शिक्षण संचालनालय (प्राथमिक), म. रा. १७, डॉ.आंबेडकर मार्ग,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सीआर/८
निर्णय दिनांक : २०-०७-२००९

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतिफ, अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, नेवासा,जि.अहमदनगर : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी जिल्हा भूमी अभिलेख अधिकारी यांचे कार्यालय, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक, भूमी अभिलेख,अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. अब्दुल लतीफ अब्दुल गनी देशमुख

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मौजे भानसहिवरे, ता.नेवासा, जि.अहमदनगर येथे गट क्र. ३१६/३१७ च्या मोजणीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विनादिनांकाच्या पत्राने प्रतिसाद दिला. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील

कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१४.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०१.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या सुनावणीचे पत्र अपिलार्थीकडून परत आल्याने ते या अपिलावर सुनावणी घेऊ शकले नाहीत. परिणामी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहावे लागल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,३ व ९ च्या संदर्भातील माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही, ती त्यांना संबंधितांकडून त्वरित व विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस ही माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि.१५.१२.२००८ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप संमिश्र असे आहे. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दि.२४.०६.२००८ रोजी ग.क्र.३१६/३१७ च्या मोजणीसंदर्भात त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या कागदपत्रांच्या प्रती व मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांच्या खात्याशी संबंधित राज्य मंत्र्याचे नाव व पत्ता आणि मुद्दा क्र. ९ द्वारे - 'मौजे भानसहिवरे येथील ग.नं.३१६/३१७ खरेदी केलेल्या व्यक्तीचे नाव लावण्यासाठी किती फी आकारली गेली.' - अशी माहिती मागितली आहे. यातील मुद्दा क्र. १ व ३

शी संबंधित माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याशी सरळ संबंधित आहे. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य होते. अपिलार्थीने त्यांच्या वरील अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या खात्याच्या मंत्र्याचे नाव व संपूर्ण पत्ता याची विचारणा केली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात आले की, त्यांचा विभाग हा महसूल विभागांतर्गत येतो आणि दरवर्षी शासनातर्फे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना देण्यात येणाऱ्या वार्षिक दैनंदिनीमध्ये संबंधित मंत्र्याची नावे व पत्ते देखील मुद्रीत केलेले असतात, त्यामुळे ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, सर्वसाधारण परिस्थितीत विहित मुदतीत देणे भाग आहे.तथापि सदर मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या कथित माहितीमध्ये मुद्दा क्र.८ च्या संदर्भात, "सदर मुद्याची माहिती उपलब्ध नसलेने पुरविता येत नाही", अशी, त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाई स्पष्ट करणारी माहिती, त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. या एकूण प्रकारावरुन भूमी अभिलेख विभागाचे क्षेत्रीय स्तरावरील काम किती खालच्या दर्जाचे चालू आहे, हे जनसामान्यास सहज स्पष्ट होऊ शकते. अपिलार्थीच्या वरील अर्जातील मुद्दा क्र. ९ शी संबंधित माहिती, संबंधित गावाच्या तलाठयाकडे उपलब्ध असल्याने, अपिलार्थीच्या या अर्जातील मुद्दा क्र. ९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी संबंधित तलाठयाकडे या अर्जाची प्रत त्यांना मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत तलाठयाकडे पाठवून, त्या पत्रांची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही व परिणामी अपिलार्थी हे दि. १५.१२.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज करुनही आज सहा महिने इतका कालावधी व्यपगत झाल्यानंतरही एवढी साधी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. अपिलार्थीस अशाप्रकारे प्रदीर्घ कालावधीसाठी त्यांना अपेक्षित असलेल्या साध्या माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची नोंद जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ शी संबंधित माहिती जरी संबंधित गावाच्या तलाठ्याकडे उपलब्ध असली तरी जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे वेळीच कार्यवाही न केल्याने त्यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ शी संबंधित माहिती संबंधित तलाठयाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी. अशाप्रकारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस कशाप्रकारे उपलब्ध करुन द्यावयाची याचे वरील विवेचन पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. १, ३ व ९ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,३ व ९ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देशमुख मोईन अब्दुल लतिफ,घ.नं.१०/८ गजानन हौसिंग सोसायटी (जुना मुकुंदनगर),औरंगाबाद रोड,अहमदनगर-१४१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख, अहमदनगर यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९
निर्णय दिनांक २०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अशोक सोमा धनवडे,<br>रा.शेवगाव ता.शेवगाव,जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,शेवगाव,<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तालुका कृषि कार्यालय,शेवगाव,<br>जि.अहमदनगर | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, शेवगाव, जि.अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, शेवगाव, जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०२.२००९ रोजी नोंदणी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेले दि. २५.०१.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती मिळाली असून त्यांची या माहितीबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे नमूद केले आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे नोंदविलेल्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन करता या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला असून, जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे अथवा या पुराव्याचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता व विशेषतः अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीस आज माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य राहिले नसावे, असा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. ९/०९, दि.२५.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक सोमा धनवडे,मु.पो.वडार गल्ली,शेवगाव,ता.शेवगाव,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, शेवगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, शेवगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०
निर्णय दिनांक २०-०७-२००९

१ श्री. अशोक श्रीहरी भुसारी, : अपिलार्थी
रा.सोनई,ता.नेवासा,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
नाशिक विभाग,नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सह जिल्हा निबंधक (वर्ग-१),अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०२.२००९ रोजी नोंदणी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण उपलब्ध माहिती दिली व सर्व कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन कळविण्यात येईल, असे कळवूनही त्यांनी माहिती पुरविली नाही. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी घाईघाई एकतर्फी निर्णय देऊन अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून नक्कल प्राप्त न झाल्याने तो पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. सुनावणीच्या वेळी ते, तो पुरावा सादर करतील.

या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०४.१२.९८ ते दि.२०.०५.२००८ पर्यंत या कालावधीतील मुद्रांक विक्री परवान्याच्यासंदर्भात एकूण चार मुद्याद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दि. ०४.१२.९८ पासून दि.२०.०५.२००८ पर्यंत मुद्रांक विक्रेत्यांच्या नवीन भरलेल्या जागांची संख्या, यासंदर्भात कोणत्या वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देण्यात आली होती, नवीन भरलेल्या जागांचे ठिकाण व नावासह यादी आणि वर्तमानपत्राच्या दिलेल्या जाहीरातीच्या झेरॉक्स प्रती - या मुद्यांचा समावेश होतो.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०६.२००८ रोजीच्या प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण असल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.११.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत आवश्यक व उपलब्ध माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस आजपावेतो द्यावयाची राहिलेली माहिती त्यांनी दि. १८.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली असून अपिलार्थीस आता त्यांच्याकडून कोणतीही माहिती देणे बाकी नाही. अपिलार्थीने मुद्रांक विक्री परवान्याकरिता दिलेल्या वर्तमानपत्रातील

जाहीरातीची प्रत त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही त्यांना सापडू शकली नाही. त्यामुळे अपिलार्थीस ते ती माहिती पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद पाहता, अपिलार्थीस बऱ्याचअंशी माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. १०/०९, दि.२०.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक श्रीहरी भुसारी, मु.पो.सोनई,ता.नेवासा,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक (वर्ग-१),अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११
निर्णय दिनांक २०-०७-२००९

१ श्री. छबुराव नारायण पंडीत, : अपिलार्थी
रा.उंबरे,ता.राहुरी,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, उंबरे,ता.राहुरी,जि.अहमदनगर
२ जन अपिलीस अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, राहुरी,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही व जी माहिती दिली ती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी दिली. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हेतूतः वेळीच माहिती न पुरविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे अपील सादर केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - सन २००२ ते २००७ या कालावधीमधील दारिद्रयरेषेखालील सर्वेक्षणानुसार केलेल्या अर्जाची प्रत व सन २००७-०८ या वर्षामध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत

किती लाभार्थीची प्रकरणे जन माहिती अधिकारी यांनी मंजूरीसाठी पाठविली व किती लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर झाली - ही माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती अपेक्षिली असून, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी या अर्जामध्ये नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जावर रु.१०/- इतक्या किंमतीचा कोर्ट-फी-स्टॅम्प न लावल्याने अपिलार्थीचा मूळ अर्ज रद्द केला व अपिलार्थीस ही माहिती आवश्यक असल्यास परत नव्याने अर्ज करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर सुनावणी होऊन काही निर्णय झाला किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीने त्यानंतर वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती पुरविली व ती अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, याचे विवेचन केलेले नाही किंवा हे आयोगास स्पष्ट करण्यासाठी आज सुनावणीसाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थितही नाहीत. तसेच अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने यासंदर्भात ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सोबत जोडला आहे, असे म्हटले आहे परंतु आयोगास सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये मात्र अशाप्रकारचा कोणताही पुरावा आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. ही वस्तुस्थिती पाहता,अपिलार्थी हे खरोखरीच दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे,

याचे अनुमान आयोग काढू शकत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत नव्याने अर्ज करुन त्या अर्जाबरोबर ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा वैध पुरावा त्यांनी जोडावा. अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यास अपिलार्थीने सादर केलेल्या पुराव्याची योग्य त्या प्रकारे दखल घेऊन अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत निर्णय घ्यावा. आज रोजीच्या विचाराधीन अपिलासोबत अपिलार्थीने त्यांच्या दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्रासंदर्भात पुराव्यादाखल कोणतीही कागदपत्रे सादर केली नसल्याने व आज रोजी सुनावणीस देखिल ते गैरहजर राहिले असल्याने त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २०-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. छबुराव नारायण पंडीत,मु.पो.उंबरे,ता.राहुरी,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, उंबरे,ता.राहुरी,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, राहुरी, जि.अहमदगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सीआर/१२
निर्णय दिनांक : २०-०७-२००९

१ श्री. गजानन सिताराम फलके, : अपिलार्थी
रा.कर्जत,जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक धर्मादाय आयुक्त,
नोंदणी कार्यालय, अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक,
सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,
अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : गोदड महाराज व श्री विठ्ठल मंदिर देवस्थान ट्रस्ट

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही विश्वस्त,गोदड महाराज व विठ्ठल मंदिर देवस्थान, कर्जत यांनी अद्यापपावेतो त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष गोदड महाराज श्री. विठ्ठल मंदिर देवस्थान ए-३८१ अहमदनगर या क्रमांकाने नोंदणी झालेल्या ट्रस्टसंदर्भातील माहे एप्रिल, २००० ते एप्रिल, २००७ या कालावधीची काही माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांना ट्रस्ट मधील सभासदांची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे जमाखर्चाची वार्षिक माहिती सादर केली असल्यास ती माहिती, मंदिरामधील एकूण मूर्तींची संख्या व इतर डेड स्टॉक आहे काय?, त्यामध्ये वाढ झाली आहे काय?, मंदिराचे शिखर सन २००५ मध्ये ट्रस्टने वर्गणी गोळा करुन ट्रस्टीच्या नावाने पावत्या दिल्या, त्या पावत्यांचा हिशोब जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला आहे काय?, मंदिरामध्ये भाविकांनी दिलेली देणगी, दान यांची नोंद करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती सादर केली आहे काय ?- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि.०४.११.२००८ रोजीच्या पत्राद्वारे विश्वस्त श्री गोदड महाराज व विठ्ठल मंदिर देवस्थान, कर्जत यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना सात दिवसांच्या आत पुरविण्याचे संबंधित ट्रस्टला सूचित केले. तथापि सहायक धर्मादाय आयुक्त यांनी सूचित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०५.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०१.२००९ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले. या निर्णयाद्वारे त्यांनी संबंधित देवस्थानला अपिलार्थीस सात दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि एवढे होऊनही अपिलार्थीस

अपेक्षित माहिती संबंधित देवस्थानकडून प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०.०७.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये चार मुद्यांद्वारे मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २,३ व ४ या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२,३ व ४ द्वारे ज्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणाऱ्या स्वरुपातील माहिती मागितली आहे, ते स्वरुप पाहता, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्ती बाहेरची असल्यामुळे व पर्यायाने माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदींशी विसंगत असल्याने, देय असणार नाही. माहिती अधिकार अधिनियमानुसार, जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार निर्णय घेणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जातील फक्त मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती देय होत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधित त्रयस्थ पक्षाने सादर केलेल्या माहितीच्या संदर्भात मागितल्याचे दिसून येते. असे असताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधित श्री गोदड महाराज व विठ्ठल मंदिर देवस्थान,कर्जत यांच्याकडे पाठविण्याचे कोणतेही प्रयोजन नव्हते. या प्रकरणी सहायक

धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील अधीक्षक यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाची प्रत संबंधित देवस्थानाकडे पाठविण्याचे कारण नव्हते. ही माहिती अधीक्षक यांनीच अपिलार्थीस पुरविणे अभिप्रेत आहे. परंतु त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधित देवस्थानकडे पाठवून आपल्यावरील, अपिलार्थीस माहिती देण्यासाठीची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्राप्त होणारे प्रथम अपील हे,त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक व अपिलार्थी यांच्यामधील असते याची नोंद त्यांनी घेतल्याचे दिसून येत नाही. त्यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देऊन संबंधित देवस्थानास अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने माहिती मागविताना किंवा प्रथम अपील सादर करताना, संबंधित देवस्थानास प्रतिवादी केलेले नाही. त्यामुळे देवस्थानास माहिती देण्याचे सूचित करण्याची आवश्यकता नव्हती. मा. उच्च न्यायालयाने दि.२८ एप्रिल, २००९ रोजीच्या निर्णयाप्रमाणे सार्वजनिक देवस्थानांना माहिती अधिकार लागू नसल्याचे स्पष्ट केले आहे व पुढे, जर अपिलार्थीस देवस्थानासंदर्भात काही माहिती हवी असेल तर त्यांना ती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाकडे मागावी लागेल व अपिलार्थीस माहिती देण्याचे निश्चित झाल्यानंतर ती माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस द्यावी, असे स्पष्ट केले आहे. सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या दि. २०.०१.२००९ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, संबंधित देवस्थानाने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती द्यावी, अशी सहायक धर्मादाय आयुक्त यांची अपेक्षा असल्याचे दिसून येते. सबब जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२४.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर**
**दिनांक : २०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन सिताराम फलके, मु.पो.ता.कर्जत,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८२

निर्णय दिनांक २१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. पार्श्र्वकुमार हिरालाल काला,<br>रा. "आशिष" भालचंद्र हॉस्पिटलजवळ, रामनगर, औसा रोड, लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद,<br>जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय आयुक्त,<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या अर्जाप्रमाणे मागणी केलेली माहिती पुरविली नाही त्यामुळे त्यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १६-११-२००७ रोजी प्रथम अपील

केले असता त्या अपील अर्जावरही विभागीय आयुक्त कार्यालयाने कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९८२ ते २००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" पूर्वीचा सर्व्हे नंबर २५६/१ व आताचा गट नंबर ५९६, पूर्वीचा सर्व्हे नंबर २६२/२ व आताचा गट नंबर ६०७ मौजे वेरुळ तालुका खुलताबाद जि. औरंगाबाद यामध्ये मालकी हक्कात १९८२-८३ मध्ये माझेच नांव आहे व आजही सदरील जमीनीवर माझीच मालकी आहे. २००५-२००६ मध्ये सदरील जमिनीच्या ७/१२ मध्ये इतर लोकांची नांवे कोणत्या कायद्यान्वये, कोणत्या कागदपत्राच्या आधारे, कोणत्या अधिका-याने, कोणत्या तारखेस घेतलेली आहेत त्याची तपशीलासह प्रमाणित माहिती द्यावी. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १६-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी काय कार्यवाही केली हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि आज रोजी आयोगास विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून दिनांक १६-०७-२००९ रोजी प्राप्त झालेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर हे प्रथम अपिलीय अधिकारी आहेत आणि त्यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज केलेला नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या दिनांक १६-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर सुनावणी होणे आयोगास आवश्यक वाटते. सबब, अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या दिनांक १६-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर यांच्याकडे प्रथमतः पाठवावी व अपिलार्थीच्या दिनांक १६-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत असे उपविभागीय अधिकारी वैजापूर यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल) वैजापूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, सदर अपील अर्जाची प्रत अपिलार्थीकडून प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पार्श्वकुमार हिरालाल काला, रा. "आशिष" भालचंद्र हॉस्पिटलजवळ, रामनगर, औसा रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ उपविभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८०

निर्णय दिनांक २१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गुलाबराव आबाजी बोरुडे,<br>रा. बोरखेडी, पो. पिरकल्याण, तालुका जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना,<br>जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना,<br>जिल्हा जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जालना, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार स्वस्त धान्य दुकान बोरखेडी, तालुका जिल्हा जालना बाबत दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागितली असता त्यांना दिनांक ०४-०४-२००८ रोजी प्राप्त झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे किरकोळ केरोसीन व स्वस्त धान्य दुकान, बोरखेडी, तालुका जिल्हा जालना संदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक ०२-०२-२००८ रोजी नायब तहसीलदार जालना यांनी बोरखेडी येथील किरकोळ केरोसीन व स्वस्त धान्य दुकानाची केलेली चौकशी अहवाल प्रत, डिसेंबर २००७ पूर्वी किरकोळ केरोसीन व स्वस्त धान्य दुकान बोरखेडी यांच्या दुकानाची शेवटच्या केलेल्या तपासणी अहवालाची प्रत व एका वर्षात या दुकानाची किती वेळा तपासणी केली जाते - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी तहसीलदार, जालना यांना दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे ही माहिती मिळण्यासाठी परत अर्ज केला व माहिती देण्याची विनंती केली. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती देण्यात आली. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताच निर्णय दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्याने व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०२-०४-२००८ रोजी दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याचे वाटल्यावरुन, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०४-२००८ रोजी माहिती पुरविली असून अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. त्यांच्याकडे दोन अव्वल कारकून, एक लिपीक व दोन शिपाई ही पदे मंजूर असून त्यांच्या विभागात जवळपास २४१ स्वस्त धान्य दुकाने व १३२ किरकोळ केरोसीन परवाने इतक्या दुकानांची कामे केली जातात. कामाचा व्याप इतका मोठा असल्याने व पुरेशा प्रमाणात कर्मचारी उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना विलंब लागला.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रत्यक्षतः दिलेल्या माहितीचे अवलोकन करता यामध्ये असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक एक च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित नायब तहसीलदार यांनी केलेला पंचनामा व संबंधितांचे जाबजबाब याच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेल्या तक्रारीवर संबधित नायब तहसीलदार यांनी आपले निष्कर्ष काढल्याच्या चौकशी अहवालाची प्रत त्यामध्ये समाविष्ट नाही. मूळात अशा प्रकारच्या चौकशीची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोन व तीनच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०४-२००८ रोजी कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सध्या कार्यरत असलेले जन अपिलीय अधिकारी हे या

पदावर नुकतेच रुजू झाले असल्याने त्यांनी आयोगास यासंदर्भात संपूर्ण चौकशी करुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्रीमती संगीता वराडे) यांच्याकडून अपिलार्थीस पुरविली गेलेली माहिती अपूर्ण असल्याचे दिसून येते. या पुरविलेल्या कथित माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोन व तीनच्या संदर्भात कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिली, हा त्यांचा दावा सिध्द होत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतूदीस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (महसूल) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी (श्रीमती संगीता वराडे) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गुलाबराव आबाजी बोरुडे, रा. बोरखेडी, पो. पिरकल्याण, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८१

निर्णय दिनांक २१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अंबादास पंडीतराव सांगळे,<br>रा. शिवाजीनगर, म्हाडा कॉलनी, घर नंबर २२०,<br>भोकरदन रोड, जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना,<br>जिल्हा जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना,<br>जिल्हा जालना | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जालना, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून न दिली गेल्यामुळे त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वडीलाचे अंतीम देयकाचे सविस्तर विवरण मिळण्याबाबत एकूण दहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वैद्यकीय तपासणीनंतर निवृत्ती वेतन अंशराशीकरण करण्यासाठी अर्जाचा नमुना क च्या अर्जाचा भाग १, २, ३ व ४ च्या प्रतीची झेरॉक्स, वैद्यकीय तपासणीकरिता नमुना ई च्या भाग १, २ व ३ च्या झेरॉक्स प्रती व वैद्यकीय तपासणीकरिता वैद्यकीय प्राधिका-याकडे पाठवावयाच्या पत्राचा नमुना ड, तपासणीकरिता शासनाने ठरविलेल्या फीच्या पावतीची झेरॉक्स प्रत, सेवापुस्तकाची झेरॉक्स, रजा रोखीकरणाची रक्कम किती, ठेव संलग्नविमा योजनेची रक्कम किती आयुर्विम्याची रक्कम किती, भविष्यनिर्वाह निधीची रक्कम किती व पतपेढी सहकारी संस्थेचे बेबाकीचे प्रमाणपत्र - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०४-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीसंदर्भात त्यांनी कोणताही निर्णय दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अशा प्रकारे आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगाकडे सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, तहसीलदार, जालना यांच्या कार्यालयाने

अपिलार्थीच्या वडीलांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांच्याकडे वैद्यकीय तपासणीकरिता पाठविले होते. संबंधित रुग्णालयाकडून त्यांनी माहिती अधिकार अधिनियमानुसार माहिती प्राप्त करुन घेतली आहे. परंतु त्यांना उत्तर देतांना तहसीलदार, कार्यालय जालना यांनी त्यांच्या वडिलास वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आल्याचे दिसून येत नाही त्यामुळे माहिती देता येत नाही अशी खोटी व दिशाभूल करणारी माहिती देऊन अपिलार्थीस मानसिक व आर्थिक त्रास दिला आहे. तेव्हा त्यांना यासंदर्भात सत्य माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती त्यांनी दिनांक ०९-०२-२००९ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन जिल्हाधिकारी, जालना यांनी त्यांच्या दिनांक ०५-०५-१९९२ च्या आदेशान्वये अपिलार्थीचे वडील श्री. पंडित यशवंतराव सांगळे यांचा स्वेच्छेने सेवानिवृत्त करण्याचा अर्ज महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती) नियम १९८२ चे कलम ६५ अ प्रमाणे मान्य करुन त्यांना दिनांक ३०-०४-१९९२ रोजी मध्यान्होत्तर सेवानिवृत्त केले. यासंदर्भात अपिलार्थीने संबंधितांकडून आवश्यक तो पुरावा प्राप्त करुन घेतला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे, त्यातील अपिलार्थीस न दिलेली मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ शी संबंधित माहिती ही वैद्यकीय तपासणीसंदर्भात असल्याचे आयोगाच्या आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी ही माहिती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत देण्याचे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी मान्य केले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश

निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. उर्वरित मुद्दा क्रमांक ५ ते १० या संदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-०२-२००९ रोजी माहिती पुरविली आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या मुद्दयावर परत माहिती देण्याचे त्यांना कोणतेही कारण नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस चुकीची माहिती दिल्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजी पुरविण्यात आलेली माहितीत्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-याने तयार केली आहे त्यांच्यावर त्यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तहसीलदार, जालना यांनी, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविण्यात आलेली माहिती ज्या कर्मचा-याने तयार केली आहे त्यांच्यावर त्यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंबादास पंडीतराव सांगळे, रा. शिवाजीनगर, म्हाडा कॉलनी, घर नंबर २२०, भोकरदन रोड, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८२

निर्णय दिनांक २१-०७-२००९

१ श्री. दादाराव भाऊराव तुपकर, अपिलार्थी
संचालक, महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
रेणुका हॉस्पिटल, शिवाजी पुतळा रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक वनसंरक्षक,
व्दारा उप वनसंरक्षक, औरंगाबाद वनविभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, औरंगाबाद वनविभाग, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. प्रल्हाद धनसिंग राठोड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २१-०७-२००९ रोजीचे पत्र आयोगास समक्ष सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण

माहिती प्राप्त  झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक ८८२/२००८ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी  विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८८२/२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दादाराव भाऊराव तुपकर, संचालक, महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. रेणुका हॉस्पिटल, शिवाजी पुतळा रोड, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, उप वनसंरक्षक औरंगाबाद वनविभाग कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, औरंगाबाद वनविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८३

निर्णय दिनांक २१-०७-२००९

१ श्री. गित्ते विठ्ठल एकनाथराव, अपिलार्थी

मु. वागबेट, पो. बेलंबा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वागबेट

तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ,

तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वागबेट तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांनी अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ३०-०५-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्राव्दारे अपिलार्थीने आयोगास दिनांक २१-०७-२००९ रोजी ठेवलेली त्यांच्या दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या व्दितीय अर्जावरील सुनावणी रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीसाठी या पत्राचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या केलेल्या व्दितीय अपील अर्जासंदर्भातील सुनावणी रद्द करण्याची विनंती केल्याने, ती विनंती मान्य करुन अपिलार्थीचे आयोगाकडे त्यांनी दिनांक २६-०५-२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील या आदेशाव्दारे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८८३/२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गित्ते विठ्ठल एकनाथराव, मु. वागबेट, पो. बेलंबा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वागबेट, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८४

निर्णय दिनांक २१-०७-२००९

१ श्री. आप्पासाहेब गोपीनाथ नलवडे, : अपिलार्थी
मु. पो. दैठण, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तलाठी, तलाठी सजा, दैठण, तालुका गेवराई,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती न पुरविता अयोग्य व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्याने आणि अपिलार्थीचे शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसान झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे " सर्व्हे नंबर १४ दैठण येथे माझ्या नावे १ हेक्टर २१ आर जमीन असून सदर

जमिनीत तीनही वर्षी कापसाचा पेरा होता तरीही लाल्या रोगाच्या अनुदान यादीत नांव नाही त्याचे कारण नमूद करावे " ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित तलाठ्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी सूचित केले. तथापि यानंतर अपिलार्थीने तहसील कार्यालय गेवराई येथे कापसाच्या अनुदानासंदर्भात माहिती मागितली असता नायब तहसीलदार (म) यांनी त्यांच्या दिनांक २०-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस लाल्या रोगाच्या अनुदान संदर्भातील मूळ यादी तालुका कृषि अधिकारी, गेवराई यांच्याकडे पाठविण्यात आली असल्याचे त्यांना कळविले व त्यांचे या यादीमध्ये नांव का नाही याचे कारण कृषि कार्यालयाशी संपर्क साधून जाणून घेण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-११-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत अपिलार्थीच्या शेतातील ऊसाच्या पे-याबाबतची माहिती देण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारे मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्या-प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

तत्कालीन तलाठी (श्री. साळूंके, हल्ली तलाठी सजा कुर्ला, तालुका बीड येथे कार्यरत) यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीचे नांव लाल्या रोगाचे अनुदान देण्यासंदर्भात केलेल्या यादीमध्ये समावेश केले होते. तथापि ती यादी संगणकावर टंकलिखित करत असतांना त्यातील अपिलार्थीचे नांव उडविले गेले. त्यामुळे अपिलार्थीस अनुदान प्राप्त न होण्यासाठी ते जबाबदार असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी स्वतःच्या पगारातून १००० रुपये अपिलार्थीस दिले

आहेत. ही रक्कम त्यांनी अपिलार्थीस दोन महिन्यापूर्वी दिलेली आहे. यासंदर्भात त्यांच्याकडे आयोगाने पुराव्याची मागणी केली असता ते कोणताही पुरावा आयोगास दाखवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा खुलासा व कारणे अपेक्षित करणारी माहिती मागणे हे मूळात अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. एवढे जरी असले तरी या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळोवेळी दिलेले उत्तर व पुरविलेली कथित माहिती पाहिली असता, माहिती अधिकार अधिनियमातील विडंबन महसूल विभागाचे कर्मचारी कशा प्रकारे प्रत्यक्षात करीत आहेत याचे समग्र दर्शन या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली संबंधित कागदपत्रे पाहता लक्षात येते. यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जाबरोबर त्यांचे म्हणणे सविस्तरपणे मांडले आहे. त्यामध्ये त्यांनी तत्कालीन तलाठी, दैठण, श्री. साळूंके यांनी त्यांच्या कापसाचा पीक पेरा तीनही वर्षी ७/१२ वर नोंद असतांना लाल्या रोगाच्या अनुदानाच्या यादीमध्ये त्यांचे नांव दाखविले नसल्याचा गंभीर आरोप श्री. साळूंके यांच्यावर केला आहे. यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रात असेही दाखविले गेले आहे की, त्यांना नायब तहसीलदार, गेवराई व संबंधित तलाठी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही व त्यांच्या कार्यालयातून वेगवेगळ्या कार्यालयामध्ये

अपिलार्थीस हेलपाटे मारायला लावून दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. अपिलार्थीच्या या विधानाची सत्यता त्यांनी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन ठरविता येईल. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार गेवराई यांनी दिनांक ०६-०२-२००८ रोजी दिलेला निर्णयही उल्लेखनिय असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित तलाठ्यास त्यांच्या शेतातील उसाच्या पे-याबद्दल माहिती देण्याचे सूचित केले आहे. वास्तविकत: अपिलार्थीने मागणी केलेली माहिती कापसाच्या पिकाशी संबंधीत असतांना अपिलार्थीस उसाच्या पिकासंदर्भात माहिती देण्याचे तलाठ्यास आदेशित करणारी तहसीलदार, गेवराई यांची कृती ही ते तहसीलदार या पदावर काम करण्यास कितपत सक्षम आहेत याची साक्ष देते. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करता जिल्हाधिकारी, बीड यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात त्यांच्या विभागाकडील ज्या ज्या कर्मचा-यांनी चुकीची कार्यवाही केली आहे त्या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, बीड यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे संबंधित कर्मचारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. आप्पासाहेब गोपीनाथ नलवडे, मु. पो. दैठण, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी सजा, दैठण, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८५

निर्णय दिनांक २१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. विश्वेश विजयकुमार शेटे,<br>रंगारगल्ली, किल्ले धारुर, तालुका धारुर,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक,<br>जिल्हा परिषद मा. शाळा, किल्ले धारुर,<br>तालुका धारुर, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - जिल्हा परिषद मा. शाळा, किल्ले धारुर, शेटे यांच्या जागेत कोणत्या वर्षापर्यंत होती व १९८० ते शाळा सोडेपर्यंत शाळेचा किराया कोणाला दिला त्याचे संपूर्ण नांव व

पत्ता व जागा सोडतांना जागा कोणाच्या ताब्यात दिली त्याचे नांव व पत्ता - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही २७ वर्षापूर्वीची जुनी असल्याने ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०४-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही कायमर्यादा निश्चित करुन दिलेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आता दिनांक १८-०७-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कारण आयोगाने विचारले असता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, मूळात अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही २७ वर्षापुर्वीची जुनी असल्याने त्यांच्याकडे ही माहिती सहज उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्यांना इतरत्र विखुरलेल्या अनेक कागदपत्रामधून माहिती उपलब्ध करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस द्यावी लागली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, " जागा सोडतांना ती कोणाच्या ताब्यात दिली त्याचे नांव व पत्ता " ही माहिती त्यांच्या-कडे उपलब्ध होऊ शकणार नाही. मात्र शाळेचे तत्कालीन

मुख्याध्यापक यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०६-१०-१९८९ चे एक पत्र त्यांना उपलब्ध झाले असून या पत्रामध्ये मुख्याध्यापकाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे जुनी इमारत संबधितांच्या ताब्यात देण्याबाबत परवानगी मागितली होती. या पत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून काय कार्यवाही झाली हे त्यांना आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे ज्ञात न होऊ शकल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी बरेच परिश्रम घेऊन अपिलार्थीस जवळजवळ संपूर्ण माहिती पुरविली आहे. आता अपिलार्थीस फक्त त्यांच्या अर्जातील शाळा सोडतांना ती कोणाच्या ताब्यात दिली त्याचे नांव व पत्ता एवढीच माहिती अपिलार्थीस देणे बाकी आहे. आयोगाच्या मते तत्कालीन मुख्याध्यापकाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दिनांक ०६-१०-१९८९ रोजी दिलेल्या पत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी काय कार्यवाही केली याची माहिती जन माहिती अधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयातून ही माहिती उपलब्ध होऊ शकेल. यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना तीस दिवसाचा कालावधी देण्यात येत असून या कालावधीमध्ये त्यांनी अपिलार्थीस आता द्यावयाच्या राहिलेल्या माहितीचा शोध घेऊन ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यासंदर्भात अपिलार्थीच्या पोच पावतीची प्रत त्यांनी आयोगास दाखविली असून यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडील सध्या उपलब्ध असलेली माहिती मिळाली आहे असे आढळून येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विश्वेश विजयकुमार शेटे, रंगारगल्ली, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद मा. शाळा, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८६

निर्णय दिनांक २१-०७-२००९

१ श्री. गायके पांडुरंग दगडोबा, : अपिलार्थी
शहीद भगतसिंग चौक, दत्त कॉलनी, म. फुले शाळेच्या
बाजूस, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

त्रयस्थ पक्ष : : प्रदिप गॅस एजन्सी, माजलगांव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे माजलगांव येथील प्रदिप गॅस एजन्सीकडील गॅस वितरण, जोडणी, नवीन जोडणी संदर्भात दिनांक १२-०७-२००७ ते १५-१२-२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी त्रयस्थ पक्ष प्रदिप गॅस एजन्सी माजलगांव यांच्याकडे दिनांक ०७-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे ही माहिती मागितली. तथापि त्रयस्थ पक्षाने माहिती उपलब्ध न करुन दिल्याने अपिलार्थीस माहिती उपलब्ध होऊ शकली नाही त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०४-२००८ रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला. या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाकडून माहिती घेऊन ती सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्ष, प्रदिप गॅस एजन्सीकडे उपलब्ध असणे अनिवार्य आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही स्वंयप्रेरणेने घोषित करावयाची अशी माहिती असल्याचे दिसून येते. त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याकरिता हिंदुस्थान पेट्रोलियमच्या कंपनीच्या औरंगाबाद येथील कार्यालयाशी संपर्क साधल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयावरुन दिसून येते. या

निर्णयात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याशी सरळ संबंधित नाही व संबंधित त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. अपिलार्थीने ज्या विषयाशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे तो मूळ विषय केंद्रीय शासनाच्या अखत्यारितील आहे. त्रयस्थ पक्षावर एका विशिष्ट मर्यादेपलीकडे माहिती अधिकाऱ्यांचे नियंत्रण नाही. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीच्या औरंगाबाद शाखेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी अंतर्गत अर्ज करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गायके पांडुरंग दगडोबा, शहीद भगतसिंग चौक, दत्त कॉलनी, म. फुले शाळेच्या बाजूस, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८७

निर्णय दिनांक २१-०७-२००९

१ श्री. स्वयंप्रकाश रंगनाथ खडके, : अपिलार्थी
प्लॉट नं. १९, निवेदिका इमारत, सारडा नगरी,
डी. पी. रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०५-२००८ रोजी फेर नोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार दिनांक १६-११-२००६ रोजी अर्ज करुनही त्यांना जन माहिती अधिका-याने कोणतीही माहिती न पुरविल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगांव यांच्याकडे दिनांक ०८-

०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-११-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, माजलगांव यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मौजे देवडी, तालुका वडवणी, जिल्हा बीड येथील गट नंबर १११ च्या मालकी हक्कासंदर्भात श्रीमती सुशिला काळे यांनी तहसीलदार, माजलगांव यांच्याकडे दिनांक १६-०६-८९ रोजी दिलेल्या जबाबाच्या मूळ प्रतीची सत्यप्रत मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगांव यांच्याकडे दिनांक ०८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास अवगत केली. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांचे वडील श्री. रंगनाथ खडके आणि सौ. सुशिला लक्ष्मणराव काळे यांच्यामध्ये देवडी येथील जमीन गट नंबर १११, १०४ च्या संदर्भात दावा क्रमांक १६/७६ सेशन कोर्ट, बीड येथे चालू होता. या प्रकरणी १९७९ साली कोर्टात परस्पर तडजोड होऊन सौ. सुशिला काळे यांनी गट नंबर १११ व १०४ अपिलार्थीचे वडील रंगनाथ खडके

यांना कायमस्वरुपी विक्री केल्याने या गटावर अपिलार्थीच्या वडीलाची वहिती व मालकी लागली. यासंदर्भात अपिलार्थीच्या वडीलांची लागलेली वहिती व मालकीबाबत सौ. सुशिला काळे यांचा काही आक्षेप नाही असा जबाब सौ. सुशिला काळे यांनी दिनांक १६-०६-८९ रोजी नायब तहसीलदार, माजलगांव यांच्यासमोर दिला. त्याची प्रमाणित प्रत अपिलार्थीकडे उपलब्ध आहे. तथापि या प्रमाणित प्रतीवर सौ. सुशिला काळे यांची सही नाही. अपिलार्थीस याच जबाबाची व सौ. सुशिला काळे यांची स्वाक्षरी असलेल्या मूळ जबाबाची सत्यप्रत आज रोजी आवश्यक आहे व तीच त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. तथापि त्यांना ती प्रत आजतागायत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकली नाही. ती त्यांना मिळण्यासाठी त्वरित आदेश व्हावेत, अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

अपिलार्थीच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अथवा महसूल विभागाची बाजू मांडण्यासाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी स्वत: कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या जबाबाची प्रत त्यांनी दिनांक ०७-०३-१९९२ रोजी तहसीलदार, माजलगाव यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेतली आहे. या जबाबाच्या नकलेची आयोगाने तपासणी केली असता ती प्रत तहसीलदार, माजलगाव यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेख कक्षातून दिनांक ०७-०३-१९९२ रोजी दिल्याचे दिसून येते. यावरुन ही अपिलार्थीकडे उपलब्ध असलेली माहिती अधिकृत माहिती आहे असे अनुमान काढण्यास हरकत नाही. या जबाबावर सौ. सुशिला लक्ष्मण काळे यांची सही नाही. अपिलार्थीस सौ. सुशिला लक्ष्मण काळे यांची सही असलेल्या जबाबाची नक्कल हवी आहे. ज्याअर्थी जबाबाची नक्कल म्हणून अधिकृत प्रत तहसील कार्यालयाकडून दिनांक ०७-०३-१९९२ रोजी ज्याअर्थी देण्यात आली आहे त्याअर्थी या जबाबाची सौ. सुशिला लक्ष्मण काळे यांची सही असलेली प्रत माजलगांव तहसील कार्यालयात उपलब्ध असेल हे निश्चित

किंवा तहसीलदार माजलगांव यांच्या अभिलेख कक्षातून दिनांक ०७-०३-१९९२ रोजी अपिलार्थीस सदोष माहिती पुरविली गेली असाही त्याचा अर्थ निघू शकतो. सबब जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, माजलगांव यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

राज्य शासनाच्या महसूल विभागाचे कर्मचारी जनसामान्यांना त्यांच्या दैनंदिन व्यवहारामध्ये कसे वेठीस धरतात याचे हे उदाहरण म्हणजे एक उत्तम नमुना आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत पुरविली नाही. परतु जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक ०८-०६-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन नायब तहसीलदार यांच्यावरही कडी केलेली आहे. अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज तहसील माजलगांव येथे अनुक्रमे दिनांक १६-११-२००६ व दिनांक ०८-०६-२००७ रोजी प्राप्त झाल्या-प्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयातील आवक जावक लिपीकाची सही व शिक्का अपिलार्थीने आयोगा-कडे दाखल केलेल्या त्यांच्या मूळ अर्जाच्या व प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवरुन स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज व अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाला नाही असे त्यांना म्हणता येणार नाही.

जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अधिनियमातील कलम ७ (८) च्या तरतुदीन्वये तसे अपिलार्थीस कळविणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता अपिलार्थीस अपेक्षित माहितीपासून वंचित ठेवले आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्याच्या कोणत्याही कृतीचे समर्थन मूळात असू शकत नाही, असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन

माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार माजलगांव (दिनांक १६-११-२००६ रोजी या पदावर व तदनंतर तीस दिवसापर्यंत कार्यरत राहिलेले सर्व अधिकारी) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार माजलगांव (दिनांक ०८-०६-२००७ रोजी व तदनंतर आजपर्यंत कार्यरत असलेले) यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची यथायोग्यरित्या दखल घ्यावी असे सचिव (महसूल) यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार माजलगांव यांना उपरोक्त प्रकरणी एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

४. जिल्हाधिकारी, बीड यांनी वरील आदेश क्रमांक ३ च्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांना हे आदेश विहित मुदतीत पोहोचतील असे पहावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. स्वयंप्रकाश रंगनाथ खडके, प्लॉट नं. १९, निवेदिका इमारत, सारडा नगरी, डी. पी. रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८८

निर्णय दिनांक २१-०७-२००९

१ श्री. संदिपान अप्पाराव थोरात, : अपिलार्थी
व्दारा : मेडीसिन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर,
तालुका धारुर, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, धारुर,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०४-२००८ रोजी निर्णय दिला. तथापि या निर्णयात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसात माहिती दिली नाही या मुद्दयावर जन अपिलीय अधिकारी यांनी लक्ष न पुरविता त्यांचे अपील फेटाळून

लावले आणि फीस भरल्यानंतर माहिती द्यावी असे आदेश दिले, जे चुकीचे आहेत. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावून अपिलार्थीस विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी अशी त्यांनी या अपिलामध्ये आयोगास अखेरीस विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सन २००४ ते २००७ या कालावधीशी संबंधीत होती. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी दोन महिन्याचा कालावधी जन माहिती अधिकारी यांना लागणार असल्याचे अपिलार्थीस ज्ञात केले व तदनंतर दिनांक २४-०४-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४०० इतकी अनामत रक्कम त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीस हे पत्र प्राप्त होण्यापूर्वी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे सुनावणीच्या दिवशी म्हणजे दिनांक २९-०४-२००८ रोजी पूर्णपणे तयार होती. तथापि त्या दिवशी अपिलार्थीने या माहितीचा स्वीकार न केल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही. यानंतर ०४-०९-२००८ रोजी त्यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती पुरविली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोच पावती त्यांनी आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसाच्या आत देणे त्यांना अनिवार्य होते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी तीस दिवसाचा कालावधी पुरेसा आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०२-२००८ रोजी दिलेला प्रतिसाद पूर्णतः चुकीचा आहे. कारण माहिती अधिकार अधिनियमाचा मूळ पायाच मूळात तीस दिवसाच्या आत अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणे असा असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना माहिती देण्यासाठी दोन महिन्याचा कालावधी लागेल असे अपिलार्थीस कळविणे किंवा अशा प्रकारचा पत्रव्यवहार करण्याची कोणतीही तरतूद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर दिनांक २४-०४-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीची अनामत रक्कम रुपये ४०० इतकी त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देण्यासाठी लागणारे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत शुल्काच्या संपूर्ण तपशिलासह, अर्जदारास कळविणे

अभिप्रेत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही प्रकारे अनामत म्हणून शुल्क स्वीकारण्याची तरतूद या अधिनियमामध्ये नाही. त्यामुळे मूळात दिनांक २४-०४-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती तयार होती किंवा कसे हीच शंका आयोगास येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी दिनांक ०४-०९-२००८ रोजी पुरविलेल्या माहितीची एकूण पृष्ठे फक्त २९ इतकीच होतात त्यामुळे या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे विहित मुदतीत मागितले असते तर ही बाब क्षम्य ठरली असती. तथापि अपिलार्थीस २९ पृष्ठांची माहिती विहित मुदतीनंतर देऊन अपिलार्थीकडून ४०० रुपये अनामत रकमेची अपेक्षा करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी याप्रकारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक २ मध्ये लेखा परिक्षण झाले असतांना व मुद्दा क्रमांक ३ मध्ये त्यांच्या वाहनावर झालेला महिनानिहाय खर्च ही माहिती दिली नसल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणामध्ये अपूर्ण माहिती पुरविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ती स्वीकारली नाही. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाव्दारे माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस समक्ष माहिती देण्याचे कोणतेही प्रयोजन नव्हते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीस माहिती देऊ केली असता त्यांनी ती स्वीकारली नाही हा युक्तिवाद, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील वस्तुस्थितीचे अवलोकन करता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशा

प्रकारच्या कृतीव्दारे स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील उर्वरित माहिती त्यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संदिपान अप्पाराव थोरात, व्दारा : मेडीसिन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर, तालुका धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

उपविभाग, धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८८९

निर्णय दिनांक २१-०७-२००९

१ १. श्री. शहाजी तुकाराम तांबारे, अपिलार्थी
२. श्री. अविनाश आबाराव पुरताडे, मु. पो. आंदोरा,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद
उपविभाग, कळंब, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद
उपविभाग, कळंब, जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी दाखल केलेले आणि आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले अपील क्रमांक ८८९/२००८ हे आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २२-०५-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले

असून या पत्रामध्ये अपिलार्थीने आयोगास त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्याने त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन अपिलार्थीचे त्यांनी आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी दाखल केलेले व्दितीय अपील या आदेशाव्दारे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८८९/२००८, दिनांक ०९-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २१-०७-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शहाजी तुकाराम तांबारे, मु. पो. आंदोरा, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९०

निर्णय दिनांक २१-०७-२००९

१ श्री. सय्यद वजिर सय्यद अहमद, : अपिलार्थी
बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये माहिती दिली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सन २००० ते २००७ या कालवधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अर्धापूर येथील वॉर्ड क्रमांक ५, ६ बरकतपुरा भाग येथील ग्रामपंचायत कार्यालय अर्धापूर मार्फत औधूत काकडे यांच्या घरापासून सुरुवात झालेल्या सांडपाण्याच्या सिमेंट नाली बांधताना ज्या मजुरांनी कामे केली त्या मजुरांची नांवे, कामाच्या मोजमाप पुस्तिकाच्या प्रती व मजूरांना दिलेले धान्य कुपन्सचे क्रमांक, मजुरीची रक्कम व धान्याचे परिमाण आणि धान्य ज्या स्वस्त धान्य दुकानदारामार्फत देण्यात आले त्या स्वस्त धान्य दुकानदारांची नांवे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात होती व त्यांच्या ग्रामपंचायतीकडे विस्तृत कार्यभार असल्याने त्यांना अपिलार्थीस मुदतीत माहिती देणे शक्य झाले नाही. जन

अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतरही अपिलार्थीस का माहिती दिली नाही अशी आयोगाने विचारणा केली असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे माफी मागितली व अपिलार्थीस दोन दिवसात माहिती देण्याचे आयोगास आश्वासीत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचे कोणत्याही प्रकारे पालन केल्याचे या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर आढळून येत नाही. आज सुनावणीच्या वेळी जरी त्यांनी अपिलार्थीस दोन दिवसाच्या आत माहिती देण्याचे कबूल केले असले तरी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती विशेषतः त्याचा कालावधी पाहता, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना दोन ते तीन आठवडे इतका कालावधी लागेल असे आयोगाचे अनुमान आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच २० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच जन माहिती अधिकारी यांचा, त्यांच्या ग्रामपंचायतीच्या कामाची व्याप्ती मोठी असल्याने अपिलार्थीस देय माहिती देता आली नाही हा त्यांचा युक्तिवाद, आयोग अमान्य करीत आहे. कारण त्यांना जर अपिलार्थीस खरोखरच माहिती द्यावयाची इच्छा असती तर किमान जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजी निर्णय दिल्यानंतर तरी त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देऊ केली असती. तथापि आज देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने या प्रकरणी मागितलेली माहिती तयार नाही. यावरुन त्यांना अपिलार्थीस खरोखरच माहिती द्यावयाची आहे किंवा कसे हे आयोगास कळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अशा प्रकारे माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याचे स्पष्ट होत असल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वतःला पात्र ठरविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी आज रोजी आयोगासमोर

त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेपुर संधी देऊन वरीलप्रमाणे केलेला युक्तिवाद आयोगास कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येणे शक्य नाही.

सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणांशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त २५ हप्त्यामध्ये शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

अपिलार्थीच्या या शास्तीची रक्कम गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड यांनी त्यांच्या पगारातून परस्पर कपात करावी व कपात केलेली वरील शीर्षात जमा करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच वीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. जी. टी. कानडखेडकर) यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांच्याकडून गट विकास अधिकारी, पंचायत

समिती, मुदखेड यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करुन घ्यावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद वजिर सय्यद अहमद, बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९१

निर्णय दिनांक २१-०७-२००९

१ श्री. चंद्रकांत पिराजी गव्हाणे, : अपिलार्थी
रा. कामठा (बु.), पो. कामठा (बु.), तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्ह्यातील घाऊक व अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांच्या संदर्भात त्यांना वेळोवेळी करण्यात आलेल्या रॉकेल पुरवठ्यासंदर्भात सन २००२ ते २००७ या पाच आर्थिक

वर्षाच्या कालावधीशी संबंधित विस्तृत प्रमाणात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती व या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा त्यांनी उल्लेख केला आहे. तथापि यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडला नव्हता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ते स्वतः दारिद्र्यरेषेखाली नसल्याने सदर माहिती देण्याचे नाकारले व ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सादर करण्याचे अपिलार्थीस कळविले व याच पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असणा-या माहितीपोटीचे शुल्क रुपये २१६० इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे अथवा मनीऑर्डरने पाठविण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०३-२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००८ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व जन अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीकडे त्यांनी ते दारिद्र्य-रेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा पुरावा मागितल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्याकडे श्री. गव्हाणे पिराजी खंडूजी या व्यक्तीच्या नावाने ग्रामपंचायत कामठा (बु.) यांनी दिनांक २०-११-२००७ रोजी दिलेले प्रमाणपत्र सादर केले. ते प्रमाणपत्र श्री. गव्हाणे पिराजी खंडूजी या एकाच व्यक्तीशी

संबंधित आहे. तसेच अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क देखील अपिलार्थीने त्यांच्याकडे त्यांनी दिनांक ३१-१२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये सूचित केल्याप्रमाणे भरले नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांनी आजतागायत माहिती पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासोबत प्रथमतः ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही पुरावा सादर केला नाही व नंतर जो पुरावा सादर केला तो पुरावा म्हणजे दुस-या व्यक्तीला प्रमाणपत्र दिलेले होते त्या व्यक्ती संदर्भातील प्रमाणपत्र आहे. सदर व्यक्ती म्हणजे अपिलार्थीचे वडील असून अपिलार्थी हे सज्ञान असून ते पत्रकारितेचा व्यवसाय करत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. त्यामुळे अपिलार्थीचे वडील जरी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असले तरी त्यांच्या प्रमाणपत्राच्या आधारे अपिलार्थी हे स्वतः दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत असे म्हणता येणार नाही. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याची या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोठेही तयारी दर्शविली नाही, हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंद्रकांत पिराजी गव्हाणे, रा. कामठा (बु.), पो. कामठा (बु.), तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८३
निर्णय दिनांक २२-०७-२००९

१. श्री. भिमराव कोंडिबा भोसले, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रभारी प्राचार्य,
श्री.बंकटस्वामी महाविद्यालय,
जालना रोड,बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
श्री.बंकटस्वामी महाविद्यालय,
जालना रोड,बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक,
श्री बंकटस्वामी महाविद्यालय,बीड
त्रयस्थ पक्ष : श्री. जी.बी.सोंडगे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि.०२.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही व त्यावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी हे सकृतदर्शनी दोषी असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करावी व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. सोंडगे जी.बी. यांच्याशी सन १९९७-९८ ते २००२ ते २००३ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पीड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे काही माहिती पाठविली, ती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचा पुरावा जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केला आहे. तथापि माहिती प्राप्त होऊनही, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची व मोफत माहिती देण्याची विनंती केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.०३.२००८ रोजी आपला निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील उर्वरित मुद्यांवरील माहिती २० दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे त्यांनी उर्वरित माहिती अपिलार्थीस दि.२६.०३.२००८ रोजी पोस्टाद्वारे पाठविली. तथापि मूळ अर्जासंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दि.०१.०१.२००८ रोजी व

तदनंतर दि.२६.०३.२००८ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य माहिती पाठविल्याचे आयोगास अवगत केले व यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्यासंदर्भात एकूण ५ मुद्याद्वारे माहिती मागविली आहे. त्यातील मुद्दा क्र.२ अंशत:, - '-------- प्रा.सोंडगे यांना बडतर्फ केल्याचे आदेश दिले होते काय?' व मुद्दा क्र.३ व ४ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने या मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी पूर्णतया विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा खुलासे अपेक्षित करणारी माहिती मागणे ती अधिनियमातील माहिती या शब्दाच्या व्याप्ती बाहेरची असल्याने, अनुज्ञेय नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.०१.२००८ व दि.२६.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती दिल्याचे आढळून येत आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडील माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने केलेली पोचसही व आयोगाकडील अर्जावर केलेली सही यामध्ये फरक आहे. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती सुलभतेने उपलब्ध होण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण देय माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे कोणतेही शुल्क न आकारता पाठवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने दडवून ठेवली असल्याचे अथवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या

द्वितीय अपील अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे कोणतेही आदेश आयोग देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भिमराव कोंडिबा भोसले,रा.ब्लॉक नं.११,फुले कॉलनी,शिवाजी हायस्कुलसमोर, खोकडपूरा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, श्री बंकटस्वामी महाविद्यालय, जालना रोड, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,श्री.बंकटस्वामी महाविद्यालय,जालना रोड,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९२
निर्णय दिनांक २२-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विनायक भगवान पंडित,<br>गेवराई, जि.बीड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,पाटोदा,जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,पाटोदा,<br>जि.बीड | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,पाटोदा,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांना आपली बाजू मांडता आली नाही व अद्यापपावेतो आवश्यक ती माहिती त्यांना न मिळाल्याने आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य द्यावी व या प्रकरणी जन माहिती अधिकारी हे दोषी असल्यामुळे दि. २८.०२.२००८ पासून दि.१०.०५.२००८ या कालावधीकरिता दररोज रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये हैद्राबाद कूळ वहिवाट शेतजमीन,१९५० च्या संबंधातील संचिका क्र.७५/६० या संचिकेच्या संपूर्ण नकलेची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन १९६० ते

दि.२८.०१.२००८ या कालावधीशी संबंधित होता.अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

"हैद्राबाद कूळ कायदा,अधिनियम १९५० च्या नुसार संचिका क्र.७५/६० भगवान दासू वि.नारायण बाजीराव या संचिकेच्या संपूर्ण नकला हव्या आहेत". अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती. अपिलार्थीने हा अर्ज तहसील कार्यालय, पाटोदा यांना उद्देशून केला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०६.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या कार्यालयाचे अभिलेखापाल यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०४.२००८ रोजी प्रथम सुनावणी ठेवली व तदनंतर दि. २८.०४.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश दि. ०२.०५.२००८ रोजी पारित केले व अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले. अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर करताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या संचिकेसंबंधी माहिती मागितली आहे, ती संचिका स्वत: तहसीलदार यांनी शोध घेऊनही त्यांना सापडली नसल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील या दोनही सुनावणीस अपिलार्थी हे हजर राहू शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका त्यांनी स्वतः

त्यांच्या कार्यालयातील अभिलेख कक्षात जाऊन शोध घेतला असता, ही संचिका त्यांना प्राप्त झाली नाही. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली संचिका अस्तित्त्वात आहे किंवा कसे यासंबंधी महसूल कार्यालयाकडे काही पुरावा आहे किंवा एखादा संदर्भ अस्तित्त्वात आहे काय, असे आयोगाने विचारले असता, अशाप्रकारचा कोणताही संदर्भ किंवा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जरी अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असली तरीही अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भित केलेली संचिका क्र. ७५/६० ही मूळात अस्तितवात आहे किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही. जन अपिलीय अधिकारी हे देखील या संचिकेच्या अस्तित्त्वाबाबत साशंक आहेत. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये, सदर संचिका अस्तितवात असल्याबाबतचा कोणताही वैध पुरावा समाविष्ट नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही खरोखरीच वैध आहे किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता व आयोगाच्या शंकांचे निराकरण करण्याकरिता अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दोन वेळा संधी देऊनही ते प्रथम अपिलाच्या सुनावणीस, त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी उपस्थित राहिले नाहीत, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २२-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विनायक भगवान पंडित,दिपाली ज्वेलर्स,लोहार गल्ली, मु.पो.ता.गेवराई, जि.बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,पाटोदा,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,पाटोदा,जि.बीड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९३
निर्णय दिनांक २२-०७-२००९

१ श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे, उस्मानाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, संवसु मंडल कार्यालय,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित,
उस्मानाबाद : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, संवसु मंडल कार्यालय,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित,
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०५.२००८ रोजी केलेले द्वितीय अपील, जे आयोगास शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून दि.२१.०५.२००८ रोजी प्राप्त झाले आहे, ते अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणाबाबत आयोगाच्या असेही निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीने अशाचप्रकारचे व याच माहितीसाठीचे द्वितीय अपील मुख्य माहिती आयुक्तांकडे दि.२६.०२.२००८ रोजी सादर केले होते व अपिलार्थीच्या या अपील अर्जावर राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद

खंडपीठाने दि.०८.०६.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केल्याचा निर्णय घेतला आहे. अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर यापूर्वीच निर्णय झाला असल्याने, अपिलार्थीचे आज रोजीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र. ८९३/०८, दि.०५.०५.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे,लिंबोनी बाग, गणपती मंदिराजवळ,तांबरी विभाग,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, संवसु मंडल कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित, दंडनाईक कॉम्प्लेक्स,बार्शी नाका, उस्मानाबाद या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, संवसु मंडल कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित, दंडनाईक कॉम्प्लेक्स,बार्शी नाका, उस्मानाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**
**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९४
निर्णय दिनांक   २२-०७-२००९

१ श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे,  :  अपिलार्थी
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा  :  प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय,उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय,उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय,उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खरी माहिती न पुरविता, खोटी व बनावट माहिती पुरविली, यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सेक्युरिटी गार्ड डयुटी रजिस्टर संबंधी सन २००२ ते २००८ या कालावधीची

काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - फेडरल सेक्युरिटी फोर्सच्या सेक्युरिटी गार्ड डयुटी नोंदवहीसंबंधी एकूण ४ मुद्याद्वारे काही माहिती मागितली होती. मात्र प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व जन माहिती अधिकारी यांनी खरी माहिती लपविल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१)च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले असल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०३.२००८ व दि. २२.०४.२००८ रोजी सुनावणी घेऊन दि. ०३.०५.२००८ रोजी आपला निर्णय पारित केला व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर असल्याचा निष्कर्ष काढला.तथापि तरीही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती बनावट असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थीने त्यांचे द्वितीय अपील आयोगाकडे सादर करताना त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून बनावट माहिती प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. तथापि यासंबंधातील कोणताही पुरावा त्यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही, तसेच यासंबंधी प्रत्यक्ष युक्तिवाद करण्यासाठी देखील ते आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २२-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रेवणसिध्द शंकरराव माळकुंजे,लिंबोनी बाग, गणपती मंदिराजवळ,तांबरी विभाग,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, संवसु विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित, ताजमहाल टॉकीजजवळ,सोलापूर रोड, उस्मानाबाद या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, संवसु विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित, ताजमहाल टॉकीजजवळ,सोलापूर रोड, उस्मानाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९५
निर्णय दिनांक २२-०७-२००९

१. श्री. अर्जुन शहाजी मोरे, : अपिलार्थी
रा.शहापूर,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
बांधकाम विभाग,उस्मानाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मंडळ,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०५.२००८ रोजी फेर नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगाकडे अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न पुरविल्याने जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) नुसार दि. ०९.०७.२००७ पर्यंत दंडीत करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १२.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे शहापूर ता.तुळजापूर येथील विहीर पाईपलाईन व पाण्याच्या टाकीचे अंदाजपत्रकाच्या व मोजमापपुस्तिकेच्या प्रतीची मागणी केली होती. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती

अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०७.२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंबंधी कोणताही निर्णय न देता, या सुनावणीचे इतिवृत्त दि. १४.०७.२००७ रोजी जारी केले. या इतिवृत्ताचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस दि. ०९.०७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीमध्ये जरी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असली तरी संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थीच्या दि. १२.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जासंबंधी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. २४.०५.२००७ रोजीच्या पत्रान्वये, रु.१०७/- भरण्यासाठी कळविले आहे. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी, यासंदर्भात अपिलार्थीचे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना उद्देशून लिहिलेले दि.१५.०३.२००७ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या दि.१२.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात प्रत्यक्ष माहिती उपलब्ध करुन दिली व ही माहिती तपासल्यानंतर अपिलार्थीचे पूर्णपणे समाधान झाले व त्यांची या अपिलासंबंधी कोणतीही तक्रार राहिलेली नाही. याच पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांचा दि.१२.०२.२००७

रोजीचा अर्ज रद्द करुन निकाली काढण्यात यावा, असे नमूद केल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे. याप्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दि. १५.०३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांचा दि.१२.०२.२००७ रोजीचा अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे व याचबरोबर दि. १९.०७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करुन जन माहिती अधिकारी यांना दंडीत करण्याची विनंती आयोगाकडे केली आहे. यावरुन अपिलार्थीचे या प्रकरणातील वर्तन अशाप्रकारे विसंगत असल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या विसंगतीपूर्ण वर्तनाबाबतचे स्पष्टीकरण देण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे व तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांतील व युक्तिवादातील मुद्यांचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अर्जुन शहाजी मोरे, मु.पो.शहापूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद-४१३५०१

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग,उस्मानाबाद या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, लातूर यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९६
निर्णय दिनांक २२-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. चंद्रकांत बाबूराव अडसुळे, लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अप्राप्त असल्यामुळे, पुरविलेली माहिती चूक व दिशाभूल करणारी असल्यामुळे, आयोगाकडे अपील सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या आस्थापना व सेवाविषयक बाबीसंबंधी एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २१.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०४.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे

अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस उर्वरित माहिती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि अपिलार्थीस ही माहिती मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केली की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दि.२१.०१.२००८ रोजी व तदनंतर त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय दि.१२.०३.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर दि. १६.०५.२००८ रोजी उर्वरित माहिती पुरविली आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्या नगरपरिषदेकडील कर्मचारी असून त्यांच्या मूळ गाऱ्हाण्याचा आता निपटारा झालेला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करतेवेळी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली नव्हती, तथापि त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दि.१६.०५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयास अनुसरुन उर्वरित माहिती पुरविलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.०५.२००८ रोजी पुरविलेली माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. या माहितीवर अपिलार्थीचे आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये किंवा त्यानंतरही कोणतेही अभिप्राय नाहीत, तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे सिध्द करण्यासाठी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केलेला

नाही व ते स्वतःही आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना मानसिक त्रास झाल्याबद्दल यथोचित नुकसान भरपाईची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी कोणत्याही प्रकारची निश्चित अशी मागणी वजा विनंती आयोगास केली नाही व यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर किंवा आज रोजीपर्यंत कोणताही लेखी पुरावा सादर केलेला नाही. याही उपर अपिलार्थीच्या सेवाविषयक सर्व बाबींचे निराकरण झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत बाबूराव अडसुळे, शाहु चौक, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९७
निर्णय दिनांक २२-०७-२००९

१. श्री. भगवान लक्ष्मणराव भायेकर, : अपिलार्थी
पूर्णा, जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी, नगरपरिषद, पूर्णा, जि.परभणी
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद
विद्यमान जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
नगरपरिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये स.नं.११ व १२ मध्ये आरक्षण किती केले आहे हे नकाशात दाखविले नाही. चतु:सीमा दाखविल्या नाहीत व आरक्षणाचा उद्देश देखील या माहितीमध्ये दिला नाही. त्यामुळे त्यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, पूर्णा शहरातील सर्व्हे नंबर ११ व १२ आणि त्याचे पोटहिश्श्यामध्ये नगर परिषदेने केलेल्या आरक्षणाबाबत एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, - "दि.१८.१२.२००६ पर्यंत पूर्णा शहरातील सर्व्हे नं.११ व १२ व त्याचे

पोटहिश्श्यामध्ये नगरपरिषद,पूर्णाने आरक्षण केले आहे काय?, आरक्षण असल्यास जागेचे क्षेत्रफळ,चतु:सिमा व नकाशाची प्रत, आरक्षणाचा उद्देश काय?" - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.०४.२००८ रोजी अपिलार्थीस आरक्षण नकाशाची प्रत पुरविली, परंतु या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती व तत्कालीन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे दि. १६.०४.२००८ रोजी माहिती दिली व तदनंतर अपिलार्थीने या पत्राद्वारे प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांना चतु:सीमेबद्दल विचारणा केली असून अपिलार्थीस परत दि.२८.०७.२००८ रोजी त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील चतु:सीमेच्या मुद्यावर माहिती पुरविलेली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पूर्णा शहरातील सर्व्हे नं. ११ व १२ च्या आरक्षणाच्या नकाशाची प्रत

दि. १६.०४.२००८ रोजी पुरविली आहे. तथापि या नकाशामध्ये चतु:सिमा दर्शविल्या नव्हत्या. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.०७.२००८ रोजी एक साधा अर्ज केला होता. या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०७.२००८ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीमधील भूखंडाच्या चतु:सिमा दाखविल्या. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०४.२००८ रोजी पुरविलेल्या माहितीवरुन अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या भूखंडावर खेळाचे मैदान, आठवडी बाजार, उद्यानाचे आरक्षण असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १६.०४.२००८ व २८.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीतील संपूर्ण मुद्यांचा समावेश असल्याचे आयोगास आढळून येत आहे. हे पाहता, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १६.०४.२००८ व २८.०७.२००८ अशा दोन टप्प्यामध्ये माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता माहिती देण्यासंबंधी आयोगातर्फे कोणतेही आदेश नाहीत, तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल संचालक, नगरपालिका प्रशासन यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२) संचालक, नगरपालिका प्रशासन यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भगवान लक्ष्मणराव भायेकर,न्यू आदर्श कॉलनी,पूर्णा,ता.पूर्णा,जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगरपरिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, नगरपालिका संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत,३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,सी-फेस,वरळी,मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९८
निर्णय दिनांक   २२-०७-२००९

१ श्री. मं.शकील अहेमद मं.वजीर अहेमद, नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी, नांदेड : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, जिल्हा क्रीडा विभाग,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.३१.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून, त्यांना संबंधित अधिकाऱ्यांनी मुदतीत माहिती दिली नसल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - युवक कल्याण-शिबीर/समाज सेवा शिबीर प्रबोधन शिबीर आयोजित माहिती अहवाल, एकूण प्राप्त प्रस्ताव, त्यांची नोंदणी प्रत, आवक/जावक क्रमांक, २००६-०७ या वर्षात एकूण वितरीत झालेल्या निधीचा तपशील, प्रस्ताव रद्द झालेल्या संस्थांची

नावे, प्रत्येक संस्थेचे बँक बॅलन्स, संस्थेच्या अध्यक्षांची नावे आणि क्रिडा समिती/निवड समिती/कार्यकारिणीची यादी - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने दि. २५.०३.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीचे या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०२.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नसल्याचे व संबंधित जन माहिती अधिकारी हे त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहत नसल्याबाबत आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या कार्यालयातील सर्व कागदपत्रे विखुरलेली असल्यामुळे अपिलार्थीस त्यांना माहिती कधी देता येईल, हे ते सांगू शकत नाहीत, असे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, ते या पदावर दि.१९.०६.२००९ पासून कार्यरत आहेत, यापूर्वी या पदावर श्री. अशोक गिरी (सध्या निलंबित, मुख्यालय जालना) हे माहिती अधिकारी कार्यरत होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती अपेक्षिली आहे. त्या पैकी मुद्दा क्र.१ शी संबंधित अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अत्यंत मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.५ मधील प्रत्येक संस्थेचे बँक बॅलन्स, अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात ते ठेवत नसल्याने, ही माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र याच मुद्यातील संबंधित संस्थेच्या अध्यक्षांची नावे त्यांच्याकडे उपलब्ध असतात, त्यामुळे अपिलार्थीच्या मुद्दा क्र.५ मधील संस्थेच्या अध्यक्षांच्या नावांची माहिती, इतपतच माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३,४ व ६ शी संबंधित माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे अनिवार्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या कार्यालयातील अभिलेखे अस्ताव्यस्त स्वरुपात पडले असल्यामुळे अपिलार्थीस त्यांना माहिती देणे शक्य नाही, असा युक्तिवाद केला आहे, तो आयोग अमान्य करीत आहे व कोणत्याही परिस्थितीत वर निर्णयामध्ये स्पष्ट केलेली ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसात विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणी उपसंचालक, क्रिडा लातूर यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आता या प्रकरणाचा दरदिवशी पाठपुरावा करुन संबंधित जिल्हा क्रिडा अधिकारी हे वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व अपिलार्थीस देय असलेली माहिती विहित मुदतीत देतील, याची दक्षता घ्यावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अत्यंत मर्यादित स्वरुपाची व सोपी अशी होती. एवढे असूनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, आजतागायत कोणतीही माहिती न देऊन, अंदाजे दीड वर्षे इतक्या कालावधीसाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला

आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री.अशोक गिरी, सध्या निलंबित-मुख्यालय जालना) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक यथायोग्य कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना १५ दिवसात विनामूल्य द्यावी.

३) संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मं.शकील अहेमद मं.वजीर अहेमद,मगदुम नगर, नई आबादी, घ.क्र.१-४-९५, पिठाची गिरणी,नांदेड-४३१६०२

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रिडा संकुल कार्यालय,जिल्हा क्रीडा विभाग,औसा रोड,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८९९
निर्णय दिनांक २२-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. शेख गियासुद्दीन म.मौलाना,<br>ता.जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल),<br>तहसील कार्यालय, देगलूर,जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, देगलूर, जि.नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून, त्यांना संबंधित अधिकाऱ्यांनी मुदतीत माहिती दिली नसल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या प्रलंबित प्रवासभत्ता देयकाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये - त्यांचे प्रवासभता अर्ज व देयकांची माहिती, प्रलंबित रु.५०००/- च्या प्रवासभत्त्याची रक्कम मिळणेबाबत तसेच अपिलार्थीने एका विशिष्ट प्रपत्रात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०८.१९९९ ते ०१.०४.२००२ या कालावधीत दिनांकवार व वर्षवार प्राप्त प्रवासभत्ता मिळणेबाबतचे अर्ज व देयके यांचा तपशील - ही माहिती मागितली होती, त्या प्रपत्रामध्ये अनुक्रमांक, दिनांक,प्राप्त टी.ए.बीलधारकांचे अर्ज व नाव व दि.०१.०८.१९९९ ते

०१.०४.२००२ पर्यंत मंजूर केलेले टी.ए.बील" या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी व्यवस्थितपणे केल्याचे आढळून येत नाही. तथापि अर्जाचे एकत्रित अवलोकन करता अपिलार्थीस दि.०१.०८.१९९९ ते ०१.०४.२००२ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झालेले व प्रलंबित असलेल्या टी.ए.बीलाची यादी, संबंधिताची नावे व यातून याच कालावधीमध्ये मंजूर झ ालेल्या टी.ए.बीलाचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित होता, असे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२८.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने यापूर्वीच अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता व कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या वरील कालावधीतील अंदाजे रु.५०००/- इतक्या रकमेचे प्रलंबित टी.ए.बील मंजूर करण्याबाबत आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२८.०१.२००९ रोजी पुरविलेली माहिती सादर करुन आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांच्या प्रलंबित प्रवासभत्ता बीलाची रक्कम दि.२९.०१.२००९ रोजी पूर्णपणे अदा करण्यात आली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीस दि.२९.०१.२००९ रोजी त्यांच्या प्रवासभत्ता बीलाची पूर्ण थकित रक्कम अदा केल्याची त्यांच्याकडील संबंधित कागदपत्रांची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. तसेच अपिलार्थीने दि.२८.०१.२००९ रोजी

त्यांच्या प्रवासभत्ता बीलासंदर्भात आता कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे कबूलीपत्र तहसीलदार यांना दिले आहे, याचीही प्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. आयोगास सादर केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांची प्रलंबित प्रवासभत्ता बीले संबंधितांकडून मंजूर करुन घेण्याचा उद्देश आता सफल झाला आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२८.०१.२००८ रोजी दिली व तदनंतर अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस त्यांचे प्रलंबित प्रवासभत्ता बील दि. २८.०१.२००९ रोजी अदा देखील झालेले आहे. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास उरले नसल्याने त्यांचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख गियासुद्दीन म. मौलाना,कौसर मंजील, एकबालनगर,धनेगाव (पाटी),ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९००
निर्णय दिनांक २२-०७-२००९

१. श्री. राम भुजंगा किडे, : अपिलार्थी
जि.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
नांदेड

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोहा,
जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपर्यंत त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली सविस्तर व योग्य माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देण्यात आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आठ दिवसांच्या आत सविस्तर माहिती देण्याचे आदेश देऊनही खोटी माहिती देण्यात आली व जन अपिलीय अधिकारी यांनी एक महिन्याचे

आत बील अदा करण्याचे आदेशित करुनही त्यांना बील देण्यात न आल्याने व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांचेवर, त्यांनी अपिलार्थीस खोटी माहिती देऊनही, कुठलाही दंड न लावल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सेलगाव गावातील अंतर्गत रस्त्याचे सन २००२ मधील बील दाखल करुनही अद्यापपर्यंत बील मिळाले नाही, हे बील केव्हा मिळणार व आतापर्यंत बील न मिळाल्याचे कारण काय, ही माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस कामाचे देयक त्यांच्याकडे संबंधित उपविभागाकडून प्राप्त झाले नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिली व ती ५१ दिवसांच्या विलंबाने दिली, असा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी हा निर्णय त्यांच्या कार्यालयात दि. २९.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊन दिला होता. सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचा लिखित निर्णय प्राप्त होण्यापूर्वीच दि. १२.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि या माहितीने देखील

समाधन न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दि. २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या बीलासंबंधी माहिती मागितली होती, ते बील रोहयोच्या कामासंबंधी होते. या योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी यांच्याकडून त्यांना जसजसा निधी प्राप्त होईल, तसतशी बीले अदा केली जातात. अपिलार्थीचे बील त्यांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे दि. १६.०३.२००५ रोजी पाठवूनही आजतागायत जिल्हाधिकारी,नांदेड यांच्याकडून त्यांना निधी पुरविला गेला नसल्याने ते अपिलार्थीचे बील अद्यापपर्यंत अदा करु शकले नाहीत. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे ज्यावेळी केला, त्यावेळी हे बील तांत्रिक शाखेकडे तपासणीसाठी प्रलंबित होते, तथापि लेखा शाखेने ही वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास न आणता सदरचे बील त्यांच्याकडे प्राप्त झाले नसल्याचे कळविले. अपिलार्थीपासून माहिती दडवून ठेवण्याचा असा त्यांचा कोणताही हेतू नव्हता.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि.१०.१२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमाप्रमाणे 'माहिती'चा विषय होऊ शकत नाही. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे,- 'अंतर्गत रस्ता-सेलगाव एम.बी.नं.२७८७ सन २००२ मध्ये दाखल करुनही अद्यापपर्यंत बील मिळाले नाही? (रोहयो)' -अशी विचारणा केली आहे. या विधानावरुन अपिलार्थीस नक्की कोणती माहिती द्यावयाची याचा बोध होत नाही. याच अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे त्यांनी -'सदरील बील केव्हा मिळणार?' -अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती भविष्यकाळातील आहे

आणि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेलीच माहिती अर्जदारास देणे त्यांना अधिनियमाप्रमाणे अभिप्रेत असल्याने अपिलार्थीने मागणी केलेली भविष्यकाळातील ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ द्वारे त्यांनी आतापर्यंत बील न मिळण्याचे कारण काय? अशी माहिती जन माहिती अधिकारी यांना विचारली आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कोणतीही कारणे, खुलासे अथवा स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती विचारणे अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे, एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती देखील देय होत नाही. हे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि.१०.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. अपिलार्थीस मूळात माहितीच जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंड लावण्याचे कोणतेही प्रयोजन या प्रकरणी उद्‌भवत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या बीलासंदर्भातील सद्यस्थिती दि.१२.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे स्पष्ट केली आहे व तसेच अपिलार्थीचे बील अदा करण्याकरिता जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून निधी प्राप्त करुन घेण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. हे पाहता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नसल्यामुळे ते फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राम भुजंगा किडे, मु. चिखलभोसी,पो.पानभोसी,ता.कंधार,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,लोहा, जि.नांदेड या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९०१
निर्णय दिनांक २२-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. जळबा गंगाराम हणमंते,<br>नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>वनपरिक्षेत्र अधिकारी, मुखेड,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक,<br>सहायक वनसंरक्षक कार्यालय (तेंदु पाने),<br>नांदेड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित - सन २००५-०६ ते डिसेंबर, २००७ च्या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयास जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेला निधी, गावनिहाय खर्च, मजूरांचे पगारप्रदानपत्र, मजूरांची पत्त्यासह यादी, कामाचा सद्यस्थितीचा अहवाल व स्थिती व काम पूर्ण झाले किंवा नाही, याबाबतची माहिती इ.च्या साक्षांकित प्रती - या मुद्यांवर माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती स्पीड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.०३.०३.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०४.२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भात आपला निर्णय दि.०२.०४.२००८ रोजी पारित केला. याद्वारे त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांचे दि.०१.०४.२००८ रोजीच्या सुनावणीचे इतिवृत्त पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने पाठविला होता. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि.१२.०२.२००८ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०३.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे चलनाद्वारे न केल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे निश्चित किती शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणे त्यांना क्रमप्राप्त होते, याचा कोणत्याही प्रकारे उल्लेख नाही. यावरुन अपिलार्थीस निश्चित किती शुल्क भरावयाचे याची कल्पना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या

दि.०५.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिली नसावी, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०३.२००८ रोजी अपिलार्थी यांना लिहिलेल्या पत्राचे त्यांनी परत अवलोकन करुन जर या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काची निश्चित रक्कम व या शुल्काचा इतर तपशील दिला नसेल तर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे आणि जर हा तपशील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०५.०३.२००८ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस दिला असेल तर ही माहिती अपिलार्थीस सशुल्क उपलब्ध करुन देण्यासाठी कळवावे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भातील संबंधितांनी कोणतीही पूरक कागदपत्रे उपलब्ध न करुन दिल्यामुळे व सर्व संबंधित अनुपस्थित असल्यामुळे आयोगास यासंदर्भात निश्चित आदेश देता येत नाहीत, तथापि आयोगातर्फे, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कृती हे आदेश निर्गमित होताच अपेक्षित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जळबा गंगाराम हणमंते, घोरबांड निवास, इंदिरा गांधी हौसिंग सोसायटी, शनिमंदिरासमोर, हडको, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, सहायक वनसंरक्षक कार्यालय (तेंदु पाने), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९०२ व ९०३
निर्णय दिनांक: २२-०७-२००९

१. श्री. शिवाजी रामराव कल्याणकर, :अपिलार्थी
रा.दिग्रस,ता.कंधार,जि.नांदेड

**विरुध्द**

१. अपील क्र.९०२/०८

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>अधिक्षिका,<br>महात्मा गांधी विद्यार्थिनी वसतीगृह,<br>दिग्रस (खुर्द), ता.कंधार,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाज कल्याण अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नांदेड | :प्रतिवादी |

२. अपील क्र.९०३/०८

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>प्रियदर्शनी प्राथमिक शाळा,<br>दिग्रस (खुर्द), ता.कंधार,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, कंधार,जि.नांदेड |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०४.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

उपरोक्त दोन अपील प्रकरणी अपिलार्थी श्री. शिवाजी रामराव कल्याणकर यांनी आयोगास उद्देशून दि.२१.०७.२००९ रोजी लिहिलेली दोन पत्रे आयोगास सादर करण्यात आली असून या दोनही पत्रांमध्ये त्यांनी विचाराधीन दोनही अपिले ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे व विचाराधीन सुनावणी रद्द करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांची आयोगाकडे सादर केलेली दोनही अपिले रद्द करण्याची विनंती केली असल्याने, विचाराधीन दोनही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र. ९०२/०८ व ९०३/०८, दि.११.०४.२००८ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी रामराव कल्याणकर,मु.दिग्रस (खु),ता.कंधार,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षिका,महात्मा गांधी विद्यार्थिनी वसतीगृह,दिग्रस (खुर्द), ता.कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,प्रियदर्शनी प्राथमिक शाळा,दिग्रस (खुर्द), ता.कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ९२९/२००८, ९३०/२००८, ९३१/२००८ व ९३२/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२९, ९३०, ९३१ व ९३२

निर्णय दिनांक २३-०७-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

त्रयस्थ पक्ष : अपील क्रमांक ९३०/०८ १ श्री. महंमद इसाक महंमद इब्राहिम
२ श्री. महंमद अकबर महंमद नवाज
अपील क्रमांक ९३२/०८ १ श्री. महंमद इसाक
२ श्री. महंमद अकबर महंमद नवाज

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेली केलेली चार स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या चारही अपील अर्जाच्या संदर्भात मूळ माहितीच्या अर्जांपैकी तीन प्रथम अर्ज एकाच दिवशी व चौथा प्रथम अर्ज दिनांक २६-१०-२००७ रोजी अपील क्रमांक ९३२/२००८ च्या संदर्भात केला आहे व चारपैकी प्रत्येकी दोन प्रथम अपील अर्ज दिनांक २१-०१-२००८ व २८-०१-२००८ रोजी केले असल्याने अपिलार्थीच्या चारही अपील अर्जांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकाच त्रयस्थ पक्षासंदर्भात मदिनातूल उलूम उर्दू प्राथमिक शाळा, तरोडा नांदेड यांच्याकडे माहिती मागविली असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने या चारही मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळ्या मुद्यावर माहिती मागविली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १४-१२-२००७ व दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागविली असता त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपील क्रमांक ९२९/२००८ व ९३१/२००८ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी व अपील क्रमांक ९३०/२००८ व ९३२/२००८ च्या संदर्भात दिनांक २८-०१-२००८ रोजी प्रथम अपिले केली. संबंधित प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही निर्णय दिले नाहीत, अथवा यासंदर्भातील कोणतेही आदेश पारित केले नाहीत, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने अपील क्रमांक ९२९/२००८, ९३०/२००८ व ९३१/२००८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-१२-२००७ रोजी आणि अपील क्रमांक ९३२/२००८ च्या संदर्भात दिनांक २६-१२-२००७ रोजी त्रयस्थ पक्ष मदरसे मदिनातूल उलूम या शिक्षण संस्थेच्या

मदिनातूल उलूम प्राथमिक शाळा मुलांची या शाळेसंदर्भात एकाच विषयाची वेगवेगळया मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे ९२९/२००८ व ९३१/२००८ च्या संदर्भात दिनांक २१-०१-२००८ रोजी व ९३०/२००८ व ९३२/२००८ च्या संदर्भात दिनांक २८-०१-२००७ रोजी चार प्रथम अपिले केली. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक २३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही हजर नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीचे माहितीसाठीचे प्रथम अर्ज व प्रथम अपिले अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या प्रथम अर्जांच्या व अपील अर्जांच्या झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या सर्व प्रथम अपील अर्जांवर सुनावणी घेऊन आदेश देणे आयोगास आवश्यक वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या वरील परिच्छेदात निर्देशित केलेल्या सर्व प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित

करावेत. या सुनावणीसाठीचे पत्र अपिलार्थीस किमान दहा दिवस अगोदर प्राप्त होईल असे त्यांनी पहावे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली चारही व्दितीय अपिले (अपील क्रमांक ९२९/२००८, ९३०/२००८, ९३१/२००८ व ९३२/२००८) निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ९२९/२००८, ९३०/२००८, ९३१/२००८ व ९३२/२००८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या वरील निर्णयामध्ये निर्देशित केलेल्या सर्व प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०७-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९३३

निर्णय दिनांक २३-०७-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार त्यांनी माहिती मिळण्याकरिता जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे रितसर अर्ज दिनांक २६-१२-२००७ रोजी दाखल केला. तथापि जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले असता प्रथम

अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्या कारणाने त्यांनी अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १४-११-२००७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार मुख्याध्यापक श्री. सय्यद आजम हाशमी सय्यद खाजा, मदिनातूल उलूम हायस्कूल यांना तीस दिवसाच्या आत म्हणजे दिनांक १४-१२-२००७ पर्यंत रुपये २५,००० /- इतकी दंडाची रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्याचे आदेशित केले होते, यासंदर्भात मुख्याध्यापक श्री. सय्यद आजम हाशमी सय्यद खाजा यांच्या पगारातून दंडाची रक्कम कपात करुन शासकीय कोषागारात जमा केली असेल तर त्या पावत्याची सत्यप्रत तसेच ती रक्कम जमा केली नसेल तर कोणत्या कारणाने जन माहिती अधिकारी यांनी ती दंडाची रक्कम वसूल केली नाही याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २८-०१-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबईच्या औरंगाबाद खंडपीठाने मा. राज्य माहिती आयुक्त यांच्या दिनांक १४-११-२००७ रोजीच्या दिलेल्या निर्णयावर दिनांक १०-०१-२००८ रोजी स्थगिती दिली आहे व त्याची प्रत शिक्षणाधिकारी कार्यालयास प्राप्त झाली आहे. ही बाब अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २६-१२-

२००७ रोजीच्या मूळ अर्जातील माहिती देण्यासंदर्भात अपिलार्थीस का कळविली नाही असे आयोगाने विचारले असता, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीला आयोगासमोर कोणताही खुलासा करता आला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कारवाई केली नाही. अपिलार्थीच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) व ७ (८) प्रमाणे कोणताही प्रतिसाद दिला नाही. राज्य माहिती आयुक्तांच्या दिनांक १४-११-२००७ रोजीच्या निर्णयाव्दारे संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातूल उलूम हायस्कूल यांना त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे एकूण २५,००० /- रुपये इतकी शास्ती लावण्यात आली होती. मा. आयुक्तांच्या या निर्णयाविरुध्द संबंधित मुख्याध्यापकाने मा. उच्च न्यायालय मुंबईच्या औरंगाबाद खंडपीठाकडे रिट दाखल केले असता मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मा. राज्य माहिती आयुक्तांच्या दिनांक १४-११-२००७ च्या निर्णयास दिनांक १०-०१-२००८ रोजी स्थगिती दिली आहे. अद्यापपावेतो संबंधित मुख्याध्यापकाने या शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात जमा केलेली नाही. अशा परिस्थितीत अपिलार्थीच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीस वस्तुस्थितीची कल्पना देणारी माहिती जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत देता आली असती. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास कोणताही प्रतिसाद न देता अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे टाळले. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करणारी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिक्षण संचालक, पुणे यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित वस्तुस्थिती स्पष्ट करणारी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या निर्णयाची प्रत त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक, पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी ( श्री. अशोक देवकरे) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल

कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ९३४/२००८ व ९३५/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९३४ व ९३५

निर्णय दिनांक २३-०७-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड मार्फत
नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही व्दितीय अपिलांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०२-२००८ रोजी माहितीचे प्रथम अर्ज केले असता त्यांनी मुदतीत माहिती न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले सादर केली असता जन अपिलीय अधिकारी यांनी सदरील प्रकरणी सुनावणी न घेता प्रकरणे प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड, मार्फत नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड यांच्याकडे त्यांच्या संस्थेसंदर्भात व त्यांनी घेतलेल्या देणग्यासंदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे दोन स्वतंत्र प्रथम अपील अर्ज दिनांक २४-०३-२००८ रोजी दाखल केले. सहायक धर्मादाय आयुक्त यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर कोणतीही सुनावणी न घेता निर्णय प्रलंबीत ठेवल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही हजर नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड यांच्याकडे मागितली होती. त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जांना कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने यासंदर्भात प्रथम अपिले सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे केली. तथापि शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून शासनाच्या शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/ केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे हे पाहता, या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त हे प्रथम अपिलीय अधिकारी नाहीत.

सहायक धर्मादाय आयुक्त हे फक्त त्यांच्या कार्यालयातील माहितीच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, मूळात अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात चुकीच्या प्राधिकरणाकडे दोनही प्रथम अपिले केली असल्याने सहायक धर्मादाय आयुक्त यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जांवर निर्णय घेण्याचे कोणतेही कारण त्यांना उरत नाही, हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः नव्याने प्रथम अर्ज व या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यापैकी जे या संदर्भिय प्रकरणाशी संबंधित आहेत त्या प्रथम अपिलीय अधिका-याकडे यासंदर्भात त्यानंतर प्रथम अपील करावे. विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी अपेक्षित केल्याने अपिलार्थीची विचाराधीन दोनही व्दितीय अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील क्रमांक ९३४/२००८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ९३५/२००८ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड मार्फत नोबल

उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ९३६/२००८, ९३७/२००८ व ९३८/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९३६, ९३७ व ९३८

निर्णय दिनांक २३-०७-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी,
नोमानियानगर, तरोडा बु. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी दाखल केलेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांच्याकडे दिनांक ३०-०१-२००८ रोजी अर्ज दाखल केले असता माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्याने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपिले दाखल केली. तथापि

प्रथम अपिलांवर या प्रकरणी अपिलांची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्याकारणाने त्यांनी तीनही विचाराधीन अपिले आयोगाकडे केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या तीनही प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ३०-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जांन्वये जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांच्याकडे संस्थेकडील ऑडिट रिपोर्ट, संचालक मंडळाची निवडणूक व संस्थेकडील कॅशबुकच्या संदर्भात वेगवेगळी माहिती विचारली होती.

अपिलार्थीने एकाच दिवशी तीन मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये ३२२४ इतके भरण्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपिले दाखल केली. अपिलार्थीच्या प्रथम अपिलांवर निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या तीनही अर्जासंदर्भात मागणी केलेली एकूण १५३७ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस देय होत होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जांव्दारे ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती, त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती रुपये ३०७४ व टपालखर्च रुपये १५० असे एकूण ३२२४ रुपये इतके शुल्क डी. डी. व्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास भरण्याचे त्यांनी दिनांक १८-०२-२००८ रोजीच्या रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेल्या

पत्राव्दारे सूचित केले होते, तथापि अपिलार्थी यांनी शुल्क न भरता त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रथम अपिले केली. यानंतर त्यांनी अपिलार्थीस परत दिनांक २४-०४-२००८ रोजी शुल्क भरण्याची विनंती केली होती. तथापि त्यांनी या शुल्काचा भरणा न करता आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, त्यांच्याकडे अपिलार्थी हे वारंवार मोठ्या प्रमाणात विस्तृत माहिती मागवित असतात व शुल्क भरण्याचे कळविल्यानंतर शुल्क न भरता अपिलामध्ये जात असतात. त्यांच्या अशा कृतीव्दारे संस्था व तिच्या प्राधिकरणांना विनाकारण मानसिक त्रास होत असतो. त्यामुळे अपिलार्थीच्या त्यांच्या संस्थेला त्रास देण्याच्या कृतीबद्दल पोलीस खात्याकडून त्यांची चौकशी व्हावी व अपिलार्थीवर नियमानुसार कारवाई व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी या युक्तिवादाच्या शेवटी व्यक्त केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ३०-०१-२००८ रोजीच्या तीनही प्रथम अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०२-२००८ रोजीच्या एकाच पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३२२४ इतके त्यांच्या कार्यालयात डी. डी. व्दारे भरण्याचे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे कळविले होते. तथापि या शुल्काचा भरणा करण्याची तयारी अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही दर्शविली नाही. तसेच शुल्काचा भरणा न करता त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे प्रथम अपिले केली. या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांची प्रथम अपिले चुकीच्या प्राधिकरणाकडे केल्याचे सिध्द होत आहे. आज रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे का भरले नाही, याचा खुलासा करण्यासाठी अपिलार्थी

आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले ही सहायक धर्मादाय आयुक्त यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जांवर निर्णय न दिल्या कारणाने केल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीने मूळात या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपिले चुकीच्या प्राधिकरणाकडे केली असल्याने अपिलार्थीचे तीनही अपील अर्ज फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ९३६/२००८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ९३७/२००८ फेटाळण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक ९३८/२००८ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नोमानियानगर, तरोडा बु. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ९३९/२००८ व ९४०/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९३९ व ९४०

निर्णय दिनांक २३-०७-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक ९३९/२००८ व ९४०/२००८

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
सना उर्दू हायस्कूल, तरोडा बु. नांदेड

२ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, तरोडा बु.
नांदेड

३ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी,
तरोडा बु. नांदेड मार्फत सना उर्दू प्राथमिक शाळा, तरोडा बु.
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नांदेड व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड या दोन स्वतंत्र जन माहिती अधिका-यांकडे दिनांक १७-१२-२००७ रोजी त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती मागविली असता संबंधितांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी सचिव, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, तरोडा बु. नांदेड यांच्याकडे दिनांक ३१-०१-२००८ रोजी प्रथम अपिले दाखल केली असता अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलांची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जांन्वये मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नांदेड व मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नांदेड यांच्याकडे त्यांच्या शाळेच्या संदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०२-२००८ रोजी माहिती पाठविण्यात येईल असे पत्राव्दारे कळविले. सदर पत्र आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०२-२००८ रोजी माहिती पाठविल्याचे कळविले असतांनाही अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संस्थेच्या सचिवाकडे दिनांक ३१-०१-२००८ रोजी प्रथम अपिले केली. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०२-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि माहिती प्राप्त होऊनही अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक २३-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही प्रकरणांशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष हे हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०२-२००८ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांच्या सुनावणीच्या वेळी संपूर्ण माहिती देऊन, या दोनही प्रकरणाशी संबंधित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याची, अपिलार्थीने त्यांच्याकडे पोच सही देखील केली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे जाणूनबुजून वारंवार माहितीची मागणी करतात, पैसे घेण्यासाठी त्रास देत असतात. तसेच हा त्रास नेहमीचा बंद व्हावा म्हणून ते मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये याचिका दाखल करण्याच्या विचारात आहेत. ही याचिका अपिलार्थीच्या विरुध्द दाखल करण्याची आयोगाने त्यांना परवानगी द्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या संदर्भात घेतलेल्या सुनावणीच्या दिवशी म्हणजे, दिनांक १४-०२-२००८ रोजी, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी दिलेली पोच पावती जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १४-०२-२००८ रोजी पूर्ण माहिती मिळाल्याचे अनुमान काढण्यास हरकत नसावी. अपिलार्थीने

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जांमध्ये असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जांवर सचिव, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, तरोडा बु. नांदेड यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही. तथापि आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेल्या त्यांच्या दिनांक १५-०४-२००८ रोजीच्या व्दितीय अपील अर्जांच्या अगोदरच जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०२-२००८ रोजी सुनावणी घेतली होती. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊनही अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जांमध्ये संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्याचे नमूद केले आहे, जे वस्तुस्थितीशी पूर्णतः विसंगत आहे, असे आयोगास आढळून आल्यामुळे व तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने आणि प्राप्त माहितीबाबत अपिलार्थीने आजतागायत आयोगाकडे त्यांचे कोणतेही लेखी निवेदन दाखल केले नसल्यामुळे, अपिलार्थीची विचाराधीन अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ९३९/२००८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ९४०/२००८ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, नोमानियानगर तरोडा बु. नांदेड मार्फत सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर, तरोडा बु. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०११
निर्णय दिनांक    २४-०७-२००९

१. श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळकर), : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
मंडळ,नांदेड.

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५-०६, २००६-०७ ते नोव्हेंबर २००७ पर्यंतच्या कालावधीतील माहिती एकूण २ मुद्याद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०१.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २९२/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०१.०२.२००८ रोजी केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०२.२००८ रोजी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला किंवा कसे याबाबत आयोगास कोणतीही कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत, यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेतला नाही, असे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.२६.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला आदेश पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि.२६.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला आदेश पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळकर),घर क्र. १३३-बी.,शिवकृपा निवास, शोभानगर,नांदेड

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र. १०१२/०८ व १०१३/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०१२ व १०१३
निर्णय दिनांक २४-०७-२००९

१. श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळकर), : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
मंडळ,नांदेड.

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - "कार्यकारी अभियंता यांनी आपल्या अधिकारात नांदेड सा.बां.विभागात सन २००० ते २००७ या कालावधीमध्ये शासनाच्या विविध योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या किती कामांना तुकडे पाडून काम करण्याची परवानगी दिली, त्या कामांची यादी"- अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१८.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४४/- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्या प्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०१.०२.२००८ रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थी, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दि. ०६.०२.२००८ रोजी व्यक्तिशः घेऊन गेले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि त्यांना कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि.०६.०२.२००८ रोजी प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. कारण सन २००३-०४ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत रत्नागिरी-सोलापूर रोडवरील एमएसएच-३ वर कि.मी.५८८/२०० मध्ये पूलाच्या कामाचे सात तुकडे

पाडण्यात आले व  ही सात कामे वेगवेगळया सहकारी संस्थांना देण्यात आली, अशी माहिती त्यांना अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाकडून माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार प्राप्त झाली आहे. या कामांचा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या दि.०६.०२.२००८ रोजीच्या यादीमध्ये समावेश नसल्याने, ही माहिती त्यांना अपूर्ण वाटत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, कामाचे तुकडे पाडण्याची परवानगी ही अधीक्षक अभियंता यांनी दिली असून ती परवानगी नंतर अधीक्षक अभियंता यांनी त्यांच्या दि. २७.०५.२००४ रोजीच्या पत्राद्वारे रद्द केली असल्याने, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये कार्यकारी अभियंता यांनी आपल्या अधिकारात तुकडे पाडून काम करण्याची परवानगी दिलेल्या कामाची यादी मागितली होती. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केलेली रत्नागिरी-सोलापूर रस्त्यामधील ५८८/२०० कि.मी. मधील पूलाच्या कामाचे तुकडे पाडण्यास दिलेल्या परवानगीची माहिती अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांनी त्यांच्या दि. १६.१०.२००३ रोजीच्या पत्राद्वारे दिली होती, असे अधीक्षक अभियंता यांच्या दि. २७.०५.२००४ रोजीच्या पत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांचा संबंध त्यांच्या मूळ अर्जातील माहितीशी कोणत्याही प्रकारे लागत नसल्याने व अपिलार्थीच्या मूळ अर्जानुसार मूळात जी माहिती प्राप्त झाली नाही, म्हणून प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे त्यांना वाटत आहे ती माहिती, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात मागितली नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली, हा त्यांचा मुद्दा सिध्द होऊ शकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने मूळ अर्जात मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या स्तरावर, त्यांनी तुकडे पाडण्याची परवानगी

दिलेल्या कामाची यादी पुरविली आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

**<u>अपील क्र. १०१३/०८:</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून खोटी माहिती मिळाल्याचे त्यामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सन २००० ते २००७ या कालावधीत ज्या कामाचे तुकडे पाडण्याची परवानगी जन माहिती अधिकारी यांनी अधीक्षक अभियंता यांच्याकडे केली होती, त्या कामाची व त्याप्रमाणे अधीक्षक अभियंता यांनी ज्या कामाचे तुकडे पाडण्याची मंजूरी दिली, त्या कामाची यादी मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस 'निरंक' अशी माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०२.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील मान्य केले. या अपील निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खोटी माहिती दिल्याचे सिध्द होत असल्याचे नमूद केले आहे. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून त्यांना नेहमीच अपूर्ण व चुकीची माहिती पुरविली जाते. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून कधीही माहिती प्राप्त होत नाही. या प्रकरणी त्यांनी मागणी केलेली माहिती, वेगळया अर्जाद्वारे, अधीक्षक अभियंता यांच्याकडून सन २००५-०७ च्या दरम्यान काही कामांचे तुकडे पाडून काम करण्याची परवानगी मिळालेली कामे कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावरुन केली गेली असल्याचे त्यांनी पुराव्यासह त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील सुनावणीच्यावेळी सिध्द केले आहे. आज रोजी अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयातील यासंबंधी प्राप्त झालेले पत्र त्यांच्याकडे उपलब्ध नाही. या चुकीबद्दल संबंधितांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संबंधी त्यांनी त्यांच्या कार्यालयातील लेखा शाखेतील सर्व संबंधितांना विचारणा केली असता त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यास 'निरंक' माहिती पुरविली असल्याने त्यांनी अंतिमतः अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २१.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे 'निरंक' माहिती पुरविली. तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. भोंगे यांनी स्वतःच्या स्तरावरुन परवानगीचे पत्र तयार करुन घेऊन त्यावर अधीक्षक अभियंता यांची मंजूरी आणली होती. या पत्राची त्यांना, अपिलार्थीस त्यांनी ज्यावेळी प्रथम 'निरंक' माहिती पुरविली,त्यावेळी त्यांना याची कोणतीही कल्पना नव्हती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दि. २१.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या कार्यालयाने सन २००० ते २००७ या कालावधीमध्ये कोणत्याही कामाचे तुकडे पाडण्याची परवानगी मागितली नव्हती अथवा या संबंधी कोणत्याही कामाचे तुकडे पाडण्याची परवानगी अधीक्षक अभियंता यांनी दिली नव्हती, अशी माहिती दिली आहे. मात्र अपिलार्थीने अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात त्यांच्या

कार्यालयाने किती कामांचे तुकडे पाडण्याची कार्यकारी अभियंता यांना परवानगी दिली, याची माहिती मागितली असता, त्यांना अधीक्षक अभियंता यांच्याकडून अशा कामांची यादी प्राप्त झाली आहे, त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती दिल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. हे पाहता, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस 'निरंक' अशी माहिती पुरविण्याकरिता जन माहिती अधिकारी व प्रामुख्याने त्यांना सहाय्य करणारे त्यांच्या कार्यालयातील सर्व सहाय्यक हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस चुकीची माहिती देऊन या सर्वांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायकांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र.१०१२/०८ फेटाळण्यात येत आहे व अपील क्र.१०१३/०८ मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्र. १०१२/०८ फेटाळण्यात येत आहे.

२) अपील क्र.१०१३/०८ मान्य करण्यात येत आहे.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे (अपील क्र. १०१३/०८ शी संबंधित) मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी यांच्या (अपील क्र. १०१३/०८) प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळकर),घ.नं.१३३-बी,शिवकृपा निवास, शोभानगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०१४
निर्णय दिनांक २४-०७-२००९

१ श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळकर), : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग,नांदेड.

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.११.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लोहा सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडून सन २००२-०३ ते २००४-०५ या कालावधीतील केल्या गेलेल्या लोहा येथील स्मशानभूमीजवळ असलेल्या पूलाच्या कामासंबंधी

काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - निविदा सूचीची प्रत, निविदा ज्या वर्तमानपत्रात दिली होती त्याची प्रत, विक्री झालेल्या निविदांच्या संख्या, निविदा घेणाऱ्यांच्या नावांची यादी, निविदा भरलेल्या ठेकेदारांची यादी व भरलेल्या सर्व निविदांची कागदपत्रे, - अशी माहिती साक्षांकित प्रतीमध्ये मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ८/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २४.१२.२००७ रोजी केल्यानंतर दि. २६.१२.२००७ रोजी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे कारणावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०२.२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित माहिती आठ दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. या कालावधीमध्ये देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीनंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व निविदांच्या प्रती मागितल्या होत्या. तथापि यासंबंधी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १३.०३.२००८ रोजी निविदा जतन करुन ठेवण्याची मर्यादा ओलांडली असल्याने, ही माहिती 'निरंक' असल्याचे त्यांनी कळविले आहे. त्यांनी मागणी केलेल्या निविदा सन २००५ या कालावधीतील असल्यामुळे इतक्या

अल्पावधीत या कामांच्या निविदा नष्ट कशा केल्या गेल्या याची त्यांना शंका असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १३.०३.२००८ रोजी उर्वरित माहिती पुरविली आहे व ही माहिती पुरविल्याबद्दल अपिलार्थीची पोचसही त्यांना प्राप्त झाली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील "सर्व निविदांची कागदपत्रे" ही माहिती,अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे जरी केवळ वादाच्या प्रयोजनार्थ ग्राहय धरले तरी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे "सर्व निविदांची कागदपत्रे" ही माहिती मागितली ओह. अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या कामांची निविदा निश्चित करतांना त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सर्व निविदेच्या प्रती त्यांना अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील. मूळात अपिलार्थीने निविदेच्या प्रती मागितल्या असतानादेखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २०.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस फक्त रु.८/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस कमी शुल्क कळविण्याची कृती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्तीशी पूर्णपणे विसंगत आहे. आता अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी व आयोगाकडील आजच्या सुनावणीच्या वेळी निःसंशयपणे सिध्द झ ााले असल्याने त्यांनी प्रथम अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन जन माहिती अधिकारी व या प्रकरणी

अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक (ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे,अशी तरतुद आहे.) यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना जन माहिती व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तसेच अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती पुरविली असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून प्रथमतः माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क त्यांना याच कालावधीत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिश पुरवावी

३) जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून, माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.८/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करावे.

४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियुनुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २४-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळकर),रा.नांदेड

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०१५
निर्णय दिनांक २४-०७-२००९

१ श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळकर), : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.
जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग,नांदेड.

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे लोहा सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडून सन २००२-०३ ते २००४-०५ या कालावधीतील केल्या गेलेल्या लोहा येथील स्मशानभूमीजवळ असलेल्या पूलाच्या कामासंबंधी

काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पूलाचे काम कुठल्या योजनेअंतर्गत झालेले आहे. त्या योजनेचे नाव, प्रशासकीय मंजूरीची प्रत,कार्यारंभ आदेशाची प्रत, कामाचे प्रथम देयक, अंतिम देयक, मोजमापपुस्तिकेच्या प्रती, पी.सी.आर. व काम करणाऱ्या एजन्सीचे नाव- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ७०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. २४.१२.२००७ रोजी केल्यानंतर दि. २६.१२.२००७ रोजी त्यांनी जन माहिती कार्यालयातून आवश्यक ती माहिती हस्तगत करुन घेतली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०२.२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना मोजमापपुस्तिका क्र. ३०७७ च्या आवश्यक पृष्ठांची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना मोजमाप पुस्तिकेच्या प्रतींची माहिती आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, उपअभियंता, लोहा यांनी त्यांच्या दि. ०३.०१२.२००७ रोजीच्या मोजमाप पुस्तिकेच्या कम्प्लीशन सर्टीफिकेशन झाल्या संबंधी दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये उपअभियंता यांनी मोजमाप पुस्तिका क्र. ३०७७ ही त्यांच्या ताब्यात असल्याचे कबूल केले होते. तथापि आता त्यांनी एकाच प्रमाणपत्रावर चुकीने सही केली असे संबंधित उपअभियंता यांचे म्हणणे असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती पुरविली. आता अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील आदेशामध्ये म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली मोजमाज पुस्तिका क्र.३०७७ च्या प्रती एवढीच माहिती मिळणे बाकी आहे. तथापि ही मोजमापपुस्तिका गहाळ झाल्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन स्पष्ट होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मोजमाज पुस्तिका हा एक अत्यंत महत्त्वाचा लेखाविषयक अभिलेखांचा भाग असतो, त्यामुळे या प्रकरणी ज्या संबंधित उपविभागीय अभियंता यांच्या ताब्यात ही मोजमाप पुस्तिका उपलब्ध नसेल तर त्यांनी या मोजमापपुस्तिकेच्या त्यांच्या विभागामध्ये हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सर्वत्र शोध घ्यावा व एवढे करुनही सदर मोजमाप पुस्तिका प्राप्त न झाल्यास,तदनंतर ही पुस्तिका गहाळ झाल्याबाबत पोलीस यंत्रणेकडे तक्रार नोंदवावी व या तक्रारीची प्रत त्यांनी अपिलार्थीस तक्रार नोंदविल्यानंतर सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तीस दिवसांच्या आत जर ही मोजमाप पुस्तिका जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाली तर या मोजमापपुस्तिकेतील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती त्यांना सदर मोजमाप पुस्तिका प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस कमी शुल्क कळविण्याची कृती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्तीशी पूर्णपणे विसंगत आहे. आता अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे वर्तन बेजबाबदार असल्याचे भाष्य जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये केले आहे व आयोगासही या

प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात काहीही कळविले नाही, असे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक (ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे,अशी तरतुद आहे.) यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना जन माहिती व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तसेच अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण माहिती पुरविली असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून प्रथमतः माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.७०/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जर या कालावधीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेली मोजमाप पुस्तिका क्र.३०७७ च्या संदर्भात कार्यवाही करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी

३) जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून, माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.७०/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत परत करावे.

४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियुनुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळकर),रा.नांदेड

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०१६/०८, १०१७/०८ , १०१८/०८ , १०१९/०८ व १०२०/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०१६,१०१७,१०१८,१९१९ व १९२०
निर्णय दिनांक २४-०७-२००९

१ श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळाकर), : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ १. अपील क्र.१०१६/०८ व १०२०/०८
जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड
२. अपील क्र.१०१७/०८,१०१८/०८ व १०१९/०८
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, कंधार,जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,कंधार जि. नांदेड
जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, कंधार,
जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेली एकूण पाच स्वतंत्र द्वितीय अपिले, क्र. १०१६/०८, १०१७/०८,१०१८/०८, १०१९/०८ व १०२०/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाला उद्देशून लिहिलेल्या त्यांचे दि. २४.०७.२००९ रोजीचे प्रकरणनिहाय पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून यासंबंधी त्यांची कोणतीही

तक्रार नाही. त्यामुळे आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे विचाराधीन अपील क्र.१०१६/०८, १०१७/०८, १०१८/०८,१०१९/०८ व १०२०/०८ ते स्वखुषीने मागे घेत आहेत व ही अपिले रद्द करावीत, अशी त्यांनी या पत्रांमध्ये विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेली विचाराधीन पाचही अपिले रद्द करण्याची आयोगास केलेली विनंती आयोगातर्फे मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र.१०१६/०८,१०१७/०८,१०१८/०८,१०१९/०८ व १०२०/०८,दि. १३.०६.२००८ खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दत्ता तुळशीराम शेंबाळे (फुलवळकर),घ.नं.१३३-बी,शिवकृपा निवास, शोभानगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,कंधार जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.१०२१/०८ व १०२२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०२१ व १०२२
निर्णय दिनांक २४-०७-२००९

१ श्री. जी. एस.रायबोळे : अपिलार्थी
किनवट,जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,
किनवट,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त,
आदिवासी विकास विभाग,अमरावती

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेली क्र. १०२१/०८ व १०२२/०८ या क्रमांकाची दोन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः अपील क्र.१०२१/०८ च्या संदर्भात दि. ०७.०३.२००८ रोजी व अपील क्र. १०२२/०८ च्या संदर्भात दि. १०.०३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळया स्वरुपाची व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित अनुक्रमे सन २००७ ते २००८ व २००० ते २००८ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या दोनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.०४.२००८ रोजी दोन प्रथम अपिले सादर केली. तथापि या अपील अर्जांवरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या दोनही प्रकरणाची एकत्रित सुनावणी आज दिनांक २४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येते व अपिलार्थीने या दोनही प्रकरणाशी संबंधित, त्यांचा प्रथम अपील अर्ज अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांच्या कार्यालयाकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याचे व हे दोनही अपील अर्ज अप्पर आयुक्तांच्या कार्यालयास दि. २८.०४.२००८ रोजी प्राप्त झाल्याची रजिस्टर्ड पोस्टाची पावती अपिलार्थीने आयोगाकडे सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीचे माहितीसाठीचे दोनही मूळ अर्ज व त्यावरील दोनही प्रथम अपिले संबंधित प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २१.०४.२००८ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब अप्पर आयुक्त,आदिवासी विकास विभाग अथवा या प्रकरणाशी संबंधित नेमल्या गेलेल्या जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि.२१.०४.२००८ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच

झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. १०२१/०८ व १०२२/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

२) अप्पर आयुक्त,आदिवासी विकास विभाग अथवा या प्रकरणाशी संबंधित नेमल्या गेलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२१.०४.२००८ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला आदेश पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जी. एस.रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक 'धुमाकूळ', किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त,आदिवासी विकास विभाग,अमरावती यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१३

निर्णय दिनांक  २७-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. भाऊसाहेब पावलस तिजोरे,<br>मु. पो. कासार पिंपळगांव, तालुका पाथर्डी,<br>जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, शेवगांव,<br>तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, शेवगांव,<br>तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर | : प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खरी माहिती न देता खोटी, चुकीची माहिती दिली. त्यांना अनावश्यक

माहिती पुरविण्यात आलेली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांची फसवणूक केली आहे, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आर्थिक वर्ष २००३ ते २००४ या कालावधीतील, मौजे प्रभु वाडगांव, चापडगांव, चेंडे चांदगांव व हसनापूर या गावात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत व डी. पी. डी. सी. योजनेतून झालेल्या मातीकामाचे वेतन मजुरांना अदा केल्याचे व मुल्यांकन केल्याच्या झेरॉक्स प्रतीची मागणी रजिस्टर पोस्टाव्दारे केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०१-२००९ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी श्री. आर. व्ही. ढाकणे, श्री. आर. एम. वाणी व श्री. बी. के. लबडे (सर्वजण मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी कार्यालयाचे कर्मचारी आहेत) यांना अपिलार्थीस स्वखर्चाने दिनांक २९-०१-२००९ पर्यंत माहिती पाठविण्याचे सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्व हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मजुरांना वेतन अदा केल्याची माहिती मागितली असतांना देखील त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने फक्त कॅशबुकच्या झेरॉक्स प्रती पाठविल्या. त्यामुळे त्यांना ही माहिती दिशाभूल करणारी व चुकीची वाटते. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक १५-१२-२००८ व दिनांक २६-०३-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पोस्टाने पाठविली आहे. यावर अपिलार्थी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना ही माहिती मिळाली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जरी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस दिनांक १५-१२-२००८ व दिनांक २६-०३-२००९ रोजी माहिती पाठविल्याचे म्हटले असले तरी या संदर्भातील सबळ पुरावा जसे - त्यांनी अपिलार्थीस माहिती पाठविल्याचे पत्र - आयोगास दाखविता आले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा वरील परिच्छेदात त्यांनी केलेला युक्तिवाद आयोग ग्राह्य धरत नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना पाठविलेली कथित माहिती आयोगास दाखविली असून या माहितीमध्ये मजुरांच्या वेतपत्राच्या झेरॉक्स प्रती पाठविल्याचे दिसून येत नाही. यावरुन सकृतदर्शनी ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः हस्तांतरीत केली. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुल्यांकनासंदर्भातील फक्त दोन पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली असून उर्वरित माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे त्यांनी आयोगासमोर मान्य केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस उर्वरित माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य

उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येते की, आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे किंवा कसे याची तपासणी करुन यासंदर्भात काही विसंगती आढळल्यास यासंदर्भात ते अधिनियमातील कलम १८ च्या तरतुदीनुसार आयोगाकडे तक्रार करु शकतील.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावरील दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता, त्यामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिल्याचा निष्कर्ष काढला आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय व आज आयोगाच्या दृष्टोत्पतीस पडलेली वस्तुस्थिती पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपूर्ण व चुकीची माहिती दिली असल्याचे स्पष्ट होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब आयुक्त (कृषि), पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषि), पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भाऊसाहेब पावलस तिजोरे, मु. पो. कासार पिंपळगांव, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, शेवगांव, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१४

निर्णय दिनांक २७-०७-२००९

१ श्री. कोरडे मधुकर रामभाऊ, : अपिलार्थी
मु. पो. कोरडेवस्ती, मिरजगांव, तालुका कर्जत,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत,
तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), कर्जत,
जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कसल्याही प्रकारची काही एक माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे सदर अपील सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी तहसील कार्यालय, कर्जत येथे दिनांक २७-११-२००८ रोजी केलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास दिनांक २०-०३-२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद दिनांक १५-०७-२००९ रोजी देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती चौकशीसंदर्भात असल्याने देता येत नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्व हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००९ रोजीचे पत्र प्राप्त झाले

आहे. तथापि त्यांनी जी मूळ तक्रार केली होती त्यावर अद्यापही कार्यवाही केली गेलेली नाही. ती कार्यवाही लवकरात लवकर होणे त्यांना अपेक्षित आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या अर्जावर त्यांच्या कार्यालयातर्फे कोणतीही कार्यवाही केली गेलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे दिनांक ३०-०१-२००९ रोजीचे प्रथम अपील त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने आणि या संदर्भात त्यांनी त्यांच्या कार्यालयाची नोंदवही तपासली त्यांना अपिलार्थीच्या अपील अर्जाची नोंद आढळून आली नाही. तसेच त्यांनी आयोगास असे अवगत केले की, ते या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी नसून तहसीलदार, कर्जत हे या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी आहेत व अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये ज्या तक्रार अर्जाचा उल्लेख केला आहे. त्या तक्रारीच्या संदर्भात ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले होते व या तक्रारीत त्यांनी संबंधित यंत्रणेच्या विरुध्द केलेल्या तक्रारीची चौकशी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे मागील आठवड्यात सुरु करण्यात आली असून ही चौकशी सध्या प्रगतीपथावर आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत देणे हे जन माहिती अधिकारी यांना सहज शक्य होते. जर त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या केलेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज करतेवेळी केली नव्हती तर त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही व अपिलार्थीस सात महिने इतक्या विलंबाने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ही कुठल्याही अभिलेख्याशी संबंधित नसल्याने व चौकशी संदर्भात असल्याने ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. वास्तविक पाहता, जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात त्यावेळी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या कार्यालयातर्फे या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, अशी माहिती देण्यास हरकत नव्हती, परंतु त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, चौकशीच्या संदर्भात असल्याने ती त्यांना देता येत नाही, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीच्या दिनांक २९-१२-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०१-२००९ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे भाग होते, तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदीतपेक्षा विलंबाने प्रतिसाद देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे महसूल विभागाने त्यांच्या २७/११/२००८ च्या अर्जासंदर्भात कोणती कार्यवाही केली हे जाणून घ्यावयाचे होते. अपिलार्थीस ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील युक्तिवादामध्ये प्राप्त होऊ शकेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कोरडे मधुकर रामभाऊ, मु. पो. कोरडेवस्ती, मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१५

निर्णय दिनांक २७-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. झडे ज्ञानेश्वर भाऊ,<br>मु. बोरी, पो. वाघापूर, तालुका अकोले,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर,<br>तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प<br>कार्यालय, राजूर, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २०-११-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले असता त्यावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित असलेले अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००७-०८ या वर्षी आदिवासी विकास विभागातर्फे दुधाळ म्हशी, संकरीत गाई, शेळी गट वाटप यादीतील लाभार्थ्यांचे अर्ज व त्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची तपासणी करणे व लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या करारनाम्यांची तपासणी करुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या सत्यप्रती देण्याबाबत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले असता त्या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांच्या निवेदनाशी सुसंगत असा युक्तिवाद आयोगासमोर केला व आयोगास असे अवगत केले की, त्यांना मूळ अर्जान्वये संदर्भित केलेल्या अभिलेख्याची तपासणी करुन त्यातून आवश्यक माहिती घेण्याची इच्छा आहे.

अपिलार्थी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी व त्यांना यासंदर्भात वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (ञ ) या कलमाच्या व पोटकलम (एक) च्या तरतुदीशी सुसंगत आहे. तसेच अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे ते सार्वजनिक प्राधिकरण असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेले अभिलेखे त्यांना तपासणीसाठी विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील अभिलेखे तपासणीसाठी सशुल्क उपलब्ध करुन देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांच्याकडे ज्या अभिलेख्यांच्या तपासणीकरिता अर्ज केला आहे ते सर्व अभिलेखे त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत. हे अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन देतांना व तसेच या अभिलेख्यांमधील आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कोणतेही मूल्य आकारता येणार नाही.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न करता

आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेले सर्व अभिलेखे त्यांना तपासणीसाठी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत व तसेच यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेराक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

३. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. झडे ज्ञानेश्वर भाऊ, मु. बोरी, पो. वाघापूर, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर, तालुका अकोले, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१६

दिनांक २७-०७-२००९

१ श्री. विलास सखाराम साठे, : अपिलार्थी

म्हसोबा गेट, विद्या कॉलनी, नगर-कल्याण रोड,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ,

व्दारा, डॉ. चव्हाण हॉस्पिटल, एम. आय. डी. सी.

नागापूर, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ,

व्दारा, डॉ. चव्हाण हॉस्पिटल, एम. आय. डी. सी.

नागापूर, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्रीमती नंदा मारुती भावके

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी हे सुनावणीकरिता हजर आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस शासनातर्फे वेतनेतर अनुदान प्राप्त होत असते. मात्र यासंदर्भात पुरावा त्यांच्याकडे

आज रोजी उपलब्ध नाही. सुनावणीची पुढील तारीख निश्‍चित केल्यास त्या तारखेस ते हा पुरावा आयोगास सादर करु शकतील.

अपिलार्थीने दर्शविलेल्या वस्तुस्थितीच्या संदर्भात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद व अपिलार्थीकडे उपलब्ध असलेला पुरावा तपासणी करण्याच्या दृष्टीने आज रोजी विचाराधीन अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत असून सुनावणीची निश्‍चित तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल.

पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्याकडील अभिलेखे, शासनातर्फे दिल्या गेलेल्या वेतनेतर अनुदानाच्या संदर्भातील पुरावा आयोगास सादर करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विलास सखाराम साठे, म्हसोबा गेट, विद्या कॉलनी, नगर-कल्याण रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ, व्दारा, डॉ. चव्हाण हॉस्पिटल, एम. आय. डी. सी., नागापूर, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ, व्दारा, डॉ. चव्हाण हॉस्पिटल, एम. आय. डी. सी., नागापूर, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१७

निर्णय दिनांक २७-०७-२००९

१ श्री. भागीनाथ गोरक्षनाथ शिरसाठ, : अपिलार्थी
मु. वरखेड पो. हसनापूर, तालुका शेवगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
सहायक ग्रंथालय संचालक, नाशिक विभाग,
नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
सहायक ग्रंथालय संचालक, नाशिक विभाग,
नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००८-०९ मध्ये दाखल केलेल्या ग्रंथालयाच्या प्रस्तावासंदर्भात मे २००८ ते ०६-१२-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीमध्ये - प्रस्ताव दाखल केलेल्या ग्रंथालयाची नांवे, संपूर्ण पत्ता, ग्रंथालय तपासणी केल्याची तारीख, तपासणी करणा-या अधिका-याचे नांव, संपूर्ण पत्ता, ग्रंथालयास तपासणी अधिका-याने दिलेले गुणप्रत, तपासणीच्या वेळी उपलब्ध असलेल्या पुस्तकांची यादी, उपलब्ध दैनिके, नियतकालिके, वर्गणीदार सभासद, ग्रंथालयामध्ये उपलब्ध सुविधा, ग्रंथालय संस्थेने मान्यता व अनुदानासाठी सादर केलेल्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे निदर्शनास येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन देणे भाग आहे. अपिलार्थीकडे त्यांनी जन माहिती व अपिलीय

अधिकारी  यांच्याकडे अनुक्रमे प्रथम अर्ज व प्रथम अपील दाखल केल्याच्यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा उपलब्ध नाही हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडे केलेल्या दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.  जर अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसेल तर त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे याच कालावधीमध्ये कळवावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-१२-२००८ रोजीच्या प्रथम अर्जासंदर्भात त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर                                    ( वि. बा. बोरगे )

दिनांक    २७-०७-२००९                         राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भागीनाथ गोरक्षनाथ शिरसाठ, मु. वरखेड पो. हसनापूर, तालुका शेवगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, सहायक ग्रंथालय संचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, सहायक ग्रंथालय संचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१८

निर्णय दिनांक २७-०७-२००९

१ श्री. संजीव भास्कर पाटोळे, : अपिलार्थी

अ-२४८ जवळ, प्रेमदान हडको, सावेडी रोड,

अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा प्रशासन अधिकारी,

अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ,

अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ,

अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी दिलेला निर्णय हा एकतर्फी दिलेला असून माहिती अधिका-यास वाचविण्याच्या दृष्टीने व अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांनी हा निर्णय दिलेला आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या विचाराधीन अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेश रद्द करण्याची व

त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुन जन माहिती अधिकारी यांच्यावर कायद्यानुसार उचित कारवाई आदेशित करावी असे आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००० ते ३१-१२-२००८ या कालावधीशी संबंधित इंग्रजी माध्यमांच्या प्राथमिक शाळांसदर्भात काही माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे (सदर दिनांक चुकीचा वाटतो) प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. अपिलार्थीचे सदर अपील फेटाळतांना त्यांनी अपिलार्थीची गैरहजेरी व तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीचे संकलन, संशोधन, पृथकरण करणे अशा प्रकारच्या प्रक्रिया ज्या माहितीमध्ये आहेत ती माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये देय नसल्या कारणास्तव अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील इंग्रजी माध्यमाच्या शाळांची यादी

प्राप्त झाली आहे. या संदर्भात मुद्दा क्रमांक ९ वगळता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सर्वसाधारणपणे सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे देय आहे. अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००९ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे (चुकीचा दिनांक) प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील काही माहिती पुरविली. उर्वरित माहितीच्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस ही माहिती संबंधित संस्थेकडून घेण्यासाठी सूचित केले. वास्तविक पाहता महानगरपालिका हद्दीमध्ये इंग्रजी माध्यम शिकविणा-या शाळांना महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडून मान्यता देण्यात येत असते. त्यामुळे त्यांच्याकडे संबंधित शाळेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावासोबत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती असणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जर संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीच्या प्रती सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत संबंधित शाळांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पाठविणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस संबंधित शाळेकडे संपर्क साधण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अधिनियमातील कलम ६ (३ ) (एक) चा भंग करणारी आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध

करुन देणे भाग आहे. सबब या प्रकरणी अपिलार्थीस संबधित जन माहिती अधिकारी यांच्या चुकीच्या कृतीमुळे आवश्यक त्या माहितीपासून वंचित राहावे लागले असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने कारवाई करावी असे अपेक्षिले आहे. यासंदर्भात या प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोगास मान्य करता येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजीव भास्कर पाटोळे, अ-२४८ जवळ, प्रेमदान हडको, सावेडी रोड,

अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १९/२००८ व २०/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९ व २०

निर्णय दिनांक २७-०७-२००९

१ श्री. शेख मोहम्मद अय्युब मोहम्मद याकूब, : अपिलार्थी
घर नं. १७९०, करशेटजी रोड, रामचंद्र खुंट,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नगर रचनाकार,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.),
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष अपील क्र. १९/२००८ : १ श्री. हनिफ उमर बागवान (मयत)

अपील क्र. २०/२००८ : १ श्री. महंमद याकूब उमर बागवान,
२ श्री. एस. के. इथापे,
३ श्री. एच. के. भोसले,
४ श्री. रिजवान शेख,
५ श्री. बी. एल. काळे,
६ ए. एस. जाधव

# निर्णय

**अपील क्रमांक १९/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नाही व त्यांना आवश्यक ती माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी जाणुनबुजून टाळाटाळ करीत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर शहरातील सर्व्हे नंबर ३२१/२, सिटीझन कॉम्प्लेक्स, मुकूंदनगर रोड येथील हनीफ उमर बागवान यांच्या बांधकामविरुध्द दिनांक ०६-०९-२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीचा अर्ज, पुढील कार्यवाहीसाठी कोणत्या कर्मचा-याकडे पाठविण्यात आला, संबंधित कर्मचा-याने चौकशी करुन दिलेल्या अहवालाच्या प्रमाणित नकला, सदरचे बांधकाम बेकायदेशीर असल्यास त्यावर मनपाने संबंधितांना बेकायदेशीर बांधकाम पाडून टाकण्याबद्दल दिलेल्या नोटीसची प्रत, नोटीसला संबंधिताने दिलेल्या उत्तराची प्रत व अपिलार्थीने मूळ अर्ज करतेवेळी जेवढे बांधकाम अस्तित्वात आहे त्या बांधकामास मनपाने परवानगी दिली असल्यास बांधकाम मंजूरी परवान्याची नक्कल, अर्जदाराने दिनांक ०६-०९-२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाची प्रमाणित नक्कल - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भात

स्थळपहाणी करुन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २२-०१-२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय माहिती अधिका-यास दिनांक २८-०१-२००९ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ३०-०१-२००९ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि ही माहिती स्वीकारण्यास, जन माहिती अधिकारी यांचा शिपाई अपिलार्थीच्या घरी ज्यावेळेस गेला त्यावेळी अपिलार्थी हे घरी उपस्थित नव्हते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०१-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे ही माहिती अपिलार्थीस पाठविली. तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याच्या कारणाने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष (मयत) यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ३०-०१-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने माहिती पाठविल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या घरी त्यांनी त्यांच्या कार्यालयातील शिपाई पाठविला असता अपिलार्थीच्या घरातल्या व्यक्तींनी ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले व यासंदर्भात त्यांच्या कार्यालयातील संबंधित शिपायाचा जबाब त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे.

त्रयस्थ पक्षाचे प्रतिनिधी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्यांच्या नावावर अनेक स्वरुपाचे गुन्हे पोलीस स्टेशन अहमदनगर येथे नोंदविले गेले आहेत. अपिलार्थी हे त्यांच्या वडिलास (त्रयस्थ पक्ष) जीवे मारण्याच्या धमक्या देत व वारंवार पैशाची मागणी करत होते. त्यामुळे यांचे वडील दिनांक १९-०६-२००९ रोजी मृत्यू पावले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्ष श्री. हनिफ उमर बागवान यांच्या बांधकामासंदर्भात काही माहिती मागितली होती. सदर त्रयस्थ पक्ष आज रोजी हयात नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली होती. त्यामुळे या प्रकरणी माहितीसाठीचा अर्ज दिल्यानंतर या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे हे संबंधित अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते स्वत: जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक असलेली माहिती मागण्यासाठी किती वेळा गेले व कधी गेले याचा कोणताही पुरावा त्यांना आज आयोगास दाखविता आला नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २८-११-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या तक्रार अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीस अवगत केल्याचे दिसून येत आहे. मात्र या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा, कोणत्याही प्रकारे उल्लेख नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस दिनांक २८-११-२००८ रोजी त्यांच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात माहिती दिली असल्याचे म्हटले आहे तरी या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कोणत्याही प्रकारे समावेश नसल्याने जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २८-११-२००८ रोजीचे पत्र अवैध ठरविण्यात येत आहे. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता यामध्ये अपिलार्थीस मुद्दा क्रमांक सहाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

कोणतीही माहिती दिली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या म्हणण्यानुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही तर जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थी हे त्यांनी दिलेली माहिती स्वीकारत नाहीत. आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या कथिम माहितीचे अवलोकन करता त्यामध्ये अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक सहाशी संबधित माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत व्यक्तिशः व दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात जन माहिती अधिकारी यांच्यावर कडक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्यांचे उत्तरदायित्व पूर्णपणे पार पाडल नाही. तसेच त्रयस्थ पक्षातर्फे केलेल्या त्यांच्या युक्तिवादाच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम वीसच्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याचे कोणतेही आदेश देता येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत व्यक्तिशः व दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत विनामूल्य पुरवावी.

**<u>अपील क्रमांक २०/२००८</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी संगनमताने माहिती दिली नाही व अद्यापपर्यंत त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द कायद्यानुसार कडक कार्यवाही करण्यात यावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - श्री. एस. के. इथापे, श्री. के. एच. भोसले, श्री. रिजवान शेख श्री. बी. सी. काळे व श्री. ए. एस. जाधव या कर्मचा-यांची पूर्ण नांवे तसेच सदर कर्मचारी दिनांक २१-०१-२००८ रोजी कोणत्या पदावर काम करीत होते आणि महानगरपालिकेच्या रेकॉर्डनुसार संबंधितांचे राहण्याचे ठिकाण - ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस संबंधित त्रयस्थ पक्षांनी माहिती उघड करण्यास नकार दिल्याच्या कारणांवरुन, माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने

समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर महानगरपालिकेने आस्थापना विभागाची माहिती घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०४-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने माहिती पाठविली. तथापि त्याच दिवशी अपिलार्थी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि पाच त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादामध्ये कायम ठेऊन व त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः त्रयस्थ पक्षाच्या म्हणण्यानुसार माहिती देण्यासाठी नाकारले होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ०४-०४-२००९ रोजी अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य, अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली. मात्र अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही.

त्रयस्थ पक्षांनी असा युक्तिवाद केला की, ते महानगरपालिकेतील अतिक्रमण विभागातील कर्मचारी असून अपिलार्थीचे अनधिकृत बांधकाम पाडल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्या विरुध्द पोलीस चौकीमध्ये घरफोडीचा गुन्हा राजकीय दबावाखाली नोंदविला आहे. तसेच अपिलार्थी हे त्यांना

वारंवार माहिती मागतात, त्यांना वेळोवेळी जीवे मारण्याची धमकी देत असतात. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देऊ नये अशी प्रथमतः भूमिका घेतली होती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२-०१-२००९ रोजी आदेशान्वये सूचित केले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ०४-०४-२००९ रोजी आवश्यक ती माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली आहे. अपिलार्थीस पाठविण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येते. ही माहिती अपिलार्थीस मिळाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. ही माहिती एक पृष्ठाची असून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी ही माहिती आता हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, हे आदेश निर्गमित झाल्यापासून त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः दोन साक्षीदारांसमोर हस्तगत करुन घ्यावी.

त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद लक्षात घेता अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी लावलेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरता येणार नाही. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द कार्यवाही आदेशित करण्याची त्यांची विनंती आयोगास मान्य करता येत नाही.तसेच अपिलार्थीने त्यांच्याविषयी मागितलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने व ती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) व ९ च्या तरतुदीस कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचेल असे आयोगास वाटत नसल्याने

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत व्यक्तिशः व दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख मोहम्मद अय्युब मोहम्मद याकूब, घर नं. १७९०, करशेटजी रोड, रामचंद्र खुंट, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.), अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२१

निर्णय दिनांक २७-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर,<br>रा. भराडगल्ली, नेहरु मार्केट मागे,<br>अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), महानगरपालिका,<br>अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), अहमदनगर<br>महानगरपालिका, अहमदनगर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नगर रचनाकार, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही. मात्र त्यांनी प्रथम अपील केले असता त्या अपील अर्जासंदर्भात उप आयुक्त यांनी माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांना कोणतीही माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही जन

अपिलीय अधिकारी यांनी केली नाही. म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दिनांक २०-०९-२००८ रोजी मूळ अर्जन्वये उप आयुक्त सामान्य प्रशासन यांच्याकडे त्यांनी अपिलार्थीचे अपील क्रमांक १४३/२००७ व १४४/२००७ मध्ये अपिलार्थीस मुदतीत माहिती मिळाल्याचा निष्कर्ष ज्या कागदपत्रांची पाहणी करुन काढला आहे त्या कागदपत्रांच्या प्रती किंवा अपिलार्थीस माहिती दिल्याबद्दल त्यांनी रजिस्टरवर सह्या केल्या असतील तर त्याची झेरॉक्स प्रत यांचा समावेश होता.

अपिलार्थीने सदर अर्ज उप आयुक्त, सामान्य प्रशासन, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने या अपील निर्णयासंदर्भात त्यांच्याकडे माहिती मागितली आहे तो विषय नगर रचना विभागाशी संबंधित असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक २०-०९-२००८ रोजीचा अर्ज नगर रचना विभागाकडे पाठविला. या विभागाकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त यांच्याकडे दिनांक १७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी यांनी दिनांक ११-१२-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर अपील निकाली काढतांना अपिलार्थीने अपेक्षिलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे, असे कारण दर्शवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून त्यामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांचे अपील क्रमांक १४३/२००७ व १४४/२००७ चे आदेश रद्द करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पूर्वीच पुरविली आहे. तथापि यासंदर्भातील व अपिलार्थीच्या दिनांक २०-०९-२००८ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा कोणताही पुरावा त्यांना आयोगास सादर करता आला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-१२-२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज नगर रचना विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या अपील क्रमांक १४३/२००७ व १४४/२००७ चा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी ज्या सुनावणीच्या वेळी घेतला होता त्या सुनावणीच्या वेळी नगर रचना विभागाने सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या असत्या तर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असती. तथापि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने माहितीसाठीचे त्यांच्याकडे अनेक अर्ज केले असून प्रत्येक वेळी ते अपिलार्थीस माहिती पुरवित असतात. तथापि आयोगास असे आढळून आले आहे की, नेमकी याच प्रकरणातील अपिलार्थीच्या दिनांक २०-०९-२००८ रोजीच्या केलेल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही प्रतिसाद दिला नाही. तसेच अपिलार्थीने मूळात माहिती मागतांना ती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, हे

देखील येथे विसरुन चालणार नाही. त्यामुळे या प्रकरणी प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त न होण्याकरिता दोषी ठरत आहेत असे आयोगाचे मत आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर, रा. भराडगल्ली, नेहरु मार्केट मागे, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, अहमदनगर महानगरपालिका,

अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२

निर्णय दिनांक २७-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. उमाप नंदकुमार भाऊराव,<br>मु. गोगलगांव पो. गळनिंब, तालुका नेवासा,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा,<br>तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा,<br>तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील संबंधित म्हणजे सन एप्रिल २००२ ते मार्च २००८ या

कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नायब तहसीलदार कार्यालयाने कामगार तलाठी कार्यालयास या कालावधीत पाठविलेल्या जी. आर. च्या प्रती, कामगार तलाठी यांची कामे काय असतात, बीपीएल धारकांना लाभ घेता येण्यायोग्य योजना व सेलू कार्यालय नेवासा हे कार्यालय चालविणा-या ठेकेदाराचे नाव पत्ता व त्यांच्याशी केलेल्या करारपत्राची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अपिलार्थीस एका मुद्दयावरील माहिती दिनांक १२-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविली. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे सांगितले. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती न देता माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे आयोगास अवगत केले.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाने माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये चार इतक्या रकमेचा भरणा करण्यासाठी सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदरचे शुल्क न भरल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. परंतु व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा उपस्थित राहिले, यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांच्याकडे आजमितीस उपलब्ध नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये चार भरण्यासाठीचे पत्र अपिलार्थीस कधी दिले होते हे देखील त्यांना आज आयोगासमोर सांगता येत नाही किंवा या संदर्भातील कोणताही पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे कबूल केले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणताही सकारात्मक प्रतिसाद न दिल्याने संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. एस. एन. गोसावी) यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. गोसावी एस. एन., सध्या नायब तहसीलदार, संजय गांधी योजना, तहसील कार्यालय, नेवासा) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उमाप नंदकुमार भाऊराव, मु. गोगलगांव पो. गळनिंब, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२३

निर्णय दिनांक २७-०७-२००९

१ श्री. शंकर कारभारी जाधव, : अपिलार्थी
मु. पो. जेऊर हैबती, तालुका नेवासा,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, नेवासा,
तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा,
तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुन ८० दिवसाहूनही जास्त कालावधी झाल्यानंतरही त्यांना त्यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौजे जेऊर हैबती येथील सर्व्हे नंबर ३१४ च्या ७/१२ उता-यावर सेक्रेटरी, यमाई माता सार्वजनिक ट्रस्ट या नावाने नोंद करण्यात आली आहे, यासंदर्भातील एकूण सहा पत्राच्या प्रती, ही माहिती मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या पत्राचे संदर्भ क्रमांक व दिनांक याचा उल्लेख केलेला असून अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी आपल्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी ते या पदावर नुकतेच रुजू झाले असल्याचे सांगितले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवतील असे आयोगास आश्वासीत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. तथापि व्यक्तीशः माहितीची

मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्षतः किती वेळा गेले याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. तसेच ही माहिती संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी चालू असल्यामुळे दिली गेली असल्याचे आयोगास अवगत केले. तसेच ही माहिती उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः जाऊन नंतर ती अपिलार्थीस पुरविण्याचे त्यांनी आयोगास आश्वासीत केले असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय न देऊन संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२ जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर
दिनांक २७-०७-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शंकर कारभारी जाधव, मु. पो. जेऊर हैबती, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२४

निर्णय दिनांक २७-०७-२००९

१ श्री. पतंगे सुनिल भानुदास, : अपिलार्थी
मु. पो. वडाळा बहिरोबा, तालुका नेवासा,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, नेवासा,
तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा,
तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, वडाळा बहिरोबा, तालुका नेवासा वार्ड नंबर ५७ मधील अपिलार्थीच्या नावावर एक गॅस टाकी असून रेशन कार्डावर त्यांना किती रॉकेल मिळते या माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता अथवा अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न करता अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०७-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना या प्रकरणी आवश्यक त्या माहितीपासून वंचित ठेवणा-या अधिका-यांवर अधिनियमातील तरततदुीप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नव्याने रुजू झाले असून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आता तयार आहे व ते ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची व संबधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची अक्षम्य उपेक्षा केली आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीने

आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्याने, त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी त्यांच्याकडे ते म्हणतात त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याकरिता पाठविलेल्या पत्राची प्रत आयोगास दाखविण्यासाठी उपलब्ध नाही. तसेच अशा प्रकारचे कोणतेही पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यावरुन मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क तरी निश्चितणे कळविले होते किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. आज रोजी आयोगास उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे, त्यामुळे अपिलार्थीस माहिती पुरवण्यासंदर्भात आयोग कोणतेही आदेश देत नाही. मात्र उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेली अक्षम्य उपेक्षा आयोग नजरेआडही करत नाही. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती इतकी सोपी होती की, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अक्षरशः पाच मिनिटाच्या आत पुरविता येणे सहज शक्य होते. परंतु महसूल खात्याच्या नेहमीच्या सवयीने त्यांनी शक्यतो अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस सचिव (महसूल) यांना करण्यात येत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दाखविलेल्या त्यांच्या बेजबाबदार वर्तणुकीची यथायोग्य नोंद घेण्यासंदर्भात सचिव (महसूल) यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस त्यांनी आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रुपये चार इतके भरण्याचे सूचित केले होते, हा युक्तिवाद आवश्यक त्या पुराव्याअभावी आयोग फेटाळून लावत आहे आणि अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-०७-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पतंगे सुनिल भानुदास, मु. पो. वडाळा बहिरोबा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४१
निर्णय दिनांक २८-०७-२००९

१. श्री. शिवदास दामोधर शहाणे, ता.अंबड, जि.जालना : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, लघुपाटबंधारे,जि.प.अंबड उपविभाग जि.जालना : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग, जिल्हा परिषद,जालना.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (जि.प.)उपविभाग,अंबड,जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांनी वेळोवेळी जन माहिती अधिकारी यांची भेट घेऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१५.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६-०७ या कालावधीतील संपूर्ण ग्रामीण योजनेअंतर्गत कामांची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"संपूर्ण ग्रामीण योजना अंतर्गत व जेवढया विहिरी वाटप झाल्या. त्यांची चेकची झेरॉक्स व एम.बी. एस्टीमेट सन २००६ ते २००७ संपूर्ण माहिती आणि सानपसाहेब व कांबळे यांच्या अधिकारात झालेल्या कामांची संपूर्ण माहिती "- अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२६.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीकडे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या कार्यालयात दोन दिवसांच्या आत सादर करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास अनुसरुन अपिलार्थीने दि. २६.१२.२००८ रोजी असे कळविले की, त्यांनी त्यांच्या अर्जासोबत दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असलेल्या रेशनची पत्रिका दिली असल्याने ते दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र असे समजावे. तथापि एवढे करुन माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याचदिवशी अपिलार्थीस खालील मजकुराचे पत्र दिले.

"आज दि.१३.०२.२००८ रोजी अपील सुनावणीमध्ये असे ठरविण्यात आले आहे की, आपण मागितलेली माहिती दि.२०.०२.२००८ रोजी उपअभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद,उपविभाग,अंबड जि.जालना यांनी द्यावी, जर आपणास माहिती न मिळाल्यास त्यांना या कार्यालयाकडून द्वितीय अपील करण्यास परवानगी देण्यात येईल."

तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित होती, हे आयोगास संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. विशेषतः 'विहिरीचे चेकद्वारे वाटप' ही संज्ञा अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये कोणत्या अर्थाने वापरली आहे व त्यांची माहितीविषयी निश्चित अपेक्षा काय आहे, हे समजत नसल्यामुळे व आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीची अनुपस्थिती पहाता, त्यांना माहिती मिळविण्यामध्ये फारसे स्वारस्य नसल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवदास दामोधर शहाणे,नूतन वसाहत, ठाकूरनगर,अंबड जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे,जि.प.अंबड उपविभाग जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (सिंचन) विभाग,जिल्हा परिषद,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४२
निर्णय दिनांक २८-०७-२००९

१. श्री. बचुटे गोकुळ भिवा, ता.केज, जि.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,केज, जि.बीड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,केज,जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांना उद्देशून लिहिलेले दि. १३.०७.२००९ रोजीचे पत्र आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास सादर करण्यात आले असून या पत्राची एक प्रत अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाला सादर केली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. २०.०२.२००८ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीची त्यांना आता आवश्यकता नाही, त्यामुळे त्यांनी यासंदर्भात राज्य माहिती आयोगाकडे केलेले दि. २८.०५.२००८ रोजीचे द्वितीय अपील ते मागे घेत आहेत व यासंबंधी त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आता मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे

आज रोजीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र.९४२/०८, दि.२८.०५.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बचुटे गोकुळ भिवा,मु.गोटेगाव, पो.युसूफ-वडगाव,ता.केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,केज,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,केज,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४३
निर्णय दिनांक २८-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संदीपान प्रभू ठोंबरे,<br>ता.केज, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी सजा उंदरी,<br>ता.केज,जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,केज,जि.बीड. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न पुरविल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०१.०४.२००८ रोजी अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नसल्याकारणाने व अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची व त्यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा उंदरी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दि.०१.०१.२००६ ते

दि.१८.०२.२००८ या कालावधीतील जमीन हस्तांतरण, खरेदीखत,गहाणखत इ.संबंधी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) जमिनीचे हस्तांतरण खरेदीखत,गहाणखत,दानपत्र,बक्षिसपत्र इत्यादी नोंदणीकृत कागदपत्रांद्वारे करण्याची तरतुद आहे. ही दस्तऐवजे दस्त नोंदणी कार्यालय/रजिस्टरी कार्यालयात नोंदविली जातात. रजिस्टरी कार्यालय प्रत्येक महिन्याला नोंदविलेल्या दस्ताची माहिती अ-पत्रकाद्वारे संबंधित तहसिलदारास कळवितात. शासन नियमाप्रमाणे तहसीलदाराने आपल्या अखत्यारीतील सर्व तलाठयांकडून अ-पत्रकाप्रमाणे फेरफार मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. याबद्दल खालील माहिती द्यावी.

अ) वरील कालावधीमध्ये तहसीलदारांनी आपणास अ-पत्रकाप्रमाणे नोंदी घेण्याबाबत प्रत्येक महिन्यात कोणत्या तारखेला कळविले होते, त्या पत्राची प्रत द्यावी.

ब) तहसीलदारांनी वरील कालावधीत आपणास अ-पत्रकाप्रमाणे ज्या नोंदी करण्याविषयी कळविले होते. त्या प्रतिमहिना नोंदी किती होत्या, याबद्दलची आकडेवारी द्यावी.

क) या नोंदीपैकी अ-पत्रकावरुन आपण किती नोंदी केल्या, याबद्दलची माहिती देवून अ-पत्रकावरुन फेरफार मंजूर केल्याबद्दलच्या नोंदी फेरफार उताऱ्यात घेतल्या आहेत किंवा नाही, याबद्दलची माहिती द्यावी.

ड) या कायद्याच्या कलम ४(१) प्रमाणे व सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक केंद्रीय माहितीचा अधिकार २००५/परिपत्र क्र.१९०/०५/५,मंत्रालय,मुंबई-३२, दि.१८/०६/२००५ अन्वये १७ कामे सर्व प्राधिकरणांनी, आपल्या कार्यालयाने करणे बंधनकारक करण्यात आले होते. या सह केंद्रशासनाच्या दि.२६ मे २००५ च्या आदेशही आपणाकडे शासनाने दिलेला आहे. या १७ कामाची (आपण मुदतीत केलेल्या) कामाची परीपुर्ण माहिती मुद्यांसह फीससहीत कळवावी."

अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार तहसीलदार तथा जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलावरही तहसीलदार,केज यांनी निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी श्री.मच्छिंद्र कोंडिबा जोगदंड जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा उंदरी,ता.केज जि.बीड. यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर तीन महिन्यापासून कार्यरत असून अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली, त्यावेळी श्री. एस.एम.जाधव (सध्या अंबाजोगाई येथे कार्यरत) या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीस विहित वेळेत माहिती का पुरविली नाही, याचे कारण ते आता सांगू शकत नाहीत. अपिलार्थीने ज्या स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे त्या माहितीविषयी उपस्थित जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांच्याकडे तहसीलदाराकडून अ-प्रपत्र पाठविले जात नसल्याचे आयोगास अवगत केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की,तत्कालीन तलाठी सजा उंदरी,ता.केज जि.बीड यांनी अपिलार्थीच्या दि.१८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे कोणताही प्रतिसाद दिलेला नाही, त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस नि:संशयपणे पात्र ठरत आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये, जमिनीचे हस्तांतरण, खरेदीखत, गहाणखत इत्यादींच्या नोंदी तलाठयाकडे घेण्याच्या पध्दतीबाबत काही माहिती मागविली आहे. मूळात ही पध्दत महसूल विभागामध्ये प्रचलीत आहे किंवा कसे, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. ही पध्दत जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी त्यांच्याकडे अस्तित्त्वात नव्हती तर, त्यांनी अपिलार्थीस तसे कळवावयास हवे होते.

अपिलार्थीच्या दि. ०१.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर तहसीलदार, केज यांनी जर वेळीच सुनावणी घेतली असती व यासंदर्भात आपले आदेश पारित केले असते तर कदाचित, अपिलार्थीस यापुर्वीच त्यांना आवश्यक असलेल्या माहितीबाबतची वस्तुस्थिती अवगत झाली असती, परंतु या प्रकरणी संबंधित तलाठी व तहसीलदार यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे माहितीसाठीच्या मूळ अर्ज व अपील अर्जाकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे आयोगास प्रतीत होत आहे.

सबब उपरोक्त प्रकरणी तत्कालीन तलाठी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांना शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंबंधी तहसीलदार,केज यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी, त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

प्रसंगावशात या प्रकरणी उपस्थित जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा उंदरी ता.केज,जि.बीड यांनी आयोगाच्या असे लक्षात आणून दिले आहे की, त्यांना तहसीलदार,केज यांच्याकडून अ-प्रपत्राच्या प्रती प्राप्त होत नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे जर तहसीलदार यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व तलाठयांना प्रपत्र अ च्या प्रती देण्याचे तहसीलदारांवर शासन परिपत्रकान्वये बंधनकारक असेल तर जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगाच्या निदर्शनास आणून दिलेल्या वस्तुस्थितीची जिल्हाधिकारी, बीड यांनी गांभीर्यपूर्वक दखल घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित तहसीलदारांवर योग्य ती प्रशासकीय अथवा इतर कारवाई करण्याचा जरुर विचार करावा, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) तहसीलदार, केज यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

३) उपविभागीय अधिकारी,अंबाजोगाई जि.बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन तलाठी,सजा उंदरी,ता.केज,जि.बीड (श्री. एस.एम.जाधव सध्या कार्यरत अंबाजोगाई) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संदीपान प्रभू ठोंबरे, मु.पो.उंदरी, ता.केज, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा उंदरी, ता.केज,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, केज, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपविभागीय अधिकारी,अंबाजोगाई जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४४
निर्णय दिनांक  २८-०७-२००९

१ श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, : अपिलार्थी
ता.जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
बीड लघुपाटबंधारे विभाग बीड,मुख्यालय
अंबाजोगाई, जि.बीड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,परळी वैजनाथ
जि.बीड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्यावर दि. २९.०३.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पाच दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०४.२००८ रोजी अर्धवट माहिती दिली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी या प्रकरणात सकृतदर्शनी दोषी होत आहेत व ते अधिनियमातील कलम २०(१)च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावण्यास पात्र आहेत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर विलंबाबाबत शास्ती लावावी आणि त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एप्रिल १९६५ ते जून १९७७ मधील जून १९७७ ते डिसेंबर १९७७ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"सर्व्हीस बुक व वैयक्तिक फाईल".

अपिलार्थीने ही माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीस असे अवगत केले की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मूळ सेवापुस्तिका ही अधीक्षक अभियंता औरंगाबाद पाटबंधारे मंडळ यांच्या कार्यालयात पाठविली असून ही सेवापुस्तिका औरंगाबाद कार्यालयाकडून प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता त्यांच्याकडील दि.२९.०३.२००७ (सदर तारीख चुकीची पडली असून ती २९.०३.२००८ अशी असावी, असे गृहीत धरण्यात येत आहे.) च्या पत्राद्वारे अपिलार्थीस पाच दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०२.०४.२००८ रोजी त्यांच्या वैयक्तिक संचिकेची झेरॉक्स प्रत विनामूल्य पुरविली. तथापि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील "सर्व्हीस बुक" बाबतची माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांच्याकडील दि. २४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांना पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या शुल्कासाठी रु.२००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला नसल्याने त्यांनी प्रथमतः दि. ०२.०४.२००८ रोजी त्यांच्या वैयक्तिक संचिकेची प्रत त्यांना विनामूल्य दिली व तदनंतर विशेष प्रयत्न करुन अपिलार्थीस त्यांच्या सर्व्हीसबुकच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दि.२३.०६.२००८ रोजी, सदर सर्व्हीस बुक, त्यांना औरंगाबाद कार्यालयाकडून दि. २१.०६.२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर विनामूल्य उपलब्ध करुन दिल्या आहेत. अपिलार्थीपासून हेतुपूरस्सर माहिती दडविण्याचा त्यांचा कोणताही उद्देश नव्हता. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेल्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारण स्वरुपाची असून अपिलार्थीस कोणत्या कर्मचाऱ्याच्या अथवा अधिकाऱ्याच्या सेवापुस्तिकेची अथवा वैयक्तिक संचिकेची प्रत आवश्यक आहे, याचा उल्लेख त्यांनी आपल्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही, त्यामुळे मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अत्यंत मोघम स्वरुपाची होत आहे. त्यांच्या मूळ अर्जावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे स्वतःचे सर्व्हीस बुक व वैयक्तिक फाईलच्या प्रती आवश्यक असल्याचे अनुमान काढले व अपिलार्थीस ही माहिती प्रथमतः दि. ०२.०४.२००८ व तदनंतर दि. २३.०६.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती मोघम

स्वरुपाची असतानाही व तसेच या माहितीपैकी, सेवापुस्तिकेची प्रत, जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात नसल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला. अशा वेळी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत पाच दिवसांच्या आत अधीक्षक अभियंता औरंगाबाद मंडळ यांच्याकडे पाठवावयास हवी होती, परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती एकत्रितपणे देण्याचा खटाटोप जन माहिती अधिकारी यांनी या घटनेमध्ये केला. अपिलार्थीस उर्वरित माहिती अपिलार्थीने आयोगाकडे दि.०२.०५.२००८ रोजी द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर दि. २३.०६.२००८ रोजी प्राप्त झाली, म्हणजे अपिलार्थीस उर्वरित माहिती त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली आहे, असे दिसून येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंबंधी असे स्पष्ट करण्यात येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची होती व त्यापैकी काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नव्हती, एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी दुसऱ्या कार्यालयाशी संपर्क साधून अपिलार्थीस अंतिमतः दि. २३.०६.२००८ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये आयोगास जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीपासून हेतूतः माहिती दडविण्याचा किंवा माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा कुठलाही उद्देश असल्याचे आढळून आले नाही. याउलट, अपिलार्थीने मोघम स्वरुपाची माहिती मागूनही विशेष प्रयत्न करुन अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविली आहे, अशी वस्तुस्थिती आयोगास उघड झाली आहे. ही वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीस आता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने व यासंदर्भातील पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केला असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगावशात या प्रकरणी असे विशेषत्वाने नमूद करण्यात येत आहे की, आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास योग्य प्रकारे आवश्यक ती कागदपत्रे सादर करुन देऊन जन माहिती अधिकारी यांनी कशाप्रकारे आयोगास सुनावणीच्या वेळी कागदपत्रे सादर करावीत, याचा आदर्श घालून दिला आहे, याची नोंद जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील,लक्ष्मण व्हिला,पांगरी रोड,शाहूनगर,बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बीड लघुपाटबंधारे विभाग बीड, मुख्यालय अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४५
निर्णय दिनांक २८-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेषराव एकनाथराव कदम,<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण सहसंचालक,<br>उच्च शिक्षण,नांदेड विभाग,नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहसंचालक, उच्च शिक्षण,नांदेड विभाग, नांदेड | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी,
कार्यालय विभागीय शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण,नांदेड विभाग,नांदेड

जन अपिलीय अधिकारी : विभागीय शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण,नांदेड विभाग,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.०३.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर यांना विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,नांदेड यांच्या कार्यालयाने दिलेल्या दि.१७.०३.२००८ रोजीच्या पत्राची प्रत व चौकशी अधिकारी श्री. एम.एच.कोमटवार यांनी या प्रकरणी केलेल्या चौकशी अहवालाची

प्रत - अशी दोन मुद्यांवर माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ही शासकीय रकमेच्या अपहारासंबंधीची गोपनीय माहिती असल्याचे कारण दर्शवून अधिनियमातील कलम ८(१)(ज) च्या तरतुदीप्रमाणे नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १५.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०५.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे फेटाळून लावला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्यांच्या संबंधी माहिती मागितली आहे. यापैकी मुद्दा क्र.१ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडील त्यांनी, विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर यांना दिलेल्या दि. १७.०३.२००८ रोजीच्या पत्राची प्रत मागितली आहे. सदर पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल, कारण ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जामधील हे पत्र म्हणजे भविष्य निर्वाह निधीच्या रकमेचा अपहार केल्याप्रकरणी बडतर्फीचा आदेश असावा, असे अनुमान काढण्यात येत आहे. बडतर्फीचे आदेश हे गोपनीय असत नाहीत, कारण या आदेशाची प्रत वेगवेगळया इतर प्राधिकरणांना देखील अग्रेषित अथवा सादर केलेली असते, त्यामुळे ही माहिती

इतर वेगवेगळया कार्यालयाकडे उपलब्ध असू शकते. केवळ जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती 'गोपनीय' या शीर्षाखाली असल्यामुळे ती अपिलार्थीस देण्याचे नाकारण्याची त्यांची कृती चुकीची आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संबंधी जर श्री. कोमटवार यांच्या चौकशी अहवालावर वरील कार्यवाही होऊन, यासंदर्भातील चौकशी जर आता पूर्ण होऊन निर्णय झाला असेल तर चौकशी अहवालाची प्रत त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. मात्र जर ही चौकशी अद्यापही प्रगतीत असेल तर आणि जन माहिती अधिकारी यांना जर ही माहिती उघड केल्याने प्रकरणातील पुढील कार्यवाहीस अडथळा येईल, असे त्यांना वाटत असेल तर त्यांना ही माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक असणार नाही.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात वरीलप्रमाणे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी आणि त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२ च्या संबंधी वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही याच कालावधीमध्ये करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी आणि मुद्दा क्र.२ च्या संदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही याच कालावधीत करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेषराव एकनाथराव कदम,वरिष्ठ लिपीक, शिक्षण विभाग (माध्यमिक),जिल्हा परिषद,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,कार्यालय विभागीय शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण,नांदेड विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण,नांदेड विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४६
निर्णय दिनांक २८-०७-२००९

१ श्री. अशोक विठ्ठलराव सूर्यवंशी, : अपिलार्थी
ता. मुखेड, जि.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,आगार मुखेड,
जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,आगार मुखेड,
जि.नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : आगार प्रमुख,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,आगार मुखेड,जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी : विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दि.०१.०१.२००१ ते डिसेंबर २००७ या आठ

वर्षाच्या कालावधीशी संबंधित व प्रचंड व्याप्ती असलेली माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. तसेच या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४१,४००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व त्यांच्या प्रथम अर्जासोबत जोडलेल्या दारिद्रयरेषेच्या प्रमाणपत्रासंदर्भात काही आक्षेप घेतले. यानंतर त्यांनी परत दि.१३.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे या प्रमाणपत्रावर पुनःश्च काही आक्षेप घेतले. यानंतर त्यांनी परत दि. १३.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस शुल्काचा भरणा करण्याचे सूचित केले. या सर्व प्रकारामुळे समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न देता सर्व संबंधित परस्परांत पत्रव्यवहार करत राहिले व अंतिमतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. ०७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे काही माहिती दिली. तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटलवरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २१.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास या टप्प्यावर आवश्यक वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,नांदेड अथवा या प्रकरणासाठी नेमल्या गेलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी

अपिलार्थीच्या दि. २१.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला अंतिम निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २१.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक विठ्ठलराव सूर्यवंशी,मु. होंडाळा, पो.दापका(राजा),ता. मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,आगार मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४७
निर्णय दिनांक २८-०७-२००९

१ श्री. खादरी महंदम इरफान पिता महंमद सोहेल, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अध्यक्ष,
अशोक शिक्षण प्रसारक मंडळ,
अमीन मंजील, शिवाजीनगर,नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक धर्मादाय आयुक्त,
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी माहिती मिळविण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा अशोक, शिक्षण प्रसारक मंडळ यांच्याकडे दि. ०३.०१.२००८ रोजीचा अर्ज पाठवून दिला असता माहिती अधिकारी यांनी सदर रजिस्ट्री परत केल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथापि सहायक धर्मादाय आयुक्त,नांदेड यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. तथापि यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये अध्यक्ष, अशोक शिक्षण प्रसारक मंडळ, शिवाजीनगर, नांदेड यांच्याकडे त्यांच्या संस्थेविषयी सन १९८५ ते ३१ डिसेंबर, २००७ या २२ वर्षांच्या कालावधीसंबंधी काही माहिती मागविली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस न पुरविली गेल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.१७.०१.२००८ रोजी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील नोंदविले. या अपील अर्जावर धर्मादाय आयुक्त यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास त्यांच्याकडील दि.१८.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे असे कळविले आहे की, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याबाबत सचिव, अशोक शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड यांना दि.२३.०१.२००८ रोजी सूचना दिल्या आहेत. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविली असून सदर पत्र अपिलार्थीचा अपूरा पत्ता म्हणून त्यांना परत प्राप्त झालेले आहे.

या |ह्मĔन्णाशी संबंधित प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे केल्याचे सकृतदर्शनी आढळून येत आहे. अपिलार्थीस जर अशोक शिक्षण प्रसारक मंडळ यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित माहिती हवी होती, तर त्यांनी ही मागणी सहायक धर्मादाय यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक यांच्याकडे केली असती तर

त्यांची  मागणी सुसंगत राहिली असती, तथापि अपिलार्थीने ज्या शिक्षण प्रसारक मंडळाकडे माहितीसाठीची मागणी केली आहे ते शिक्षण प्रसारक मंडळ हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ज) च्या तरतुदीनुसार  सार्वजनिक प्राधिकरण आहे किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांअभावी कळण्यास मार्ग नाही आणि जर अपिलार्थीस एखाद्या संस्थेच्या, जी संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंद झाली आहे, त्यासंदर्भात माहिती हवी आहे, तर त्यांना सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागणे इष्ट राहील, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात माहिती अध्यक्ष, अशोक शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड यांच्याकडे मागितली व त्यावरील प्रथम अपील सहायक धर्मादाय आयुक्त, जे अशा प्रकरणात जन अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत नेमले गेलेले नाहीत, त्यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीच्या 'माहितीसाठीचा मूळ अर्ज करणे' ते आयोगाकडे 'द्वितीय अपील करणे' या संपूर्ण प्रक्रियेतील अशाप्रकारच्या विसंगत कृतीमुळे व अपिलार्थीस ज्या संस्थेच्या संदर्भात माहिती आवश्यक आहे, ती संस्था अधिनियमातील कलम २(ज) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण आहे किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांअभावी कळण्यास मार्ग नसल्याने तसेच या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत यासंदर्भात कोणताही पुरावाही जोडला नसल्याने आणि आज रोजी सुनावणीस अपिलार्थी हे उपस्थित नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१)  अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक :  २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. खादरी महंदम इरफान पिता महंमद सोहेल,रा.घर नंबर ५-९-३६९,उमर कॉलनी,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,अशोक शिक्षण प्रसारक मंडळ,अमीन मंजील, शिवाजीनगर,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४८
निर्णय दिनांक २८-०७-२००९

१ श्री. स.नुरअली स.बाखर अली, अर्धापूर, जि.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,मुदखेड, जि.नांदेड : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड,जि.नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊनही निर्णय न कळविल्याने व त्यांना माहिती प्राप्त झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील केरोसीन टँकर - योजनेसंदर्भात फेब्रुवारी, २००६ व मार्च, २००६ यांना या महिन्यामध्ये मुदखेड तालुक्यात प्राप्त झालेल्या केरोसिन टँकरचे जोडपत्र-१ (डाटाशीट) - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०४.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील त्यांनी तहसीलदार यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. माधव माणिकराव डांगे, कनिष्ठ लिपिक तहसील कार्यालय, मुदखेड यांनी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांना त्यांच्या कार्यालयातील पत्र क्र.२००८/पुरवठा/मा.अ./कावि/३७,दि.२२.०७.२००९ च्या पत्राद्वारे पाठविली असून अपिलार्थीस एकूण ३५ पृष्ठांची माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविली आहे. अपिलार्थीस त्यांनी माहिती पाठविल्यासंदर्भात आयोगाकडे त्यांच्या कार्यालयाच्या जावक रजिस्टरची प्रत सादर केली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. तथापि, येथे असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे माहिती पाठविली. तसेच त्यांनी त्यांच्या कार्यालयातील ज्या जावक नोंदवहीतील पृष्ठाची प्रत सादर केली आहे, त्यामध्ये अपिलार्थीस पाठविलेल्या पत्राचा क्रमांक व आयोगास त्यांनी सादर केलेल्या पत्राचा क्रमांक यामध्ये कोणतेही साम्य नाही, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती पुरविली नसल्याचे अनुमान काढण्यात येऊन

जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगाच्या निदर्शनास आणलेली वस्तुस्थिती पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाची व त्यावरील प्रथम अपील अर्जाची अनुक्रमे जन माहिती व अपीलीय अधिकारी यांनी उपेक्षा केली आहे. या प्रकरणाच्या संदर्भातील जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे वरील युक्तिवादाचे विश्लेषण करता, संबंधितांनी जणू माहितीचा अधिकार अधिनियम त्यांच्या विभागास लागू नाही, असे समजून अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची उपेक्षा केली आहे, असे दिसून येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे सुसंगत होती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत प्रतिसाद देणे भाग होते. तथापि त्यांनी अशी कृती केली नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २०(१) मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास नि:संशयपणे पात्र होत आहेत. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार श्री. जोशी व श्री. डुकरे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावरही कडी करुन अपिलार्थीच्या दि. ०४.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन

अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केला आहे. सबब संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार श्री.पी.डी.जोशी यांनी स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदार वर्तनाची यथायोग्य नोंद जिल्हाधिकारी, नांदेड यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

३) संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. डुकरे व श्री. जोशी) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. स.नुरअली स.बाखर अली,रा.कुबा कॉलनी,अर्धापूर, ता.अर्धापूर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. श्री.जोशी मार्फत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. श्री.डुकरे मार्फत जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जिल्हाधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९४९
निर्णय दिनांकः २८-०७-२००९

१ श्री. रमेश दौलतराव माने, : अपिलार्थी
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
भूजल सर्वेक्षण यंत्रणा आणि विकास,
जिल्हा परिषद,नांदेड.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
पाणीपुरवठा विभाग,जिल्हा परिषद, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री.शेख.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००८रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२८.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, भूजल सर्वेक्षण यंत्रणा आणि विकास, जिल्हा परिषद,नांदेड यांच्याकडे त्याच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६-०८ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या नावाची

त्यांच्या पदांसह व ते त्या पदावर ज्या दिनांकापासून कार्यरत आहेत त्याबाबत दिनांक व वर्षासह यादी, त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. शेख हे कोणत्या पदावर,केव्हापासून कार्यरत आहेत, त्यांना वेळोवेळी उपअभियंता या पदाचा कार्यभार कसा काय दिला होता, त्याची माहिती, एका कर्मचाऱ्यास प्रतिनियुक्तीवर किती काळ कार्यरत ठेवता येते, तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामध्ये ग्रामीण भागात पंपींग मशिनरी दुरुस्तीवर किती रुपये खर्च करण्यात आले आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाअंतर्गत कोणकोणती कामे केली जातात. - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.१८.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत

आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, श्री. शेख यांच्या संदर्भातील माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ती सार्वजनिक स्वरुपाची आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. २८.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती देय होत आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्याबद्दलचा कोणताही पुरावा आयोगाकडे त्यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना वरील निर्णयामध्ये निर्देशित केलेली माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी मूळात अपिलार्थीचा दि. २८.११.२००७ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला किंवा कसे हे त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्यावरुन जाणून घ्यावे व जर अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसेल तर त्यांनी अपिलार्थीस तसे कळवावे व जर अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला असेल तर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला असेल तर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व जर अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसेल तर त्यांनी अपिलार्थीस तसे कळवावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेश दौलतराव माने,सोमेश कॉलनी,कलामंदिरामागे, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, भूजल सर्वेक्षण यंत्रणा आणि विकास,जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा विभाग,जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५०
निर्णय दिनांकः २८-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. श्रीराम रावसाहेब वागदकर,<br>ता.भोकर, जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,भोकर,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद,नांदेड. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व अयोग्य माहिती दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाकडे दुर्लक्ष केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्याच्या कार्यक्षेत्रातील - वागद,भोसी,तारकलवाडी,आमदरी,नारवट,सालवाडी (घेरली) समंदरवाडी, गारगोटवाडी या गावामध्ये नवीन विहिरी व घरकुल योजनेचा लाभ किती लोकांना मिळाला, त्या लाभार्थ्यांची संपूर्ण पत्त्यासह यादी - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि.२२.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाची कोणतीही दखल न घेतल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन करता या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व अयोग्य माहिती पुरविल्याचे आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जाकडे जन अपिलीय अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे म्हटले असल्याचे आढळून येते. अपिलार्थीने आयोगास पुरविलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती प्राप्त झाली, त्याचा तपशील त्यांनी या कागदपत्रांमध्ये जोडलेला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेण्याची कारणे देखील जन माहिती व अपीलीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे व अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन आयोगास कळून येत नाहीत. सबब या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी सुनावणी घेऊन या संदर्भात आपला निर्णय पारीत करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी अथवा प्रत्यक्षात नेमणूक झालेले जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस

दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२२.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीराम रावसाहेब वागदकर,रा.व्यंकटेशनगर, भोकर, ता.भोकर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५१
निर्णय दिनांकः २८-०७-२००९

१ श्री. कृष्णा दिगंबरराव पांडे, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक कोषागार अधिकारी,
कोषागार कार्यालय,नांदेड,जि.नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा कोषागार अधिकारी,नांदेड.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारीः अपर कोषागार अधिकारी,
कोषागार कार्यालय,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व अद्यापपावेतो माहिती अप्राप्त असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - दि. ०१.०१.२००७ ते २०.०१.२००८ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सामाजिक वनीकरण विभाग,नांदेड व उपवनसंरक्षक, वनविभाग,नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेल्या देयकावर कोषागार अधिकाऱ्याने घेतलेल्या

आक्षेपांच्या छायाप्रती व संबंधित विभागाने या आक्षेपाच्या संदर्भात केलेल्या पूर्ततेच्या छायाप्रती - अशी माहिती स्पीड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे प्रतिपृष्ठ रु.२/- प्रमाणे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या नंतर अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क रु.१६/- इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १२.०३.२००८ रोजी चलनाद्वारे भरणा केल्यानंतर अपिलार्थीस त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. तथापि प्राप्त माहिती ही दिशाभूल करणारी व अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०४.२००८ व ०७.०५.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या दोनही दिवशी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.०७.०७.२००८ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीचे अपील निकाली काढले असल्याचे अपिलार्थीस कळविले.परंतु मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि.२८.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांनी दोन वेळा सुनावणी ठेवली होती तथापि अपिलार्थी हे या सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिले. त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणी व्यक्तिशः निरोप पाठवूनही ते त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील संपूर्ण माहिती त्यांच्याकडे ज्या स्थितीत उपलब्ध आहे त्या स्थितीत पुरविली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अजाचे अवलोकन करता, त्यामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले आहे, परंतु त्यांना या माहितीपैकी वन विभागाशी संबंधित माहिती कोणती व सामाजिक वनीकरण विभागाशी संबंधित माहिती कोणती असे माहितीचे पृथःकरण, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे दिसून येते.या संदर्भात,आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीचे पृथःकरण जर अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात, कार्यालयीन वेळेत व्यक्तिशः उपस्थित राहिले तर, त्यांना समजावून देता येईल. सार्वजनिक वनीकरण विभाग व वन विभाग हे दोन्ही विभाग जिल्हा कोषागार कार्यालयातर्फे एक विभाग मानले जातात. त्यामुळे त्यांच्याकडे या दोन्ही विभागांची देयके जशी प्राप्त होतात, त्याप्रमाणे ती देयके तपासून, आक्षेप असतील तर आक्षेपासह त्याची पूर्तता करण्यासाठी ती संबंधित विभागाकडे परत केली जातात. त्यांच्याकडे अपिलार्थीने अपेक्षित केल्याप्रमाणे वन विभागातील सार्वजनिक वन विभाग व वन विभाग अशी या दोन विभागाशी संबंधित माहिती वेगवेगळी ठेवण्याची पध्दत प्रचलीत नाही. जन माहिती अधिकारी यांचे हे स्पष्टीकरण पाहता, तसेच अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे दिसून येत आहे. मात्र ही माहिती त्यांनी अपिलार्थीस सशुल्क पुरविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर शुल्काचा भरणा करण्यासाठी आवश्यक त्या तपशीलासह त्यांच्या कार्यालयाकडील दि.१०.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. हा प्रतिसाद सर्वसाधारण परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून तीस दिवसात म्हणजे दि. २२.०२.२००८ रोजी अगर तत्पूर्वी देणे त्यांना भाग होते. परंतु या प्रकरणी हा प्रतिसाद त्यांनी

अधिनियमातील कलम ७(१) मधील विहीत तरतुदीनंतर दिला असल्याने त्यांना अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१६/- इतके अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी हे शुल्क अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

आज रोजी अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीवर युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील अंशतः मान्य करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१६/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसात परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २८-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कृष्णा दिगंबरराव पांडे,'सर्वेश', परिमलनगर, जलशुध्दीकरण केंद्राजवळ, पावडेवाडी पथ, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अपर कोषागार अधिकारी,जिल्हा कोषागार कार्यालय, नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कोषागार अधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५२
निर्णय दिनांक: २८-०७-२००९

१. श्री. कमलचंद शांतीलाल पहाडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
आयुक्त,
पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे-१
२. जन अपिलीय अधिकारी तथा
आयुक्त, पशुसंवर्धन,
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासन अधिकारी (आस्थापना), आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांचे कार्यालय

जन अपिलीय अधिकारी : सहआयुक्त, पशुसंवर्धन (मुख्यालय), आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांचे कार्यालय

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असताना सुध्दा त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याच्या नाराजीने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०५.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांची नेमणूक दि. १३.११.१९६२, पदोन्नती दि. २६.०१.१९६७ रोजी

झाल्यानंतर वरिष्ठ लिपीक या संवर्गात त्यांनी बारा वर्षे सेवा केल्यानंतर म्हणजेच दि.०१.१०.१९९४ पासून त्यांना वरिष्ठ सहायक या संवर्गात कालबध्द पदोन्नती का देण्यात आली नाही, याची कारणे व त्यांना वरिष्ठ सहायक या संवर्गामध्ये कालबध्द पदोन्नती देण्यात येईल का? जर देण्यात येईल तर केव्हापर्यंत आदेश निर्गमित होतील?- अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार, त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी मुद्दाम होऊन देण्याचे टाळल्याच्या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०५.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने त्यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दल अथवा कृतीबद्दल

कारणे विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलची कारणे देणे, स्पष्टीकरण करणे अथवा त्यासंदर्भात खुलासा देणे, अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, ती त्याच स्वरुपात अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात निर्णय घेणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये आहे. सबब, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर दि. ०७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी घेतलेल्या निर्णयासंदर्भात वस्तुस्थिती/पार्श्वभूमी व कारणे अपिलार्थीस कळविली आहेत, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कमलचंद शांतीलाल पहाडे,रा.घ.नं.२-१०-४६,फाजलपुरा,लेबर कॉलनी,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (आस्थापना),आयुक्त,पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य,पुणे-१यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त, पशुसंवर्धन (मुख्यालय), आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७४४
निर्णय दिनांकः २८-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. फारुक बाबू तगाले,<br>किनवट,ता.किनवट,जि.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी,<br>किनवट , जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक उपवनसंरक्षक अधिकारी,<br>किनवट,जि.नांदेड | | |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक (जंकास),
किनवट,जि.नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०५.२००८ रोजी फेरनोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणी उपलब्ध कागदपत्रांची छाननी करीत असताना आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांचे द्वितीय अपील प्रकरण दि. १८.०७.२००७ रोजी दाखल केले होते. तथापि या अर्जासोबत अपिलार्थीने त्यांचे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार केलेल्या प्रथम अपील अर्जाची प्रत जोडली नव्हती, त्यामुळे प्रथमतः अपिलार्थीकडून त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित 'प्रपत्र - ब' ची प्रत आयोगाकडील दि. ०९.०४.२००८ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आली. आयोगाच्या पत्रास अनुसरुन अपिलार्थीने दि. २३.०४.२००८ रोजी त्यांच्या मूळ अर्जाशी संबंधित 'प्रपत्र - ब' ची प्रत आयोगास सादर केली असून त्या प्रतीचे अवलोकन करता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम अपील त्यांच्या दि. १६.११.२००५ रोजीच्या प्रथम अपील अर्जान्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केले होते. माहिती अधिकार अधिनियमातील

कलम १९(३) च्या तरतदीनुसार अपिलार्थीने ज्या दिनांकास जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय द्यावयास हवा होता किंवा निर्णयानंतर नव्वद दिवसांच्या आत द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे करणे त्यांना अनुज्ञेय आहे. परंतु अपिलार्थीने जर याबाबत वाजवी कारण सादर केले व त्याबाबत आयोगाची खात्री पटली तर, नव्वद दिवसांचा कालावधी शिथील करण्याची तरतुद देखील या कलमामध्ये आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील प्रथमतः विहित मुदतीत सादर केले नाही, तसेच त्यांनी विहित मुदतीत अपील दाखल न करण्यासाठी वाजवी कारण देखील त्यांनी आयोगाकडे सादर केले नाही. अशा परिस्थितीत अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील हे कालबाहय ठरत आहे. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्यासाठी लागलेल्या विलंबाची कारणे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २८-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. फारुक बाबू तगाले,बाबा रमजान गल्ली,किनवट,ता.किनवट,जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास),किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८५

निर्णय दिनांक २९-०७-२००९

१ श्री. महंमद अब्दुल नदीम महंमद अब्दुल नईम, : अपिलार्थी
सय्यद कॉलनी, कुच्चरवटा,
जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने व त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय न दिल्याने त्यांनी

विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या विभागामार्फत मौ. नागेवाडी तालुका जालना येथील गट क्रमांक २३५ मध्ये बांधण्यात आलेल्या पाझर तलावासाठी घेतलेल्या संबंधित जमीन मालकांच्या संमतीपत्राची प्रत, या जागेच्या भूसंपादनासाठी काढलेल्या नोटीसांची प्रत, संबंधित जमीनीचा मावेजा कोणी व किती घेतला व संबंधित कामाचे वर्ष, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन २००२ ते २००४ या कालावधीशी संबंधित होती व ती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग यांना उद्देशून केले होते तथापि या अपील अर्जावर कार्यकारी अभियंता यांनी कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडे विनाकार्यवाही तसेच ठेऊन दिले. अशा प्रकारे अपिलार्थी आवश्यक त्या माहितीपासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगा-कडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जाशी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२००९ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे रजिस्टर पोस्टाने पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या माहितीच्या संदर्भात कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना हे माहिती अधिकारी आहेत व अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद हे अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेलेले आहेत. या संपूर्ण घटनाक्रमाचा तपशील पाहिला असता त्यामध्ये असे दिसून येते की, कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच अपिलार्थीचा दिनांक १२-०२-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज देखिल त्यांच्याकडे तसाच विनाकार्यवाही ठेऊन दिला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२००९ रोजी दिलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती म्हणजे त्यांचे दिनांक ०२-०७-२००९ रोजीचे एक पत्र असून त्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांच्या विभागामार्फत नागेवाडी शिवारातील गट नंबर २३५ मध्ये प्रस्तावित, पूर्ण झालेली कोणतीही योजना नाही. त्यामुळे गट नंबर २३५ मधील जमीन मालकाची संमती घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली ही माहिती पाहता हीच माहिती त्यांना अपिलार्थीचा दिनांक ०३-०१-२००८ रोजीचा प्रथम अर्ज प्राप्त झाल्यानंतर तीस दिवसाच्या आत देणे सहज शक्य झाले असते असे दिसून येते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर या कालावधीत अधिनियमातील कलम (७) प्रमाणे कोणतीही कार्यवाही केली नाही. एवढेच नव्हे तर अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांनी अधीक्षक अभियंता यांच्याकडे देखील पाठविण्याचे टाळले. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी केलेल्या त्यांच्या अशा प्रकारच्या नकारात्मक कृतीमधून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट होतो असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस नि:संशयपणे पात्र ठरत आहेत. सबब सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील, वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे, दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०२-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली असल्याचे नमूद केले आहे, ते, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील प्रकारच्या कृतीव्दारे, योग्य असल्याचे सिध्द केले आहे. त्यामुळे अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली हे म्हणणे मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (जलसंपदा) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महंमद अब्दुल नदीम महंमद अब्दुल नईम, सय्यद कॉलनी, कुच्चरवटा, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९१७

निर्णय दिनांक २९-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. कल्याण एस. सोनवणे,<br>रा. एन-११, के/४०/४, नवजीवन कॉलनी, हडको,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>शहर बांधकाम विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०७-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले असता सदर अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्वरित माहिती देण्याचे आदेश केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व खोटी माहिती देऊन अपिलार्थीची

दिशाभूल केली आहे व परत सुनावणी घेण्यासाठी पत्र पाठवून अपिलार्थीची दिशाभूल केली व शहर अभियंता यांच्याकडे माहितीसाठीच्या शुल्काचा भरणा केला असता त्यांनी खोटी माहिती तयार करुन ठेवली. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी २५० रुपये इतकी दंडात्मक कारवाई करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००४ ते दिनांक २६-०२-२००८ या कालावधीतील महानगरपालिकेच्या क्षेत्रातील वॉर्ड नंबर ३ मधील झालेल्या कामासंदर्भात काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या-कडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २१० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये महिला व बालकल्याण विभागाशी संबंधित काही माहिती असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत महिला व बालकल्याण विभागाकडे दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली. यानंतर अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क रुपये २१० इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यानंतर दिनांक २१-०३-२००८ रोजी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देऊ केली असता ही माहिती अपूर्ण असल्याचे कारण दर्शवून त्यांनी माहिती स्वीकारण्याचे नाकारले. यानंतर दिनांक २४-०३-२००८ रोजी कार्यालयाच्या शिपायाव्दारे अपिलार्थीकडे माहिती पाठविली असता देखील अपिलार्थीने माहिती घेण्याचे नाकारले व अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी

यांनी दिनांक २२-०४-२००८ व ०३-०५-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि अपिलार्थी या दोनही सुनावणीस गैरहजर राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०५-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या निवेदनाप्रमाणे युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांना माहिती देऊ केली असता ते माहिती स्वीकारत नाहीत व माहिती घेण्याचे, ती अपूर्ण व खोटी असल्याच्या कारणास्तव, टाळतात. ही माहिती अपूर्ण व खोटी असल्याचे ते, ही माहिती न वाचता सांगून माहिती घेण्याचे टाळतात. यावर अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ते आज रोजी आयोगाकडे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांना प्रथमच पाहत आहेत, त्यांनी माहिती घेण्याचे कधीही टाळलेले नाही.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या अर्जाबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे व ते ती अपिलार्थीस देण्यासाठी तयार आहेत. आयोगासमोर झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०३ ऑगस्ट २००९ रोजी दुपारी ०३-०० वाजता घेऊन जाण्याचे मान्य केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ०३-०८-२००९ रोजी दुपारी ०३-०० वाजता दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने एकदा माहिती स्वीकृत केल्यानंतर या

माहितीबाबत त्यांचे काही आक्षेप असतील तर त्यांनी या आक्षेपाची पुर्तता जन माहिती अधिकारी व त्यांचे वरिष्ठ यांच्याकडून करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, दिनांक ०३-०८-२००९ रोजी दुपारी ०३-०० वाजता दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थित उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कल्याण एस. सोनवणे, रा. एन-११, के/४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त शहर अभियंता, महानागरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५३

निर्णय दिनांक २९-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. हजारी युवराजसिंह पदमसिंह,<br>(जेल पोलीस), औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अधीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वरिष्ठ तुरुंगाधिकारी, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित प्रवासभत्त्याविषयी आणि इतर अशी एकूण

आठ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रामुख्याने जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची कारणे व खुलासे अपेक्षित करणारी अशी आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०९-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि या माहितीमध्ये पेट्रोलभत्ता व प्रवासभत्या-संदर्भातील कोणत्याही माहितीचा समावेश नव्हता. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाच्या स्थळप्रतीच्या मागे त्यांनी पेट्रोल व प्रवासभत्त्या व्यतिरिक्त प्राप्त माहितीने समाधान झाल्याचे कबूल केले आहे. परंतु एवढे असूनही अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अप्राप्त असल्याचे कारण दर्शवून दिनांक १७-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०२-२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले व अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीस अनुज्ञेय असलेल्या पेट्रोलभत्त्याची रक्कम अपिलार्थीस दोन दिवसाच्या आत अदा करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक ०८-०९-२००७ रोजी बहुतांश माहिती दिली आहे व त्यांच्या किरकोळ प्रवासभत्त्याची बिले देखील त्यांना अदा करण्यात आली आहेत. तथापि ही बिले त्यांना केव्हा अदा केली त्याची नस्ती त्यांना आता सापडत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या

दिनांक ०३-०९-२००७ रोजी मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी, त्यांचा अर्ज गहाळ केलेल्या संबंधीत कर्मचा-यास काय शिक्षा दिली हा मुद्दा वगळता, इतर कोणत्याही मुद्दयावरील माहिती मूळात अपिलार्थीस देय नाही. कारण ती, 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतया विसंगत आहे. या दोनही मुद्दयाबाबत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे देण्यासंबंधात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. या प्रक्रियेमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे अपेक्षित करणे अशा प्रकारच्या प्रक्रियाचा समावेश नाही. मात्र अपिलार्थीच्या अर्जातील, 'संबंधितांना काय शिक्षा दिली' या मुद्दा क्रमांक ४ च्या अंशतः भागातील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्रीमती एस. एम. धर्माधिकारी, लिपीक, श्री. पी. बी. गायकवाड, प्रमुख लिपीक यांना १००० रुपये इतकी शास्ती कारागृह उपमहानिरीक्षक मध्य विभाग औरंगाबाद यांच्या आदेशानुसार लावली असून या शास्तीची रक्कम संबंधितांच्या पगारातून परस्पर वळती करुन घेण्यात आलेली आहे. यासंदर्भात ही माहिती अपिलार्थीस पुरविली काय, असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस विचारले असता, यावर त्यांनी याबाबत अपिलार्थीस माहित आहे, असे आयोगास अवगत केले. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असेही आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केलेली संबंधिताच्या पगारातून १००० रुपये कपात केल्याची बाब अपिलार्थीस अगोदरच माहिती असली तरी त्यांनी ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, निर्णयामध्ये वर स्पष्ट केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक ४ अंशतः शी संबंधित माहिती (संबंधितांच्या पगार कपातीच्या

आदेशाची प्रत व रक्कम परस्पर पगारातून वळती केल्याबाबतच्या कागदपत्राच्या प्रती ) त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलाची कारणे या स्तंभासमोर त्यांनी आयोगाकडे " दबावतंत्राचा वापरामुळे " या कारणास्तव व्दितीय अपील केल्याचे नमूद केले आहे. तथापि या मुद्दयावर अपिलार्थीवर दबाव कोणता व तो कोणाकडून कशा प्रकारे आला याचे कोठलेही स्पष्टीकरण त्यांनी या अर्जामध्ये अथवा वेगळया पत्राद्वारे आयोगास केलेले नसल्याने त्यांच्या व्दितीय अपील अर्जातील " दबावतंत्राचा वापरामुळे " या मुद्दयाचे निराकरण करण्यात येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ मधील " संबंधितांना काय शिक्षा दिली " या मुद्दयावरील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-०७-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हजारी युवराजसिंह पदमसिंह, (जेल पोलीस), औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ तुरुंगाधिकारी, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५४

निर्णय दिनांक २९-०७-२००९

१ श्री. उत्तमराव केशवराव शेळके, : अपिलार्थी
मु. आलमगांव, पो. हस्तपोखरी, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी ,
लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, अंबड,
तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे जिल्हा परिषद विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" आलमगांव गावतळे पूर्ण माहिती, दिनांक २९-०५-२००६ मध्ये गावतळे इस्टीमेट, हाजरी बुक गावतळ्याचे आज दिनांक ३/३/२००८ पूर्ण खर्च झालेला त्याची पूर्ण माहिती "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे व तसेच यासंदर्भात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७-०४-२००८ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर त्यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी हजर नाहीत. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०७-०१-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्याकडील सहायक जन माहिती अधिकारी यांच्या पोचसहीवरुन दिसून येते मात्र प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला किंवा कसे हे आयोगास (आवश्यक त्या कागदपत्रा-अभावी ) कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करतांना दिलेले कारण लक्षात घेता या प्रकरणी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद विभाग, जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद विभाग, जालना यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला असल्यास उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद विभाग, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०७-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उत्तमराव केशवराव शेळके, मु. आलमगांव पो. हस्तपोखरी तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५५

निर्णय दिनांक २९-०७-२००९

१ श्री. फेरोजखान इब्राहीम खान, : अपिलार्थी
कुंभार गल्ली, गौसीया मस्जीदजवळ, भोईगल्ली, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, गुलाम नबी आझाद उर्दू कन्या शाळा,
जिंतूर, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
परभणी

त्रयस्थ पक्ष : श्रीमती अतिया सुलताना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गुलाम नबी आझाद उर्दू कन्या शाळा, जिंतूर च्या संदर्भात एकूण सहा

मुद्दयाव्दारे त्यांच्या शाळेशी व त्रयस्थ पक्ष श्रीमती अतिया सुल्ताना यांचेशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विना दिनांकाचे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना माहिती आवश्यक असल्याचा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक ०५-०७-२००८ रोजीचा कथित माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास अवगत केले.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

आयोगाच्या या आदेशाच्या प्रतीबरोबर अपिलार्थीच्या विनादिनांकाच्या प्रथम अपील अर्जाची प्रत पाठविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. फेरोजखान इब्राहीम खान, कुंभार गल्ली, गौसीया मस्जीदजवळ, भोईगल्ली, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गुलाम नबी आझाद उर्दू कन्या शाळा, भाजी मार्केटजवळ, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(सोबत अपिलार्थीच्या विनादिनांकाच्या प्रथम अपील अर्जाची प्रत)

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५६

निर्णय दिनांक २९-०७-२००९

१ श्री. वसंत लक्ष्मणराव भायेकर, : अपिलार्थी

किलबिल बाल संस्कार केंद्राजवळ,

शेख रफी साहेब यांचे घर, स्वामी विवेकानंद नगर,

मालेगाव रोड, तरोडा (खुर्द), नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कुलसचिव,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कुलगुरु,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कुलसचिव, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही समाधानकारक माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगा-कडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची मुलगी कु. विद्या वसंतराव भायेकर हिच्या गुण पडताळणीच्या संदर्भात एकूण दोन मुद्याव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या मुलीला गुण पडताळणीच्या संदर्भात विनंती केली असता काय कार्यवाही केली याची कागदपत्रे मिळाली नसल्याने विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयास केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व व्दितीय बी.ए.एम.एस.ला नापास असताना तृतीय बी.ए.एम.एस. ची परीक्षा ज्या नियमान्वये देता येते त्या नियमाची मराठी प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात संबंधित महाविद्यालयाशी पत्रव्यवहार करण्याचे सूचित केले व मुद्दा क्र. २ द्वारे मागणी केलेली नियमाची मराठी प्रत अस्तित्वात नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात आपले अभिप्राय अपिलार्थीस कळविले. तथापि या अभिप्रायांनी समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमतः दिनांक ०८-०२-२००८ व तदनंतर दिनांक १३-०३-२००८ रोजी या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती स्पष्ट करुन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जात ज्या पत्रव्यवहाराच्या प्रती मागितल्या आहेत तशा प्रकारचा पत्रव्यवहार जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाल्याने ते अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत म्हणून त्यांनी अपिलार्थीस संबंधित महाविद्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय घेऊन अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०२-२००८ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दोन मुद्दयावरील माहितीपैकी पहिल्या मुद्दयासंदर्भात संबंधित महाविद्यालयाकडे संपर्क साधण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितल्या होत्या. तथापि हे प्रकरण १९९० सालाशी संबंधीत आहे. अशाप्रकारची कागदपत्रे जतन करुन ठेवण्याचा कालावधी आता व्यपगत झाला आहे. त्यामुळे आता ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. यासंदर्भात त्यांना असे सूचित करण्यात येते की, जर त्यांनी या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे नष्ट केली असतील तर या संदर्भातील कागदपत्रे नष्ट केल्याचा पुरावा त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावा. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहितीचा त्यांच्या कार्यालयात याच कालावधीमध्ये पुनश्च शोध घेऊन अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा

क्रमांक २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेली माहिती बरोबर आहे. या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून रेग्युलेशन क्रमांक ६४२ ची प्रत मराठीमध्ये भाषांतरीत करुन हवी आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात देणे अभिप्रेत आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर परत नव्याने संस्करण करुन ही अर्जदारास नवीन स्वरुपात पुरविणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात पुरविलेली माहिती योग्य आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वसंत लक्ष्मणराव भायेकर, किलबिल बाल संस्कार केंद्राजवळ, शेख रफी साहेब

यांचे घर, स्वामी विवेकानंद नगर, मालेगाव रोड, तरोडा (खुर्द), नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५७

निर्णय दिनांक २९-०७-२००९

१ श्री. भाऊसाहेब ज्ञानोबा पाटील, : अपिलार्थी
पाटील गल्ली, पाथरी, तालुका पाथरी,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपजिल्हाधिकारी (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००८ रोजी फेर नोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे यासंदर्भातील प्रथम अपील खारीज करतांना फक्त स्वतःवरील आरोपांचा विचार करुन ते खारीज केले. त्यामुळे त्यांनी आयोगास अशी विनंती केली की, उपजिल्हाधिकारी

(सामान्य), परभणी व अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्यावर बेकायदा अपील खारीज केल्याबाबत दंडात्मक कारवाई करुन अपिलार्थीस न्याय द्यावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गट नंबर ४८ मौजे रेणापूर येथील गैरव्यवहाराबाबत दिलेल्या अर्जासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या संदर्भिय अर्जाचे अवलोकन करता, या अर्जामध्ये अपिलार्थीने निवासी उपजिल्हाधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील विषयासंदर्भात त्यांनी वरिष्ठ कार्यालयास पाठविलेल्या अहवालांच्या प्रतींची व इतर तीन मुद्दयाव्दारे इतर काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने निवासी उपजिल्हाधिकारी, परभणी यांना त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविलेल्या अहवालांच्या प्रती व्यतिरिक्त इतर माहिती त्यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी मागितल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २२-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे हस्तांतरीत केले. त्यांनी अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात दिनांक २३-०४-२००७ रोजी आपला निर्णय पारित करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वस्तुनिष्ठ माहिती पुरविल्याच्या कारणावरुन अपिलार्थीचे अपील खारीज केले. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या पत्राची व जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २३-०४-२००७ रोजीच्या निर्णयाची प्रत सादर केली.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांचयाकडे " गट नंबर ४८ मौजे रेणापूरचे सिलींग फेरवाटप " एवढीच माहिती मागितल्याचे दिसून येते. या माहितीवरुन अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीने माहितीसाठीच्या प्रथम अर्जासोबत त्यांच्या गट नंबर ४८ मौजे रेणापूर गैरव्यवहाराबाबतच्या अर्जाची प्रत दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीस निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडून या प्रकरणी वरिष्ठ कार्यालयास पाठविलेल्या अहवालांच्या प्रतीची आवश्यकता असल्याचे दिसून येते. तथापि याचा उल्लेख अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी व्यवस्थितपणे करता आलेली नाही तरीही त्यांनी त्यांच्या प्रथम अर्जासोबत जोडलेल्या तक्रार अर्जातील त्यांना मुद्दा क्रमांक १ व्दारे अपेक्षित असलेली " वरिष्ठ कार्यालयास या प्रकरणी पाठविलेले अहवाल " ही माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस स्वतःला त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी मूळ अर्जामध्ये न करता आल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील खारीज केल्याचे दिसून येते. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतःवरील आरोप दूर करुन निर्णय दिल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे परंतु त्यास कोणताही आधार दिसून येत नाही. सबब अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील जन अपिलीय अधिकारी यांच्यावरील

आक्षेप फेटाळून लावण्यात येत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी दिनांक १८-१२-२००६ रोजीपर्यंत अपिलार्थीच्या मूळ अर्जातील विषयावर त्यांनी वरिष्ठ कार्यालयास पाठविलेल्या अहवालांच्या झेरॉक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या तक्रार अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भाऊसाहेब ज्ञानोबा पाटील, पाटील गल्ली, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सामान्य), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५८

निर्णय दिनांक २९-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. तुकाराम ज्ञानोबा शेजूळ,<br>मु. मरडसगांव, पो. पाथरगव्हाण, तालुका पाथरी,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>पोलीस ठाणे, पाथरी,<br>तालुका पाथरी, जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक, परभणी | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, पाथरी, ता. पाथरी, जिल्हा परभणी |
| प्रत्यक्षतः | जन अपिलीय अधिकारी | : | पोलीस उप अधीक्षक, सेलू, जिल्हा परभणी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचा अर्ज त्यांना पोलीस ठाण्यातून प्राप्त

झाला नाही असे खोटे विधान अपिलीय अधिका-यासमोर केले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती गोपनीय असल्याने ती देणे शक्य नाही या मुद्दयावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील खारीज केल्यामुळे त्यांनी हे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेशानुसार माझ्या शस्त्र परवान्याबाबत फेर चौकशी करुन मा. पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे पाथरी यांनी माहे ऑगसट २००७ मध्ये दुसरा चौकशी अहवाल (जा. क्र. २२२/०७, दि. १६/८/२००७) मा. जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांना सादर केला आहे. त्या अहवालाची प्रमाणित प्रत. "

अपिलार्थीने सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी, पोलीस ठाणे, पाथरी येथे केला होता. तथापि हा अर्ज पोलीस ठाणे पाथरी येथे प्राप्त झाला नसल्याने संबंधितांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-११-२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची असल्याने देता येणे शक्य नसल्याच्या कारणावरुन फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही गोपनीय स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देता येत नसल्याचे आयोगासमोर अवगत केले. अपिलार्थीस माहिती न देण्याबाबतची कारणे स्पष्ट करतांना पोलीस निरीक्षक, पाथरी यांनी आयोगास पुढे असेही स्पष्ट केले की, त्यांच्या वरिष्ठांच्या आदेशानुसार ही माहिती गोपनीय असल्याने ती अपिलार्थीस पुरविता येणार नाही. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, अधिनियमातील कलम २२ च्या तरतुदीप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याने शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा १९) अधिक्रमित केला असल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस आता द्यावी लागेल.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती, "चौकशी अहवाल दिनांक १६-०८-२००७" चे अवलोकन केले असता, या अहवालाची प्रत अपिलार्थीस दिल्याने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) व ९ चा कोणत्याही प्रकारे भंग होईल, असे आयोगास वाटत नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती पुरवावी लागेल. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीचा दिनांक ३०-०८-२००७ रोजीचा कथित मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीच्या आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांचा दिनांक ३०-०८-२००७ रोजीचा मूळ अर्ज पोलीस स्टेशन, पाथरी येथे दाखल केल्याचा कोणताही पुरावा दिसून आलेला नाही अथवा या संदर्भात खुलासा करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित देखील नाहीत. हे पाहता जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही हा युक्तिवाद, मान्य करण्यात येऊन अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे याच माहितीकरिता नव्याने अर्ज करावा व अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांना दिल्याची पोच

स्वतःकडे ठेवावी. अपिलार्थीचा हा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या शस्त्र परवान्याच्या अर्जासंदर्भात दिनांक १६-०८-२००७ रोजी पोलीस अधीक्षक परभणी यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तुकाराम ज्ञानोबा शेजूळ, मु. मरडसगांव पो. पाथरगव्हाण तालुका पाथरी जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, पाथरी, तालुका पाथरी जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९५९

निर्णय दिनांक २९-०७-२००९

१ श्री. नूरउलहक , : अपिलार्थी
मेट्रो टेडिंग कंपनी, महावीर चौक,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी

जन अपिलीय अधिकारी : समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील

करेपर्यंत, आवश्यक ती माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाने आर्थिक वर्षे २००७-२००८ मध्ये शिवण मशिन खरेदी करण्याकरिता मागविलेल्या निविदांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या निविदा सूचनेची प्रत, को-या निविदा प्राप्त करुन घेण्यासाठी निविदाधारकांच्या प्राप्त अर्जाच्या प्रती, यासंदर्भात विभागाने संबंधितांना दिलेल्या पोच पावतीच्या प्रती, निविदाधारकांची यादी, पाकीट क्रमांक १, २ व अनिवार्य कागदपत्रे यांच्या प्रती, खरेदी आदेशाची प्रत, निविदाधारकाने सदर खरेदी पृष्ठयर्थ सादर केलेल्या बिलांच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून ती माहिती ते

अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे कारण त्यांना माहित नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांचा दिनांक २१-०२-२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज मेट्रो ट्रेडिंग कंपनी या कंपनीच्या नावाने केला आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीचे नांव या मुद्दयासमोर देखील 'मेसर्स मेट्रो ट्रेडिंग कंपनी' असेच दर्शविले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती फक्त भारतीय नागरिकांनाच देय आहे. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही कंपनीला माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती पुरविणे हे मूळात अभिप्रेत नाही. एवढे जरी असले तरी अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत प्रतिसाद देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशा प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये व आयोगाकडे नोंदविलेल्या दिनांक २१-०५-२००८ रोजीच्या अर्जाच्या पाकीटावर अपिलार्थीचे नाव लिहिले आहे. या दोन अपील अर्जावर अपिलार्थीने आपले नांव नमूद केले असल्यामुळे आणि वरीलप्रमाणे संदर्भित केल्याप्रमाणे अपिलार्थीचे दुसरे अपील विचारात घेण्यात येत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्याकडे तयार असलेली माहिती दाखविली. या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीस आता जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळत असली तरी या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या मूळ

अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) व ७ (८) प्रमाणे जो प्रतिसाद देणे या प्रकरणी त्यांना भाग होते तो त्यांनी दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील आर्थिक वर्षे २००७-२००८ या कालावधीशी संबंधित आहे त्यामुळे ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना फारसे कष्ट घ्यावे लागले असते किंवा त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागली असती अशापैकी कोणतीही बाब येथे संभवत नाही. हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या नाकर्तेपणामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेण्याच्या हक्कापासून वंचित राहिले आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस निश्चितपणे पात्र ठरत आहेत. सबब सचिव (सामाजिक न्याय) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी (श्री. पठाण एम. ए.) यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (सामाजिक न्याय) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी (श्री. पठाण एम. ए.) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नूरउलहक, मेट्रो टेडिंग कंपनी, महावीर चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६०

निर्णय दिनांक २९-०७-२००९

१ श्री. कांबळे गुरुदत्त पुंडलिक, : अपिलार्थी

सुभेदार रामजीनगर, नगरपरिषद शाळा क्रमांक २३ समोर,

लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा समादेशक कार्यालय, तालुका जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा समादेशक होमगार्डस, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्डस कार्यालय, लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. एम. बी. कल्लूरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असतांना देखील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उदगीर, औसा व निलंगा येथील अंशकालीन लिपीक श्री. कल्लूरे व इतर यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या व नेमणूक दिलेल्या आदेशाच्या झेरॉक्स प्रतींची व्यक्तिशः मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १९-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, हे पत्र अपिलार्थीस लिहित असतांना या पत्रातील १९-१ या टंकलिखित तारखेवर १४-१ असे लिहिल्याचे आढळून येत आहे. या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली होती. तथापि ही माहिती घेण्यास अपिलार्थीने त्यावेळी नाकारले असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०१-२००८ रोजी त्यांना माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून प्रथम अपील केले. या अपील अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०१-२००८ रोजी ठेवली होती तथापि सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती दुस-या स्त्रोताकडून त्यांना प्राप्त झाली असून त्यांना माहितीची आवश्यकता नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांना लेखी पत्र दिले. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील दिनांक १८-०१-२००८ रोजी निकाली काढले. यानंतर अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १९-०१-२००८ रोजी व्यक्तिशः माहिती देऊ केली असता त्यांनी माहिती देण्यास उशीर झाला या कारणाने ती माहिती स्वीकारण्याचे नाकारले व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीच्या दिवशी त्यांना हवी असलेली माहिती दुस-या स्त्रोताकडून प्राप्त झाली असे सांगून आता त्यांना माहितीची आवश्यकता नाही असे सांगितले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे देऊ केली असता अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०१-२००८ रोजी त्यांच्या प्रथम अपिलासंदर्भात झालेल्या सुनावणीच्या वेळी त्यांना ही माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी कबूल केले आहे हे पाहता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेल्या माहितीवरुन असे आढळून येते की, श्री. कल्लूरे माणिक बाबुराव यांची शैक्षणिक पात्रता सातवी पास, श्री. पंडित विष्णूपंत कुलकर्णी यांची शैक्षणिक पात्रता इयत्ता नववी पास व चौधरी यांची शैक्षणिक पात्रता नववी पास अशी आहे. या तीनही त्रयस्थ पक्षाच्या नेमणुकीचे आदेश जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहेत. अजूनही अपिलार्थीस या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्व नियोजित कार्यालयीन वेळेत स्वतः उपस्थित राहून हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत हस्तगत करुन घ्यावी. यानंतर अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देय राहणार नाही, असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे. याचबरोबर ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस येथे असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास ही माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. अपिलार्थीस माहिती उपलब्ध न होण्यासाठी या प्रकरणी ते स्वतः जबाबदार असल्याचे वरील विवेचनाद्वारे दिसून येत आहे. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशा प्रकारे व्यक्तिशः माहिती मागवून नंतर माहिती स्वीकृत न करण्याच्या आपल्या अशा प्रकारच्या वृत्तीस आळा घालावा, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. कांबळे गुरुदत्त पुंडलिक, सुभेदार रामजीनगर, नगरपरिषद शाळा क्रमांक २३ समोर, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासिक अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्डस कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समादेशक होमगार्डस, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६१

निर्णय दिनांक  २९-०७-२००९

१ श्री. जयराज गोविंदराव तेलंगे, : अपिलार्थी
नागेश कॉलनी, थोडगा रोड, अहमदपूर, तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, उपविभाग अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा
लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय उदगीर, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यांना माहिती दिली नाही अथवा ती देण्यासाठी नकारही दिला नाही. यासंदर्भात प्रथम अपिलीय अधिका-याने देखील त्यांची पाठराखण केली. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना विलंबाने माहिती प्राप्त होण्यासंदर्भात या प्रकरणी जे जबाबदार अधिकारी आहेत त्यांच्यावर

शासनाच्या निर्णयानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी व अधिनियमातील कलम २० प्रमाणे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावावी व या शास्तीची रक्कम अपिलार्थीस द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदपूर शहरातील मिटर शिफ्टींग कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व साहित्यासहीत शिफ्टींगचे एकूण इस्टिमेट किती, ग्राहकाकडून कोणत्या साहित्यासाठी किती रुपये आकारणी केली जाते व जे मिटर बसविले आहेत त्यात काड्या करुन बसविणे चालू आहे त्यामुळे विद्युत कंपनीच्या होणा-या नुकसानीस जबाबदार कोण - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने

मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांच्याकडे उपलब्ध असण्याची कोणतीही शक्यता नसलेली अमूर्त स्वरुपातील व माहिती या शब्दाच्या, अधिनियमातील व्याख्येच्या, व्याप्ती बाहेरची अशी माहिती मागितली होती, जी अधिनियमातील तरतुदीशी पूर्णपणे विसंगत आहे, त्यामुळे ती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र उर्वरित दोन मुद्दयावरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ही अपिलार्थीस पुरविणे जन माहिती अधिकारी यांना क्रमप्राप्त आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य-परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस व्यवस्थापकीय संचालक, मुंबई यांना करण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावून शास्तीची रक्कम अपिलार्थीस देण्याचे आदेशित करण्याची विनंती आयोगास केली आहे. तथापि अपिलार्थीची ही विनंती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी कोणत्याही प्रकारे सुसंगत नसल्याने अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावून शास्तीची रक्कम त्यांना देण्याची विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जयराज गोविंदराव तेलंगे, नागेश कॉलनी, थोडगा रोड, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय उदगीर, तालुका उदगीर जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६२

निर्णय दिनांक २९-०७-२००९

१ श्री. दिपक मोहनराव शिंदे, : अपिलार्थी
आवृत्ती प्रमुख, व्दारा दै. लोकपत्र, भाग्यनगर रोड,
अशोकनगर, रोड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास
महामंडळ, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास
महामंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, " नांदेड विमानतळासाठी बांधलेल्या संरक्षक भिंतीचा बांधकाम परवाना घेतला आहे का ? या प्रश्नाचे उत्तर दिले जात नाही " या प्रश्नाचे उत्तर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - नांदेड विमानतळासाठी बांधलेल्या संरक्षक भिंत व मुख्य इमारतीचा बांधकाम परवाना घेतला आहे का ? असल्यास नकाशा व परवान्याची प्रत, संरक्षक भिंतीवर झालेला खर्च, त्या भिंतीत किती वेळा बदल झाला, संरक्षक भिंत व इमारतीसाठी किती जणांच्या जमिनी ताब्यात घेतल्या, मावेजा किती दिला ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली व त्यांना आवश्यक असलेला नकाशा व परवान्याच्या प्रतीच्या संदर्भात अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात रु. ५२/- इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे सूचित केले व जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेतली, परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, नांदेड विमानतळाच्या संरक्षित भिंतीचा बांधकाम परवाना घेतला होता का या प्रश्नाचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिले नाही. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांना दिनांक १४-०३-२००८ रोजी पुरविली आहे व त्यामधील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहितीमध्ये या प्रश्नाचे उत्तर समाविष्ट असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०३-२००८ रोजी पुरविली आहे.

नांदेड विमानतळाच्या बांधलेल्या संरक्षित भिंतीच्या बांधकामाची परवानगी त्यांनी नांदेड वाघाळा महानगरपालिकेकडून घेतली नव्हती.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी प्रथमतः असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देतांना प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती देणे अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्न विचारणे, त्यांच्या निर्णयाबद्दल किंवा कृतीबद्दल त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणा-या माहितीची मागणी करणे अशा प्रकारच्या प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नाहीत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदाराला देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीने " नांदेड विमानतळासाठी बांधलेल्या संरक्षक भिंतीचा बांधकाम परवाना घेतला आहे का ? " ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार 'माहिती'चा विषय होऊ शकत नाही आणि ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देयही होत नाही. अपिलार्थीच्या या प्रश्नाचे उत्तर, जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी आयोगासमोर सांगितल्याप्रमाणे, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमधील हेतू लक्षात घेऊन त्यांनी नांदेड विमानतळासाठी बांधलेल्या संरक्षक भिंतीचा बांधकाम परवाना घेतला नव्हता असे स्पष्टपणे जर अपिलार्थीस विहित मुदतीत कळविले असते तर, जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक कार्यवाही केल्याचे म्हणता आले असते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती मागितली आहे त्यापैकी अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत दिली आहे. तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहितीचा समावेश नाही. ज्यावेळी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याशी सरळ संबंधित नसते

त्यावेळी त्यांनी कशा प्रकारे कार्यवाही करणे अपेक्षित आहे याचे सविस्तर विवेचन अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीमध्ये दिलेले आहे. हे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात माहिती देण्याकरिता अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड व भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे या प्रकरणी अभिप्रेत होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याचे दिसून येते. आता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ ची माहिती त्यांनी संबंधित प्राधिकरणांकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, उर्वरित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**

**दिनांक २९-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिपक मोहनराव शिंदे, आवृत्ती प्रमुख, व्दारा दै. लोकपत्र, भाग्यनगर रोड, अशोकनगर, रोड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७४३

निर्णय दिनांक २९-०७-२००९

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, : अपिलार्थी
मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
कार्यालय, उस्माबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००८ रोजी फेर नोंदणी झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली, त्यांच्या प्रथम अपिलावर अद्यापपर्यंत सुनावणी घेण्यात आली नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार संबंधितांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याने त्यांच्यावर योग्य ती कारवाई आयोगाने करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम राबविण्यासाठी शासन नियमावली, आदेशपत्र इत्यादी स्वरुपाची सन ०१ जानेवारी २००१ ते ३१ डिसेंबर २००६ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली असून या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. या संदर्भात पुरावा म्हणून त्यांनी डी. आर. डी. ए. च्या प्रमाणपत्राची प्रत जोडली असल्याचे देखील या अर्जामध्ये नमूद केले आहे. तथापि त्यांनी डी. आर. डी. ए. च्या प्रमाणपत्राची प्रत प्रथम अर्जास जोडली नाही. त्यांच्या कौटुंबिक शिधापत्रिकेची प्रत मूळ अर्जासोबत जोडली आहे. जन माहिती अधिका-यास हा पुरावा पुरेसा न वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याच्या संदर्भात वैध पुरावा मागितला व त्याचवेळी तहसीलदार, तुळजापूर व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांना अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याबाबत दिनांक ०६-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे विचारणा केली असता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांनी त्यांच्या दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे अथवा न देण्यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०६-२००७ रोजी अपिलार्थीस सुनावणीसाठी हजर राहण्याचे पत्र लिहिले. तथापि अपिलार्थी त्या सुनावणीस गैरहजर राहिले व या

सुनावणीपूर्वीच त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकूण ६०० पृष्ठांची असून ती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून ते अपिलार्थीस ती देण्यास तयार आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अपिलार्थीस देण्याकरिता त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दाखविली. या माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सुसंगत असल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विस्तृत स्वरुपाची (अंदाजे ५०० पृष्ठांची) माहिती अपेक्षिली होती व त्यासाठी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा त्यांच्या मूळ अर्जामध्ये उल्लेख केला होता. तथापि या संदर्भात त्यांनी कोणताही वैध पुरावा जोडला नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी पुराव्याची वैधता तपासणीच्या दृष्टीने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्याशी संपर्क साधला असता अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्याचे सिध्द झाले. त्यामुळे अपिलार्थीस आता ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी त्यांच्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राबाबत वैध पुरावा सादर केल्याशिवाय विनामूल्य देय होणार नाही. अपिलार्थी हे खरोखरच दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे यासंदर्भात कोणताही पुरावा सादर केला नाही किंवा आज रोजी सुनावणीसाठी ते स्वतः आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, मु. पो. निलेगांव तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्माबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८६
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे,<br>रा.अंबड, जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता,<br>लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),<br>उपविभाग,अंबड,जि.जालना<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,<br>जालना. | : | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता,
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग,अंबड,जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व माहितीचे पैसे भरुन घेण्यास देखील टाळले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच श्री. संजय व्यंकटराव पडलवार, उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड यांनी अपिलार्थीची सही व अंगठा असलेले आयोगास उद्देशून लिहिलेले दि. २९.०७.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास व्यक्तिशः सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना दि. ०६.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.९९०/- इतके भरण्याचे सूचित केले होते. तथापि ही रक्कम अपिलार्थी भरु शकत नसल्याने त्यांनी उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे, अंबड उपविभाग जि.जालना यांना सदर कामाची पहाणी करण्यासाठी विनंती केली. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी झालेली कामे व रेकॉर्ड दाखविल्याने त्यांचे समाधान झाले असून ते विचाराधीन तक्रार मागे घेत आहेत.

अपिलार्थीने आयोगाकडे नोंदविलेल्या विचाराधीन अपील अर्जामध्ये माहितीचे पैसे भरुन घेण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे नमूद केले आहे व आज जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत आयोगाकडे सादर केलेल्या पत्रामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क ते भरु शकत नसल्याचे या पत्रामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थी यांच्या या प्रकरणातील विसंगत भूमिका व विशेषतः आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांची असलेली गैरहजेरी आणि आयोगास सादर करण्यात आलेल्या त्यांच्या दि. २९.०७.२००९ रोजीच्या पत्रामधील विनंतीचा विचार करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास उरत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र.७८६/०८, दि. १९.०४.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सिध्देश्वर बद्रीनाथ उबाळे, कावदी गल्ली,अंबड,ता. अंबड, जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),उपविभाग,अंबड,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६३
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शिवाजी महादेव जाधव,<br>रा.लोहटा (प.),ता.कळंब,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी<br>वर्ग-१ (नि.श्रे.),<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,<br>लातूर विभाग, लातूर. | | |

त्रयस्थ पक्षः श्री. आर.बी.म्हेत्रे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती उशिरा, अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१३.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे- "श्री. आर.जी. म्हेत्रे यांना कोणकोणत्या कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार २००७ पासून आजपर्यंत दिला गेला यांचे आदेशाचा प्रती" -ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन "श्री. आर.बी. म्हेत्रे यांना कळंब, भूम व परांडा या कार्यालयाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला होता," असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील पत्र दि.१६.०४.२००८ अन्वये निर्णय दिला असून या निर्णयाद्वारे त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असल्याने, अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही दिशाभूल करणारी असून त्यांनी ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती, त्या कालावधीमध्ये त्रयस्थ पक्ष श्री. आर.बी.म्हेत्रे हे निलंबित झाले होते. ते निलंबित असतानाही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळंब, भूम व परांडा या कार्यालयाचा अतिरिक्त पदभार दिला होता. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. यासंदर्भात संबंधितांवर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई व्हावी, अशीही त्यांनी आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडील दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. म्हेत्रे यांना अतिरिक्त कार्यभार ज्या आदेशान्वये दिला गेला होता, त्यांच्या प्रतींची मागणी केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारच्या आदेशाच्या प्रती अपिलार्थीस न पुरविता त्रयस्थ पक्ष श्री. म्हेत्रे यांना कोणत्या कार्यालयाचा अतिरिक्त पदभार दिला होता, त्यांची स्थळे कळविली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगास असे अवगत करण्यात आले की, श्री. म्हेत्रे यांना अतिरिक्त पदभार देत असताना त्यांच्या कार्यालयाने आदेश निर्गमित केले नव्हते व तसेच श्री. म्हेत्रे यांना फक्त एक दिवसाच्या कालावधीकरिता या पदाचा कार्यभार देण्यात आला होता. त्यामुळे त्यांना अपिलार्थीस आदेशाच्या प्रती देता आल्या नाहीत. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, जर म्हेत्रे यांना अतिरिक्त कार्यभार देण्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी कोणताच लेखी आदेश पारित केला नव्हता तर त्यांनी अपिलार्थीच्या दि.१३.०२.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भात तसे कळविणे त्यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सोडून अपिलार्थीस दुसरीच माहिती दिली आहे व तसे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे सिध्द होत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब नोंदणी महानिरीक्षक यांना सबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल, प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणाशी संबंधित सत्य माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये नमूद केलेला मुद्दा हा गंभीर स्वरुपाचा आहे, असे आयोगास वाटते. या प्रकरणी नोंदणी महानिरीक्षक यांनी स्वतः चौकशी करुन ज्या अधिकाऱ्याकडून निलंबित कर्मचाऱ्यास अतिरिक्त पदभार देण्याचा प्रमाद घडला आहे, त्यांच्यावर, आवश्यक वाटल्यास, प्रशासकीय कारवाई करण्यात यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

३) नोंदणी महानिरीक्षक, म.रा.पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी महादेव जाधव,रा.लोहटा (प.),ता.कळंब,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१ (नि.श्रे.)उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,लातूर विभाग,

लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,नवीन प्रशासकीय इमारत,तळमजला,कौन्सिल हॉलसमोर,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६४
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शिवाजी महादेव जाधव,<br>रा.लोहटा (प.),ता.कळंब,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी<br>वर्ग-१ (नि.श्रे.)<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,<br>लातूर विभाग, लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१५.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील प्रशासन व कार्यपध्दतीसंबंधी एकूण ९ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः

अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १८.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेण्याची कार्यवाही न करता प्रथमतः त्यांच्या कार्यालयातील दि. २३.०४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून एक पत्र लिहिले. या पत्रामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व तसेच माहिती सादर न झाल्यास, योग्य तो निर्णय संबंधितांना कळविण्यात येईल, असाही इशारा त्यांनी या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांना दिला आहे व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नसल्याचे व ती चुकीची आणि दिशाभूल करणारी असल्याचे त्यांचे मत व्यक्त केले व त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण ९ मुद्यांवरील माहितीपैकी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्र.१ ते ८ मधील अंशतः माहिती देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.

९ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १४.०३.२००८ रोजी पुरविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी पूर्णपणे विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंबंधी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे, एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे मागणे अनुज्ञेय नाही. अर्जदारास पुरविण्यात आलेल्या माहितीसंदर्भात असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ द्वारे सन २००७ च्या शासन निर्णयाच्या आणि त्यांच्या कार्यालयाच्या वरिष्ठांच्या आदेशाच्या प्रती मागितल्या असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शासनाच्या सन २००६ सालच्या अधिसूचनेची प्रत दिली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. त्यामुळे या मुद्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयास २००७ चा शासन निर्णय प्राप्त झाला असल्यास त्यासह त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठांच्या आदेशाच्या प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील, तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील काही नियम मुद्दा क्र. २ च्या संदर्भात येत असल्यास त्या नियमांच्या प्रती, मुद्दा क्र. ३ मधील वरिष्ठांचे आदेश, मुद्दा क्र.४ वरील त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची नावे, ते त्यांच्या कार्यालयात कार्यरत असलेला कालावधी, मुद्दा क्र. ५ मधील प्रतिनियुक्त केले गेलेल्या कर्मचाऱ्यांचे आदेश, मुद्दा क्र. ७ मधील अतिरिक्त कार्यभार देण्याबाबत प्राप्त सुचना व नियम, मुद्दा क्र. ८ मधील 'दस्तलेखक अथवा मुद्रांक विक्रेते यांचे परवाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अथवा एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात बदली करण्याचे संबंधित प्रचलित नियम व अटींची प्रत'- ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना जन माहिती

अधिकारी यांच्याकडून कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती अपेक्षित आहे, याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस  तसे कळवून त्यांचा प्रथम अर्ज निकाली काढावयास हवा होता. तथापि आता अपिलार्थीने आयोगासमोरील केलेल्या युक्तिवादामध्ये सन २००७ सालची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असल्याचे कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस वरीलप्रमाणे देय होत असलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी.

वरील परिच्छेदात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, ही चुकीच्या पध्दतीने सादर केली असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक :     ३०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी महादेव जाधव,रा.लोहटा (प.),ता.कळंब,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१ (नि.श्रे.), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६५
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शिवाजी महादेव जाधव,<br>रा.लोहटा (प.),ता.कळंब,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी<br>वर्ग-१ (नि.श्रे.)<br>उस्मानाबाद<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,<br>लातूर विभाग, लातूर | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्षः श्री. च.ल.सूर्यवंशी,श्री. भंसाळी,
श्री. सुधीर पाटील

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खरी माहिती दिली नसल्याने व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण, उशिरा, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व या अपील अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी

अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२९.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील श्री. सूर्यवंशी,श्री. भंसाळी व श्री. सुधीर पाटील यांनी स्थानिक स्तरावर मालमत्तांच्या केलेल्या अभिनिर्णयासंबंधी काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.०२.२००८ रोजी सशुल्क माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या प्रकरणाशी संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक - हे जन अपिलीय अधिकारी आहेत. त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दि. २३.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली व त्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. परंतु सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच त्रयस्थ पक्ष श्री. सूर्यवंशी उपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब नोंदणी उपमहानिरीक्षक, लातूर तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२८.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी महादेव जाधव,रा.लोहटा (प.),ता.कळंब,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१ (नि.श्रे.)उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६६ व ९६७
निर्णय दिनांक : ३०-०७-२००९

१ सौ. शोभा सदाशिवराव तिडके, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपसंचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक,आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, पुणे
जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर
त्रयस्थ पक्षः श्री. व्ही.आर.तिडके

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि.२९.०५.२००८ व दि. ०७.०६.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या दोनही द्वितीय अपील अर्जांशी संबंधित एकच प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज असल्याने या दोन्ही द्वितीय अपिलांची एकत्रितपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व निर्णय दिला नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील सादर केले आहे व तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूरी,चुकीची

आणि दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. त्यांना संबंधितांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने जन माहिती व अपिलीय अधिकारी हे दोघेही दंडास पात्र आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०६.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. व्ही. आर. तिडके, सेवानिवृत्त जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या निवृत्तीवेतनासंदर्भात एकूण १३ मुद्यांद्वारे दि. ०१.०१.१९८२ ते ३१.१०.२००६ या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या मूळ सेवापुस्तिकेशी संबंधित काही माहिती पुरवली व अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेले अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे त्यांना शक्य आहे, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व निर्णय दिला नाही, असे दर्शवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्रयस्थ पक्ष हे त्यांचे दीर असून त्यांच्या सेवानिवृत्तीवेतनाची निश्चिती व तदनुषंगीक लाभ त्यांना लवकर मिळविण्याकरिता त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस हजर राहून व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत प्राप्त होऊनही त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व निर्णय दिला नाही, असे असत्य विधान कशाच्या आधारे केले, असे आयोगाने अपिलार्थीस विचारले असता, अपिलार्थी आयोगास उत्तर देऊ शकल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दि. ११.०३.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. या प्रकरणी त्रयस्थ पक्षाच्या मूळ सेवापुस्तिकेची प्रत गहाळ झाली असल्याने अपिलार्थीस ते मूळ सेवापुस्तिकेच्या प्रतीची झेरॉक्स प्रत ते देऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या दि. ०६.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १३ मुद्यांवर माहिती मागविली होती. त्यापैकी मुद्दा क्र. १ ते १० या दहा मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे स्पष्टीकरण व त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, जी अधिनियमातील विहित तरतुदींशी सुसंगत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ११,१२ व १३ शी संबंधित माहिती ही अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ ते १० च्या संबंधित असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे विचारणे आणि याबद्दल त्यांची स्पष्टीकरणे माहितीच्या स्वरुपात विचारणे अशाप्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये दिलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते १० शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि.११.०३.२००८ रोजीच्या पत्राचे

अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती मुद्देनिहाय न देता अपिलार्थीने ज्या विषयावर त्यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे, त्या विषयाशी संबंधित, सर्वसाधारण स्वरुपाची एक स्पष्टीकरणात्मक टिपणी त्यांनी या पत्राद्वारे अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांना देत असताना ती मुद्देनिहाय देण्याची दक्षता त्यांनी इत:पर घ्यावी.

आज रोजी उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्र. ११ व १२ शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले व मुद्दा क्र.१३ च्या संदर्भात आयोगास असे अवगत केले की, श्री. व्ही. आर.तिडके यांची मूळ सेवापुस्तिका ही जिल्हा सामान्य रुग्णालय,गडचिरोली यांच्याकडून गहाळ झाली असल्याकारणाने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मुद्दा क्र.१३ च्या संदर्भात माहिती देता येणार नाही. अपिलार्थीस सेवानिवृत्ती लाभ देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी विशेष प्रयत्न करुन अपिलार्थीच्या सेवापुस्तिकेची पुनर्बांधणी केली असून या नव्याने तयार करण्यात आलेल्या सेवापुस्तिकेच्या आधारे अपिलार्थीस सेवानिवृत्तीविषयक अनुज्ञेय लाभ देण्यासंबंधी त्यांच्या कार्यालयात कार्यवाही चालू आहे.

अपिलार्थी व त्यांचे पती यांनी याच विषयावरील अशाप्रकारच्या माहिती संदर्भात आयोगाकडे वेळोवेळी बरीच द्वितीय अपिले सादर केली असल्याचे आयोगास आढळून आले आहे. विचाराधीन व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नाही व यासंदर्भात कोणतेही आदेश पारित केले नाहीत, असे विधान केले आहे, तथापि त्यांच्या या विधानाशी संबंधित वस्तुस्थितीचे अवलोकन करता प्रत्यक्षात अपिलार्थी या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीस

हजर होत्या व तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची प्रत देखील त्यांना प्राप्त झाली असल्याचे आज आयोगास आढळून येत आहे. अशाप्रकारे असत्य विधाने करुन अपिलार्थीने स्वत: आयोगाची दिशाभूल करण्याचा निंद्य प्रयत्न केला आहे, याची अपिलार्थीस येथे जाणीव करुन देण्यात येत आहे. इत:पर अशाप्रकारची असत्य विधाने करुन आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करु नये, अशी सक्त ताकीद त्यांना देण्यात येत आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्याच्या दृष्टीने आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की,उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ११,१२ व १३ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची दोनही अपिले अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. ९६६/०८ व ९६७/०८ अंशत: मान्य करण्यात येत आहेत.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दि. ०६.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. ११,१२ व १३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल अपिलार्थी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ३०-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. शोभा सदाशिवराव तिडके,रा.तिडके निवास, महात्मा फुले मार्ग, हनुमान मंदिर रोड,शाहुनगर,बीड-४३११२२.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,उपसंचालक,आरोग्य सेवा,पुणे मंडळ,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,आरोग्य सेवा,कोल्हापूर मंडळ,कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६८
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

१ श्री. द. मा.रेड्डी, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जासंबंधी कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यामुळे त्यांनी दि. १०.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. ०२.०९.१९८९ ते दि. १८.११.२००६ या कालावधीशी संबंधित, चटोपाध्याय आयोगाच्या त्रिस्तरीय वेतनश्रेणीमधील निवड करुन निवृत्तीवेतनाचे लाभ सुधारित करण्यासंबंधी काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -

शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या दि. १८.११.२००६ वरील मार्गदर्शनानुसार लाभ देण्यात आलेल्या शिक्षकांची संख्या, उर्वरित पात्र शिक्षकांची संख्या, त्यांना लाभ केव्हा मिळणार व विलंबाची कारणे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती त्यांना दूरध्वनीने सूचना दिल्यास व्यक्तिशः अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे व या अर्जामध्ये त्यांनी आपला दूरध्वनी क्रमांक नमूद केला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही, याची सखेद नोंद आयोगाने घेतली आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, 'पात्र शिक्षकांना लाभ केव्हा मिळणार व विलंबाची कारणे' ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नाही. कारण ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. या दोन मुद्यांपैकी पात्र शिक्षकांना लाभ केव्हा मिळणार, ही भविष्यकाळातील माहिती असल्याने व अधिनियमातील तरतुदीनुसार

जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबतचे कोणतेही कारण मागणे, अपिलार्थीस अनुज्ञेय नसल्याने हे दोन मुद्दे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत ठरत आहेत व परिणामी या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे व अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देणे अनिवार्य आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जातील त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या दूरध्वनीवर त्यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थीस माहिती देण्याचा दिनांक व वेळ निश्चित करावी व त्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती विनामूल्य उपलब्ध होईल, असे पहावे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनीअधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची सचिव, शालेय शिक्षण यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) सचिव (शालेय शिक्षण) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. द. मा.रेड्डी द्वारा-जिजाई सन्मित्र कॉलनी, वर्कशॉप रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९६९
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, इस्लाहूल अमल ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दि. १३.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे दि. १६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, शिक्षणाधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामधील संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व आस्थापनाविषयक इतर बाबींवर काही माहिती मागविली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ते पेशाने पत्रकार असून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता आहे. या संस्थेमध्ये एकाच कुटुंबातील सदस्य संस्थेचे कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. या संस्थेमध्ये इतर कोणतीही व्यक्ती कोणत्याही पदावर नेमलेली नाही. त्यामुळे या संस्थेचा कारभार जनसामान्यांच्या निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. १३.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना

अपिलार्थीस ही माहिती, अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे देणे अनिवार्य आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर अध्यक्ष, इस्लाहूल अमल शिक्षण संस्था, नांदेड यांना प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अध्यक्ष, इस्लाहुल अमल प्राथमिक शाळा, संस्था, मोहल्ला सैदान, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पटेल महंमद एकबाल पिता महंमद कासीम, घर नं. ९-४-१०६१, रामरहीमनगर, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,इस्लाहुल अमल ऊर्दू प्राथमिक शाळा,मोहल्ला सैदान,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अध्यक्ष, इस्लाहुल अमल प्राथमिक शाळा संस्था, मोहल्ला सैदान, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७०
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पंडीत शेषराव चव्हाण,<br>रा.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक,<br>क्रीडा व युवक सेवा संचालनालय,<br>महाराष्ट्र राज्य,पुणे-१ | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १८.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सर्वसाधारण स्वरुपाची काही माहिती रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख केलेला नाही. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३०.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे

दिसून येते. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केला होता किंवा कसे, हे आयोगास पुराव्याअभावी कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जाबरोबर त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्याचा कोणताही पुरावा जोडला नाही व तसेच त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाच्या व अपील अर्जाच्या आयोगाकडे सादर केलेल्या झेरॉक्स प्रतीवर संबंधित कार्यालयाचा शिक्का अथवा संबंधित लिपीकाने सही केली असल्याचे आढळून येत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी व संबंधित अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पंडीत शेषराव चव्हाण,द्वारा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,श्री. तुळजाभवानी जिल्हा स्टेडिअम,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७२
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मोहम्मद खमरुल इसलाम,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>कुरेशिया प्राथमिक शाळा,बारा इमाम रोड, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,कुरेश एज्युकेशन सोसायटी<br>मार्फत कुरेशिया प्राथमिक व माध्यमिक शाळा,<br>बारा इमाम रोड,नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून, द्वितीय अपील अर्जासोबतच्या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्याध्यापक, मदरसे कुरेशीया ऊर्दू प्राथमिक शाळा,बारा इमाम रोड,नांदेड यांच्याकडे त्यांच्या दि. १२.०१.२००८ रोजीच्या अर्जान्वये काही माहितीची मागणी केली असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जास विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याने त्यांनी दि. ०५.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. यावर संबंधित संस्थेच्या सचिवांनी त्यांच्याकडील दिनांक १०.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस दि. १५.०५.२००८ पर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केले. तथापि त्या दिवशी ते शाळेत माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी गेले असता, शाळेस उन्हाळी सुटी होती व शाळा

बंद होती, त्यामुळे अपिलार्थीस संबंधितांकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यांनी या शाळेकडे माहितीसाठी वेळोवेळी पाठपुरावा केला, तथापि त्यांना संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील सर्व अनुदानित वर्गाच्या तुकडयांमध्ये शालेय पोषण आहार या योजनेची, तसेच शाळेने जमा केलेल्या शैक्षणिक शुल्कासंबंधी व ऑडीट रिपोर्टच्या प्रती याची जून २००० ते मार्च २००७ पर्यंतच्या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०१.२००८ रोजीच्या अर्जाच्यासंबंधी त्यांना प्रथमतः असे कळविले की, अपिलार्थीस दि. १५.०५.२००८ पर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, तथापि दि. १५.०५.२००८ रोजी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेण्यासाठी गेले असता, शाळेस उन्हाळी सुटी असल्यामुळे शाळा बंद होती व परिणामी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना संबंधित संस्थेच्या सचिवांनी दि. १५.०५.२००८ पर्यंत माहिती देण्याचे त्यांच्याकडील दि. १०.०३.२००८

रोजीच्या पत्राद्वारे कबूल केले होते. तथापि सुमारे एक वर्षाहून जास्त कालावधी व्यपगत होऊनही त्यांना संबंधित शाळेकडून कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही संमिश्र स्वरुपाची असून या माहितीपैकी अपिलार्थीस संबंधित संस्थेने शालेय पोषण आहाराबाबत वृत्तपत्रात दिलेल्या जाहीरातीच्या सत्यप्रती व संबंधित संस्थेचे जून २००० ते मार्च २००७ पर्यंतचे ऑडीट रिपोर्ट एवढीच माहिती देय होत आहे. उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीने मोघम स्वरुपात आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात मागितली असल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही. सबब जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुरेशिया प्राथमिक शाळा, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि.१२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील शालेय पोषण आहार निविदेच्या जाहिरातीच्या सत्यप्रती व त्यांच्या संस्थेच्या जून २००० ते मार्च २००७ या कालावधीतील ऑडीट रिपोर्टच्या झेरॉक्स प्रती, प्रमाणित करुन त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. तसेच मुख्याध्यापक, कुरेशिया प्राथमिक शाळा यांना असेही आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरवून अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय दीर्घकाळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत

त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोहम्मद खमरुल इसलाम,घर क्र. ९-५-४११, उमर कॉलनी, हनिफ दुध भंडार समोर,देगलूर नाका,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,कुरेशिया प्राथमिक शाळा,बारा इमाम रोड, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,कुरेश एज्युकेशन सोसायटी, मार्फत कुरेशिया प्राथमिक व माध्यमिक शाळा,बारा इमाम रोड,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६८
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. फारोकी सैफोद्दीन सरफराजोद्दीन,<br>पाथरी,जि.परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद,पाथरी,जि.परभणी<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त, (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती न देता माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळाटाळ केली असल्याने संबंधित मुख्याधिकारी यांना दंड करण्याचे व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे आदेशित करावे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी , जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या नगर परिषद,पाथरीच्या कार्यक्षेत्रातील - वॉर्ड क्र. १४ मध्ये अनुसूचित जमातीच्या नागरिकांची लोकसंख्या व त्यांची नाव व वयासहीत यादी - अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी दि. ०१.०१.२००९९ ते दि. ३१.१२.२००६ असा आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वॉर्ड क्र. १४ मधील अनुसूचित जमातीच्या नागरिकांची एकूण संख्या दिली आहे. तथापि या नागरिकांची यादी त्यांनी अपिलार्थीस दिली नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले.अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.०१.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी निवेदनाद्वारे आयोगास सादर केला असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, जनगणना कार्यालयाने त्यांना दि. २१.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे (पाथरी नगर परिषद क्षेत्रातील) वॉर्ड क्र.१४ मध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या नसल्याचे पत्र दिले आहे. त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविलेला २९७ हा आकडा चुकीचा आहे. त्यांनी आयोगास या निवेदनाद्वारे असेही अवगत केले आहे की, पाथरी शहरामध्ये पारधीवाडा येथेच अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे. इतर कोणत्याही वॉर्डामध्ये अनुसूचित जमातीचे लोक वास्तव्य करीत नाहीत. त्यांनी पुरविलेल्या माहितीवर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. व्ही.एम.अंभोरे यांची स्वाक्षरी नसून त्यावर श्री.डी.बी.चिंचाणे,कार्यालयीन अधीक्षक यांची स्वाक्षरी आहे, त्यामुळे त्यांना मिळालेली माहिती चुकीच्या प्राधिकरणाकडून प्राप्त झाली आहे, असे वाटते.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दि. १०.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने एकच माहिती दोन वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकरणाकडून मागितली असता, या माहितीमध्ये त्यांना विसंगती आढळून आली आहे. अपिलार्थीस जनगणना कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार वॉर्ड क्र.१४ मध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या 'निरंक' आहे, तर जन माहिती अधिकारी यांच्याकडून या वॉर्डात अनुसूचित जमातीची जनगणना २००१ नुसार २९७ इतकी लोकसंख्या असल्याचे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी निवडणूकीच्या अनुषंगाने त्यांनी तयार केलेल्या वॉर्ड क्र.१४ ची माहिती दिली आहे. विचाराधीन प्रकरणी अपिलार्थस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली असल्याने अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करणे आयोगास आवश्यक वाटत नाही. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अधीक्षकांनी सही करुन अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे नमूद केले आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केवळ जन माहिती अधिकारी या पदनामाचा उल्लेख करावा व त्यांच्या कार्यालयातील ज्या अधिकाऱ्याची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे, त्यांनीच इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील अर्जांच्या संदर्भात पत्रव्यवहार करावा.

अपिलार्थीस विसंगतीपूर्ण माहिती प्राप्त झाल्याची पार्श्वभूमी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २९.०१.२००८ रोजीच्या आदेशामध्ये सविस्तरपणे केली आहे. त्यामुळे त्यांची द्विरुक्ती येथे करण्यात येत नाही.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली पूर्ण माहिती दिलेली आहे. त्यांच्याकडे अनुसूचित जमातीची यादी उपलब्ध नाही.तसेही त्यांनी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही दुष्ट हेतूने

माहिती दडविली नाही अथवा माहिती देण्यास टाळाटाळ केली नाही, त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेली विनंती आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. फारोकी सैफोद्दीन सरफराजोद्दीन,जैतापूर मोहल्ला,पाथरी,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद,पाथरी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६९
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख खाजा मोईनोद्दिन किरमानी शेख अलीयार, नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा सचिव, मदिनातुल- उलुम- शिक्षण संस्था, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,नांदेड | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी सचिव, मॅनेजिंग कमिटी, मदरसे मदिनातुल उलुम, जगजीवनराम रोड,देगलूरनाका, नांदेड यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मदिनातुल -उलुम -शिक्षण संस्था, नांदेड या संस्थेविषयी दि. ०१.०१.२००२ ते ०३.०३.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१)

च्या तरतुदीनुसार दि. १९.०४.२००८ रोजी सहायक धर्मादाय आयुक्त,नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि सहायक  धर्मादाय आयुक्त, यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झ ााल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे दि. १७.०४.२००८ रोजीचे प्रथम अपील त्यांना प्राप्त झालेले नाही.

वरील घटनाक्रम, सहायक धर्मादाय आयुक्त,नांदेड यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त,नांदेड यांच्या प्रतिनिधी यांचा, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही, हा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. कारण अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज, सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्या कार्यालयात दि. १९.०४.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार करावयाचे प्रथम अपील चुकीच्या प्राधिकरणाकडे केले आहे. सहायक धर्मादाय आयुक्त,नांदेड यांची नियुक्ती, शिक्षण संस्थाच्या संबंधातील माहितीसाठीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देण्यासाठी झालेली नाही. ते माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेल्या प्रकरणातच निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे अपिलार्थीस ज्या शिक्षण संस्थेच्या संबंधी माहिती हवी आहे, ती माहिती त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील

अधीक्षक, ज्यांची अशाप्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली आहे, त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केल्यास त्यांच्या अर्जाचा सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालयातील जन माहिती अधिकारी हे आवश्यकतेनुसार विचार करतील. अशाप्रकारे अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अपील अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे केला असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख खाजा मोईनोद्दिन किरमानी शेख अलीयार, मदरसे मरकज उलूम नंदिग्राम सोसायटी समोर, देगलूरनाका,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,मदिनातुल-उलुम-शिक्षण संस्था, जगजीवनराम रोड,देगलूर नाका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. सहायक धर्मादाय आयुक्त,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७४५
निर्णय दिनांक ३०-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. युवराज मुंडे,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ,<br>औरंगाबाद<br>जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : निरीक्षक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. आर.टी.मोंडे,श्री. वांजरखेडकर,श्री.सोलापूरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली तसेच त्रयस्थ पक्षाची सेवा नियमित का करण्यात आली नाही, निवड मंडळाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी रु. ३२५-८८० का देण्यात आली नाही, ही व डॉ.वांजरखेडकर यांच्या पदोन्नतीच्या प्रस्तावाची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०७.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी , जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. मोंडे उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.०३.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. आर.टी.मोंडे, डॉ.वांजरखेडकर व श्री. सोलापूरे सर्व वैद्यकीय अधिकारी यांच्याशी संबंधित एकूण ८ मुद्यांद्वारे त्यांच्या आस्थापनाविषयाबाबीशी संबंधित काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती विनामूल्य पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०६.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर अपिलार्थीने उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०६.२००७ रोजीच्या पत्रान्वये केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाल्याचा व प्राप्त माहिती चुकीची आणि दिशाभूल करणारी असल्याचा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २०.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती व त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे.ही माहिती देता असताना, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'उ' व 'ए' शी संबंधित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती त्या माहितीपैकी मुद्दा क्र. 'उ' शी संबंधित त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या

प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी दिलेली आहे, तर अपिलार्थीच्या अर्जातील 'ए' या मुद्यावरील माहिती त्यावेळी पुरवू शकले नाहीत. तथापि या मुद्यांसंदर्भातील निर्णय आता झाला असून या निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दि. ३०.०७.२००९ रोजी पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.०३.२००७ रोजीच्या वरील अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही संमिश्र स्वरुपातील असून यातील या अपील अर्जावर अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीचा कालावधी देखील नमूद केलेला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २०.०४.२००७ रोजी पुरविलेल्या माहितीचे मुद्देनिहाय छाननी केली असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील अर्जातील मुद्दा क्र. 'उ' व 'ए' या मुद्यांशी संबंधित माहिती प्रथमतः नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. यापैकी मुद्दा क्र.उ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या अपील अर्जाच्या सुनावणीच्यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लातूर यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन पुरविल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना देय असलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'ए' द्वारे श्री. आर.टी.मोडे यांच्या एक वर्षाचा सेवाकाळ नमूद करणे आणि सेवांतर्गत आश्वासित प्रगतीच्या झालेल्या कार्यवाही ही माहिती मागितली होती, ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने माहिती मागतेवेळी उपलब्ध नव्हती. त्यांनी ही माहिती प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था,लातूर यांच्याकडून मागविण्यात आली असल्याचे अपिलार्थीस कळविले आहे.

आज रोजी आयोगाकडील सुनावणीच्या वेळी त्यांनी आयोगास असे अवगत केले की, श्री. आर.टी.मोंडे यांना आश्वासित प्रगती योजनेचे आर्थिक लाभ देण्याबाबत निर्णय झाला असून या निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दि. ३०.०७.२००९ रोजी म्हणजे आजच पुरविली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली संपूर्ण माहिती जन

माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्य माहितीपैकी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या निर्णयाबद्दल खुलासा व कारणे अपेक्षित करणारी माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. ही माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती मूळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्यामुळे आता असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेल्या माहितीतील देय होत असलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी वेळेत पुरविली आहे. या माहितीचे अवलोकन करता ही माहिती खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये श्री.वांजरखेडकर वैद्यकीय अधिकारी,औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लातूर यांच्या पदोन्नतीचा प्रस्तावाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि या संबंधी आयोगास असे अवगत करुन देण्यात आले आहे की, वैद्यकीय अधिकारी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लातूर हे पद एकाकी असल्यामुळे त्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव तयार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी श्री. वांजरखेडकर यांच्या पदोन्नतीच्या प्रस्तावाची प्रत व मुद्दा क्र. ए शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय होत

असलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. युवराज मुंडे,शिवाजीनगर, मारोती मंदिराजवळ,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७३

निर्णय दिनांक   ३१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. लालचंद देवचंद ताटू,<br>रा. सद्‌भावना गणेश मंदिरामागे, पुंडलीकनगर,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा वॉर्ड अधिकारी ई, महानगरपालिका, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत्यक्षत : | जन माहिती अधिकारी | : | १ | वॉर्ड अभियंता, वॉर्ड 'ई', महानगरपालिका, औरंगाबाद |
| | | | २ | उप अभियंता, बांधकाम विभाग-२, महानगर-पालिका, औरंगाबाद |
| | | | ३ | प्रकल्प संचालक, महानगरपालिका, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | | | कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्रमांक ८२ व ८३ संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नगरसेवक निधी कसा खर्च झाला त्याची संपूर्ण माहिती, गुंठेवारी जमा व खर्च, एन-४, सिडको न्यू हनुमाननगर रस्ता रुंदीकरण कामे कशा प्रकारे किती व त्याचा खर्च आला इस्टीमेट, पुढील मंजूरी करणे केव्हा त्याची कारणमिमांसा देणे, या योजनेत गुंठेवारीत किती कशी केव्हा काम सुरु होणार, गुत्तेदार कोण व वॉर्ड क्रमांक ८२ व ८३ मधील दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींची नांवे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांनी वॉर्ड अधिकारी यांना उद्देशून केला होता. या अर्जामधील माहिती महानगरपालिकेच्या विविध विभागाशी संबंधित असल्याने वॉर्ड इंजिनिअर ई यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अर्जाची प्रत उप अभियंता बांधकाम विभाग क्रमांक २ व प्रकल्प संचालक मनपा यांना देऊन या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. यानंतरही अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती दिली तथापि ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनादिनांकाचे प्रथम अपील केले. परंतु अपिलार्थीच्या या अपील अर्जावर त्यांना कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित एकूण तीन जन माहिती अधिकारी होते. यापैकी वॉर्ड

इंजिनिअर यांनी अपिलार्थीस आठ दिवसात माहिती पुरविली आहे. उप अभियंता, बांधकाम विभाग २ यांनी दिनांक २६-०३-२००७ रोजी व प्रकल्प संचालक यांनी दिनांक ०२-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाची नवीन सर्वेक्षण यादी शासनाकडे अंतीम करण्यासाठी पाठविल्याचे कळविले. तसेच आता अपिलार्थीस दिनांक २७-०७-२००९ रोजी पूर्ण माहिती देऊन या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना पूर्ण माहिती मिळाल्याची पोच पावती त्यांनी आयोगास सादर केली आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीचा विनादिनांकाचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात मूळात प्राप्त न झाल्याने त्यांच्या या कथित अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांना निर्णय घेणे शक्य झाले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीपैकी 'कारणमिमांसा' ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या अर्जामध्ये अपिलार्थीने कारण-मिमांसा म्हणजे त्यांना नक्की कोणत्या मुद्दयावर माहिती हवी आहे हे स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती तसेच अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील ड्रेनेज, रस्ते, गुंठेवारी किती, कशी, केव्हा कामे सुरु करणार ही भविष्यकाळा-तील विचारलेली माहिती, अपिलार्थीस ती माहिती अधिकार अधिनियमतील तरतुदींशी सुसंगत नसल्याने देय होत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहिती अपेक्षिली आहे. परंतु त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे किती वेळा गेले किंवा त्यांच्याशी किती वेळा संपर्क साधला याचा सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केला नाही. अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे 'व्यक्तिशः' माहिती मागितल्यानंतर पुढे ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी

अपिलार्थीने अशा प्रकारे त्यांचे उत्तरदायित्व पार पाडले किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे मागणी केलेली माहिती मात्र अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे व १९९७ या वर्षाची माहिती महानगरपालिकेच्या प्रकल्प अधिका-याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींची यादी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागताना माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख केला नव्हता. त्यामुळे प्रकल्प संचालक यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली १९९७ मध्ये तयार करण्यात आलेली यादी प्रथमतः उपलब्ध करुन द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती न करता अपिलार्थीस नवीन प्रस्तावित यादी शासनास सादर केल्याचे सांगितले. त्यांची ही कृती चुकीची आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस १९९७ सालची दारिद्र्यरेषेखालील लोकांची यादी पुरविली आहे किंवा कसे असे संबंधित अधिका-यांना विचारले असता, त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. सबब, प्रकल्प संचालक, मनपा यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने प्रकल्प संचालक यांच्याकडे उपलब्ध असलेली औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्रमांक ८२ व ८३ मधील दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींची यादी त्यांनी स्वतः प्रकल्प संचालक यांच्या कार्यालयात हजर राहून याच कालावधीमध्ये विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. प्रकल्प संचालक, मनपा यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लालचंद देवचंद ताटू, रा. सद्‌भावना गणेश मंदिरमागे, पुंडलीकनगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अभियंता वॉर्ड ई, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७४

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

१ श्री. बशीर खान पि. महेताब खान, : अपिलार्थी
मकसूद कॉलनी, बिलकीस मस्जीदच्या पाठीमागे,
रोशनगेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभाग नियंत्रक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
नांदेड

३ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा महाव्यवस्थापक, (क.व.औ.स.) राज्य मार्ग परिवहन
महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई - ०८

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने त्यांना माहिती नियमानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पाठविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले असून आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या विना दिनांकाच्या अर्जाव्दारे माहिती अधिकार अधिनियम

२००५ च्या तरतुदीनुसार विभाग नियंत्रक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड यांच्याकडे एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नांदेड विभागातून बदली झाल्यानंतर नियमबाह्य ८६५१ रुपये कपात का केली ? पेटीकॅश मधील एकूण तीस व्हॉवचर का म्हणून पेंडींग ठेवले, ऑडिटर यांनी प्रत्येक वर्षी व्हॉवचर आणि कॅश चेक केली कमीबाबत रिपोर्ट का केला नाही ? चार वर्षाच्या व्हॉवचरबाबत चार वर्षात विभागीय लेखाधिकारी यांनी कधीही रिपोर्ट न करण्याचे कारण काय - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस खुलासेवजा माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २२-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर रुपये वीस चा न्यायालय फी मुद्रांक लावला नसल्याने आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या तरतुदीशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या विना दिनांकाच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याबाबत माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी निर्णय घेणे एवढीच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये 'माहिती' या शब्दाची व्याप्ती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये पुरेशी स्पष्ट केलेली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कृतीबद्दल कारणे मागणे, त्यांच्याकडून खुलासेवजा माहिती अपेक्षित करणे अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणे अशा प्रकारची माहिती मागणे अनुज्ञेय नाही. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना, ती अधिनियमातील तरतुदीशी पूर्णतः विसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही तरीही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस खुलासेवजा पत्र पाठविले आहे. अपिलार्थीने या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असेल तर त्यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या सक्षम प्राधिकरणाकडे आपला तक्रार अर्ज नोंदवून त्या प्राधिकरणाकडून आपल्या गा-हाण्याचा निपटारा करुन घ्यावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बशीर खान पि. महेताब खान, मकसूद कॉलनी, बिलकीस मस्जीदच्या पाठीमागे, रोशनगेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक, (क.व.औ.स.) राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, मुंबई - ०८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७५

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दामोधर रामराव शिंदे,<br>रा. रहाटगांव, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिशाभूल करणारी माहिती मिळाली व यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता सदर अपिलाची सुनावणी न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" शासनाने पैठण-पाचोड रोडसाठी जमीन संपादित केलेली आहे. ज्याचा OW NO. ZP (L.Q.N.) 1507 दि. २/३/१९६२ अशी आहे. वरील ZP परिपत्रकानुसार मौजे रहाटगांव ता. पैठण या

शिवारातील संपादित केलेली जमीन गटाप्रमाणे कोणत्या शेतक-याची किती जमीन संपादित करण्यात आली याबाबतची लेखी माहिती हवी आहे. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती भूसंपादन अधिकारी औरंगाबाद यांच्याकडून हस्तगत करण्याचे सूचित केले व अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर अपिलार्थीने २१-०५-२००८ असा दिनांक दर्शविला आहे तथापि हा दिनांक अपिलार्थीने चुकीचा दर्शविला असून प्रत्यक्षात तो दिनांक २१-०४-२००८ असा आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०४-२००८ रोजी निर्णय देऊन आपले आदेश दिनांक ०२-०५-२००८ रोजी पारित केले. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी या तिघांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ४० वर्षापूर्वीची जुनी असून ती माहिती त्यांच्या अभिलेख्यात शोध घेऊनही त्यांना आढळून आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने महसूल अधिका-याच्या ताब्यात असलेल्या रेकॉर्ड ऑफ राईट्स संदर्भातील माहिती मागितली आहे. ही माहिती जमीनीच्या मालकी हक्कासंदर्भात असल्याने या माहितीशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याचा कालावधी हा कायमस्वरुपी आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या अभिलेख्यात आढळून येत नाही हा केलेला युक्तिवाद आयोग मान्य करीत नाही. जन माहिती अधिकारी यांना या टप्प्यावर असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या भूसंपादन अधिका-यामार्फत संपादित करण्यात आलेली आहे त्यांच्याकडील अभिलेख्यांचाही शोध त्यांनी हे आदेश निर्गमित तीस दिवसाच्या आत घ्यावा व अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती याच कालावधीमध्ये त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच जर कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्याचे संबंधित अभिलेखे गहाळ झाले असतील तर त्यांनी हे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर होती, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन यासंदर्भात पुढील कारवाई प्रचलीत नियमाप्रमाणे व महसूल खात्याच्या कार्यप्रणालीनुसार करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दामोधर रामराव शिंदे, रा. रहाटगांव तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७६

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सय्यद अशफाकअली स. साबेरअली,<br>व्दारा : महंमद रियाज अ. माबूद,<br>रियाज किराणा स्टोअर्स, शादीखानाजवळ, उस्मानपुरा,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>रो. ह. यो., जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>रो. ह. यो., जिल्हाधिकारी कार्यालय, जालना | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना |
| | जन अपिलीय अधिकारी | : | अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी आयोजित केली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दिनांक ०१-०१-२००७ ते ३१-०३-२००८ या कालावधीशी संबंधित कृषि विभागामार्फत रोजगार हमी योजने अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तालुका कृषि अधिकारी, भोकरदन व बदनापूर यांचा या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत कामावरील मजूर अहवाल व तालुकानिहाय निधी मागणीपत्र आणि वितरित केलेल्या निधीचे आदेश - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी लागणारे शुल्क रुपये ५२० इतके चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती तालुका कृषि अधिकारी, भोकरदन व बदनापूर यांच्याशी संबंधित असून सदर माहिती त्यांचेकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. या पत्रावर अपिलार्थीने, आवश्यक त्या शुल्काचा भरणा करण्यासाठी ते तयार आहेत पण हे शुल्क स्वीकारण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणीही तयार नसल्याचे कारण दर्शवून, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी कार्यालय येथे दिनांक १६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी अथवा जिल्हाधिकारी कार्यालयातील कोणीही निर्णय न दिल्याने व परिणामी आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे आयोगास अवगत केले व जन माहिती अधिकारी यांनी, आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न केल्याने ते अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरवू शकले नाहीत, असा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, नियंत्रण अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांच्याकडे उपलब्ध असणे रोजगार हमी योजनेच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार अभिप्रेत आहे. असे असूनही त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील एका मुद्दयावरील माहिती देण्यासाठी तालुका कृषि अधिकारी, भोकरदन व बदनापूर यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले, ही त्यांची कृती चूकीची आहे. आज रोजी सुनावणीस उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती देण्यास ते तयार असल्याचे आयोगास अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक २३-०४-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील, जो त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे देणे त्यांना अनिवार्य आहे तो त्यांनी अपिलार्थीस दिलेला नाही असे आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २३-०४-२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. परिणामी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना

असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद अशफाकअली स. साबेरअली, व्दारा : महंमद रियाज अ. माबूद, घर नं. ५-३-११ रियाज किराणा स्टोअर्स, शादीखानाजवळ, उस्मानपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७७

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

१ श्री. विलास त्रिंबकराव भालेराव, : अपिलार्थी
रा. नृसिंह कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगापूर,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट माहिती मिळाल्याचे व तसेच ही माहिती देण्यासाठी अपिलार्थीस वांरवार चकरा मारुनही ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिली नाही, त्यांची हॅरसमेंट केली, त्यामुळे जन माहिती अधिकारी श्रीमती चौधर यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्याचे आदेशित करण्याची व उर्वरित माहिती त्यांना विनामूल्य देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०१-२००७ ते ११-०३-२००८ या कालावधीतील मोठी व्याप्ती असलेली माहिती एकूण १३ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे नमूद करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती व्यक्तिशः मागितली असल्याने अपिलार्थीस ती माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले. परंतु यानंतरही अपिलार्थीस वारंवार जन माहिती अधिकारी यांच्याकडे चकरा मारावयास लावून दिनांक २५-०३-२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०५-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दोन दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०५-२००८ रोजी व तदनंतर दिनांक २९-०७-२००९ रोजी संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली आहे. तसेच त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी

अपिलार्थीची दिनांक ३१-०५-२००८ व दिनांक २९-०७-२००९ रोजीची पावती आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३१-०५-२००८ रोजी व २९-०७-२००८ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला कालावधी यांचे प्रमाण व्यस्त असल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसाच्या आत माहिती देणे अपेक्षित आहे. मात्र या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी यांना तीस दिवसामध्ये देणे सकृतदर्शनी शक्य नसावे. तथापि ही माहिती देण्याचा कालावधी दीड वर्षाचा असावा इतपतही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती नव्हती. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी लावलेला विलंब हा समर्थनीय नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांना असेही सूचित करण्यात येते की, इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ३१-०५-२००८ व दिनांक २९-०७-२००९ रोजी संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विलास त्रिंबकराव भालेराव, रा. नृसिंह कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७८

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार,<br>मु. पो. निलेगाव, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली, त्यांना माहिती दिली नाही व जन अपिलीय

अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्या मालकीच्या गाडीला ०४-०१-२००८ रोजी झालेल्या अपघातासंदर्भात एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपघातामध्ये ठार झालेल्या व्यक्तींचे नांव व पद, शासकीय वाहन व्यक्तीगत कामासाठी वापरणे अनुज्ञेय असल्याबद्दल शासनाच्या आदेशाची प्रत, अपघात झालेले वाहन कोणते व वाहन वापरणा-या अधिका-याचे नांव व पद, अपघात झाला तेव्हा अधिकारी वाहनात होते का ? नसल्यास ते कोठे होते, अधिकारी स्वतः नसतांना त्यांना खाजगी कामासाठी वाहन वापरता येते का ? याबाबत शासन आदेशाच्या प्रती, अपघात झालेले वाहन खाजगी कामासाठी त्यांना परवानगी दिली असल्यास त्या आदेशाची व पूरक संचिकेतून टिपणीची प्रत व ०१ एप्रिल २००३ ते ३१-०१-२००४ या कालावधीत जिल्हा परिषदेअंतर्गत किती अधिका-यांना खाजगी वाहन वापरण्यास परवानगी दिली होती त्यांची अधिकारीनिहाय दिनांकासह माहिती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेल्या शासकीय आदेशाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्या. मात्र उर्वरित माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने त्यांनी ती अपिलार्थीस पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील

विहित केलेल्या तरतुदीमध्ये निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०७-२००८ रोजी उर्वरित माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले व ही माहिती अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ पोच पावतीचा आवश्यक तो पुरावाही आयोगास सादर केला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २६-०२-२००८ व दिनांक ११-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पूर्णपणे प्राप्त झाली आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने त्यांच्या या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ५ पूर्ण, मुद्दा क्रमांक ६ अंशतः (अधिकारी स्वतः वाहनात नसतांना ........... वापरता येते का ?) ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने, मूळात देय होत नाही. तथापि एवढे असूनही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या निर्णयामध्ये सूचित केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ११-०७-२००८ रोजी पुरविली आहे. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे दिनांक २८-०५-२००८ रोजी व्दितीय अपील नोंदविल्यानंतर दिनांक ११-०७-२००८ रोजी उर्वरित माहिती मिळाल्याचे दिसून येते. मूळात अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जानंतर सुनावणी घेऊन आपला निर्णय दिल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी विलंब लागला. या प्रकरणी

अपिलार्थीने दिनांक ०१-०४-२००८ रोजी केलेले प्रथम अपील हे चुकीच्या प्राधिकरणाकडे केले असल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांना विलंब झाला आहे असे आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांचे दिनांक ०१-०४-२००८ रोजीचे प्रथम अपील उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे केले होते. त्यांच्याकडून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे हे प्रथम अपील दिनांक १६-०५-२००८ रोजी प्राप्त झाले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०७-२००८ रोजी निर्णय दिला. अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ३० ते ४५ दिवसात निर्णय घेणे त्यांना अनिवार्य असतांना या प्रकरणी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या कालावधीपेक्षा विलंबाने निर्णय दिल्याचे दिसून येते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, इत:पर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपिलावर अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये निर्णय घेण्याची दक्षता घ्यावी.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, मु. पो. निलेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९७९

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते,<br>न्यायालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय,<br>बीड | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड |
| | जन अपिलीय अधिकारी | : अपर पोलीस अधीक्षक, बीड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जाणुनबुजून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पाठविल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करावी व त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ (३) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०१-२००५ ते ०४-०४-२००७ या कालावधीत दाखल केलेल्या गुन्ह्याची व फिर्यादीची एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. यापैकी पहिल्या मुद्दयामध्ये फिर्यादीचे नांव, पत्ता, गुन्हा रजिस्टर नंबर, कलम, तारीख, पोलीस स्टेशन, तपासणी अमलदाराचे नांव व हुद्दा आणि मुद्दा क्रमांक दोनच्या मुद्दयाव्दारे या तक्रारीवर पोलीस अधीक्षक यांनी केलेल्या कारवाईचा तपशील - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ०३-०५-२००७ व तदनंतर दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या दोन पत्राव्दारे प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या संबंधित लिपिकाकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे कारण दर्शवून १५ दिवसाच्या मुदतवाढीचे आदेश जन माहिती अधिकारी यांनी स्वतःच जारी केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता अपिलार्थीस दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिल्याचे त्यांना कळविले व या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांना देऊन अपिलार्थीस तात्काळ व विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती दिली आहे. त्यांच्या कार्यालयाच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना विलंब लागला. हा विलंब त्यांनी जाणुनबुजून किंवा अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळण्यासाठी लावला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहज उपलब्ध नव्हती. त्यांना ही माहिती त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील पोलीस स्टेशनकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस द्यावी लागणार होती. अशा वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कार्यवाही करणे अभिप्रेत होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कार्यवाही न करता जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनकडून स्वतः माहिती गोळा करुन ती एकत्रित करुन अपिलार्थीस देण्याचा प्रयत्न केला. आता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पाठविलेली माहिती ही अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस ही माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पाठविली आहे. तथापि त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ आवश्यक तो पुरावा ते आयोगा-समोर सादर करु शकले नाहीत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेने पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार विलंबाने पुरविली गेली आहे असे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जावर जर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे वेळेत कार्यवाही केली असती तर अपिलार्थीस ही माहिती यापूर्वीच प्राप्त झाली असती.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस उप अधीक्षक यांची माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यांच्यापेक्षा खालच्या स्तरावर कोणत्याही अधिका-याची जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली नाही. पोलीस अधीक्षक कार्यालयाचा संपूर्ण जनतेशी येणारा दैनंदिन संपर्क पाहता पोलीस अधीक्षक कार्यालयाने त्यांच्या विभागामध्ये पोलीस स्टेशन पातळीवर अधिक जन माहिती अधिकारी नेमण्याची गरज आहे, असे आयोगास वाटते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ मधील उप कलम १ ची तरतूद पाहता माहिती अधिकार अधिनियमामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाने जास्तीत जास्त अधिका-यांना जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणे अपेक्षित आहे. या प्रकरणी जर प्रत्येक पोलीस स्टेशनच्या निरीक्षकाची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक तालुका किंवा गांव पातळीवर केली गेली असती तर अपिलार्थीस ही माहिती मिळण्यासाठी एवढा विलंब लागला नसता. सबब पोलीस अधीक्षक कार्यालयातील माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणी संदर्भात अशा प्रकारे निर्माण झालेल्या प्रशासकीय त्रुटीबाबत पोलीस अधीक्षक, बीड यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक पोलीस स्टेशनच्या निरीक्षकाची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करण्यासाठी विचार करावा. पोलीस अधीक्षक यांना ही सूचना माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (क) च्या तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जरी विलंब लागला असला तरी तो संबंधित जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर लावल्याचे अथवा अपिलार्थीपासून कोणतीही माहिती दृष्ट

हेतूने दडविल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आदेशित करण्यात येत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर यापुढे त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत डाकेने पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते, न्यायालय, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८०

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गित्ते अरुण उत्तमराव,<br>मु. वागबेट, पो. बेलंबा, तालुका परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण संचालनालय (मा.वि.) पुणे - ०१ | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>शिक्षण संचालनालय (मा.वि.) पुणे - ०१ | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे ‑ ०१ |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षण सह संचालक, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे ‑ ०१ |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १७-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी विचारलेली माहिती न दिल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्याचे टाळून माहिती अधिकार अधिनियम

२००५ चा भंग केला असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन अपिलार्थीस अतिशीघ्र विनामूल्य माहिती तात्काळ मिळवून द्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००१ ते २००७ या कालावधीतील काही माहिती विस्तृत प्रमाणात एकूण सात मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. तथापि अशी कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थीने स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने शिक्षण संचालनालयाकडे अधिनियमाव्दारे कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे दिनांक १३-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर आहे हे पाहता अपिलार्थी-

च्या प्रथम अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गित्ते अरुण उत्तमराव, मु. वागबेट, पो. बेलंबा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण सह संचालक, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८१

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

१ श्री. हेमंत शिवाजीराव वडणे, : अपिलार्थी
व्दारा, गपाट निवास, सेवासुविधा, टेलीफोन भवन जवळ,
तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
(विशेष कक्ष विभाग), औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
(विशेष कक्ष विभाग), औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक कुलसचिव (विशेष कक्ष), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : संचालक, विद्यापीठ व महाविद्यालये विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर दिले नाही व माहिती न दिल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता त्यांनीही त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने संबंधितांवर अधिनियमातील कलम २० नुसार दंड लावावा आणि अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे त्यांना आदेशित करावे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने, " बालाघाट शिक्षण संस्था, नळदुर्ग, तालुका तुळजापूर अंर्तगत महाविद्यालयातील सध्याची व १९९९ जून पर्यंतची रोस्टर नुसार (आरक्षण) स्थितीबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद कडून १९९४ ते २००७ पर्यंतची माहिती आरक्षित पदावर किती खुल्या वर्गातील मान्यता दिल्या (विषयनिहाय माहिती) १९९६, ९७, २००५, ०६, ०७ जाहिरातीबद्दल माहिती " या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात उल्लेखिलेल्याप्रमाणे इतर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीचा प्रथम अर्ज व प्रथम अपील अर्ज विद्यापीठास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे त्यांना

अपिलार्थीस कोणतीही माहिती देता आली नाही. तथापि आयोगाच्या आजच्या सुनावणीच्या वेळी पाठविलेल्या नोटिशीबरोबर अपिलार्थीचा त्यांना उद्देशून केलेला माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांना प्राप्त झाला आहे व त्या अनुषंगाने त्यांनी अपिलार्थीस आजच त्यांच्याकडील २८१७ या क्रमांकाच्या दिनांक ३१-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोधच मुळात जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या आज रोजीच्या सुनावणीच्या संदर्भात नोटीशीबरोबर पाठविलेल्या सहपत्रावरुन झाला. जन माहिती अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वर उल्लेख केलेली माहिती वगळता उर्वरित कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने, देय होत नाही. अपिलार्थीस देय असलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३१-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे पुरविल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली अथवा त्यांच्यापासून आवश्यक ती माहिती दृष्ट हेतूने दडविली असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांच्यावर, अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे अधिनियमातील कलम २० मधील कोणतीही कारवाई करण्याचे आयोग आदेश देत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हेमंत शिवाजीराव वडणे, व्दारा, गपाट निवास, सेवासुविधा, टेलीफोन भवन जवळ, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव (विशेष कक्ष), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, विद्यापीठ व महाविद्यालये विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८२

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

१ श्री. राहुल कुंडलिक पगारे, : अपिलार्थी
मु. पो. जायकवाडी (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांना माहिती मिळाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ३१-०७-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आता पैठण नगर परिषदेकडून प्राप्त झाली असून त्यांनी ज्या त्रयस्थ व्यक्तीसंदर्भात माहिती मागितली होती त्या त्रयस्थ व्यक्तीस आता सेवानिवृत्ती विषयी सर्व आर्थिक लाभ नगर परिषदेकडून प्राप्त झाले असल्याने त्यांची आता कोणतीही तक्रार उरलेली नाही व त्यामुळे त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढावे.

अपिलार्थीची ही विनंती आयोग मान्य करत असून अपिलार्थीचे आज रोजी विचाराधीन असलेले अपील या आदेशाव्दारे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राहुल कुंडलिक पगारे, मु. पो. जायकवाडी (उत्तर ), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, पैठण, तालुका

पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८३

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

१ श्री. अनिल वसंतराव पाटील, : अपिलार्थी
रा. जेऊर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती दिली नसल्याने विचाराधीन अपील आयोगाकडे केले असून त्यांच्या मूळ अर्जातील लेखा परीक्षण न झालेल्या ग्रामपंचायतीची कालावधीसह नांवे व ०१ जानेवारी २००५ पासून ते अपिलार्थीने प्रथम अर्ज करेपर्यंत कार्यरत असलेल्या सर्व ग्रामसेवकांची नांवे इत्यादी माहितीची आपली मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित विविध वर्षामधील काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पंचायत समिती अंतर्गत येणा-या ग्रामपंचायतीची नांवे, ०१ जानेवारी २००५ पासून कार्यरत असलेल्या ग्रामसेवकांची कालावधीनिहाय नांवे, सन २००४ ते २००७ या कालावधीमध्ये ऑडिट झालेल्या व न झालेल्या ग्रामपंचायतीची नांवे, दिनांक ०१-०१-२००७ ते ३१-१२-२००७ या कालावधीत गट विकास अधिकारी वापरत असलेल्या गाडीच्या देखभाल दुरुस्तीचा झालेला खर्च, गाडीने प्रवास केलेले किलोमिटर, इंधन खर्च इत्यादी व या वाहनाच्या लॉगबुकाच्या प्रती, दिनांक ०१-०१-२००७ ते ३०-०८-२००७ या कालावधीमध्ये आपल्या तालुक्यातील कोणकोणत्या ग्रामसेवकांनी ग्रामपंचायत हद्दीतील जन्म आणि मृत्यू नोंदी कळविल्या त्याची माहिती, आणि ही माहिती गट विकास अधिकारी यांनी वरिष्ठांना कळविलेल्या पत्राच्या प्रती व गट विकास अधिकारी यांच्या दिनांक ०१-१०-२००७ ते ०३-१०-२००७ या कालावधीतील केलेल्या कामाच्या नोंदी ज्या नोंदवहीवर घेतल्या आहे त्या त्यांच्या दैनंदिनीच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या-कडील दिनांक १२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रातील ज्या कर्मचा-याकडे / अधिका-याकडे उपलब्ध आहे त्यांच्याकडून ही माहिती मागविली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही क्लिष्ट स्वरुपाची व प्रत्येक मुद्दयातील माहितीचा कालावधी वेगवेगळा असल्याने जन माहिती अधिकारी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद देऊ शकले नाहीत. परिणामी अपिलार्थीस ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०५-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दिनांक १७-०५-२००८ पूर्वी संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या अपील सुनावणीच्या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती

विनामूल्य उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे व ती विलंबाने प्राप्त झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व उशिरा माहिती प्राप्त झाली आहे त्यामुळे तत्कालीन गट विकास अधिका-यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याचे आयोगाने आदेशित करावे. अपिलार्थीस अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी कोणती माहिती दिली नाही, असा प्रश्न आयोगाने विचारला असता, ज्या ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण झाले नाही अशा ग्रामपंचायतीची यादी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०५-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर घेतलेल्या सुनावणीच्या वेळी विनामूल्य दिलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीस जी माहिती न मिळाल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचे वाटत आहे, ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०५-२००८ रोजी पुरविली आहे. या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण ग्रामपंचायतीची यादी दिली असून त्यामध्ये ज्या ग्रामपंचायतीमध्ये लेखा परीक्षण करण्यात आले आहे त्या ग्रामपंचायतीच्या लेखा परीक्षणाच्या दिनांकाचा उल्लेख केला आहे व ज्या ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण झाले नाही

त्या समोर फक्त " - " अशी खूण केली आहे. यावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिली असून जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अपिलार्थीने योग्य प्रकारे अवलोकन न केल्याने अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण वाटत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचा मुद्दा आपोआप निकाली निघत आहे. अपिलार्थीच्या युक्तिवादातील व व्दितीय अपील अर्जातील दुसरे मुद्दे लक्षात घेता या प्रकरणी आयोगाचे असे अभिप्राय आहेत की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही विस्तृत व्याप्तीची व क्लिष्ट स्वरुपाची असल्यामुळे ती माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देण्यासाठी विलंब लागला. तसेच या प्रकरणी ग्रामपंचायत पातळीवरील ग्रामसेवक यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली असल्याने त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सर्व ग्रामपंचायतींना पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली असती तर कदाचित अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त होऊ शकली असती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही न करता त्यांनी स्वत: अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली वेगवेगळया स्वरुपाची व वेगवेगळया विषयांवरील माहिती एकत्रित करुन देण्याचा खटाटोप केला व परिणामी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाली. अपिलार्थीच्या अर्जातील माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी वेळेत कार्यवाही केली आहे. तथापि त्यांच्या दिनांक १२-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संबंधितांकडे उपलब्ध होती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०३-२००८ पर्यंत देखील माहिती पाठविली नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी संबंधितांना दिनांक २९-०३-२००८ रोजी दिलेल्या स्मरणपत्राव्दारे माहिती देण्याचे सूचित केले. यावरुन अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, असे सर्व सहायक एकत्रितपणे जबाबदार ठरत आहेत. जन माहिती अधिकारी यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे सर्व

सहायक या प्रकरणी या विलंबासाठी जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन सहायकांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाशी संबंधित सहायकांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ३१-०७-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अनिल वसंतराव पाटील, रा. जेऊर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९८४

निर्णय दिनांक ३१-०७-२००९

१ श्री. नितीन बाबुलाल क्षिरसागर, : अपिलार्थी
श्री. स्वामी समर्थनगर, लाडगांव रोड, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, नांदुर मधमेश्वर कालवा, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, गोदावरी पाटबंधारे मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने विहित कालावधी ओलांडून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना या प्रकरणातील गैरव्यवहार बाहेर येईल असे वाटल्यावरुन, माहिती दिली नाही असे नमूद करुन या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे चारी नंबर १५ ते १७ मध्ये नंबर १०१ ते ११० पर्यंत वनीकरण करण्यात आले का ? या कामास वरिष्ठांची मंजूरी होती का ? यासंबंधी त्यांना माहिती आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००८ ते एप्रिल २००८ या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयाने चारी नंबर १५ ते १७ मध्ये केलेल्या वनीकरणाच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने व अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या-कडील दिनांक १७-०५-२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विहित कालावधीमध्ये माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०७-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक २८-०६-२००८ रोजी व्यक्तिशः दिल्याचे आयोगास अवगत केले. ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने त्यांची पोचसही देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २८-०६-२००८ रोजीच्या पत्रावर केलेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची

मागणी केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अपिलार्थीवर होते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते स्वतः त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेले यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही किंवा या मुद्दयावर स्पष्टीकरण करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही निरंक अशी आहे. अपिलार्थीने ज्या वनीकरणाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे त्या वनीकरणाच्या कामाचे जन माहिती अधिकारी यांनी अंदाजपत्रकही केले नाही अथवा यासंदर्भात कोणताही प्रस्ताव त्यांच्याकडून पाठविला गेला नव्हता. तसेच ही माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केलेला नाही. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता त्यांच्या मूळ अर्जातील चारी नंबर १५ ते १७ मध्ये नंबर १०१ ते ११० मध्ये वनीकरण करण्यात आले आहे का ? आणि या कामास वरिष्ठांची मान्यता होती का ? या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने आणि त्यांच्या मूळ अर्जात याचा समावेश नसल्यानेही मूळात देय होत नाही. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०७-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नितीन बाबुलाल क्षिरसागर, श्री. स्वामी समर्थनगर, लाडगांव रोड, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदुर मधमेश्वर कालवा, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, गोदावरी पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.